CMYK




सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह

सोलापूर | बुधवार, २९ जुलै २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक २४१ । पाने १२+८ । किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



स्थापना गुरूपौर्णिमा १९८८
वेबसाईट : www.swamiannacchatra.org
ई-मेल : contactus@swamiannacchatra.org
PAN : AAATS5556M

।। श्री अन्नपूर्णा प्रसन्न ।। ।। श्री स्वामी समर्थ ।। ।। श्री लक्ष्मी नारायण ।।

प.ट्र.नं.एफ/२२७९ सोलापूर
फोन : 02181-220444 (7448120444), 221444 (9067521444), 221555 (9527825675), 221180
यात्री निवास : 222555 (9067300555)
यात्री भुवन : 222587 (9067670587)
रुग्णवाहिका : 02181-222777(9689325675)
अग्निशमन : 02181-221777
: 9422815675

राजमाता

माँ जिजाऊसाहेब

ब्रम्हांडनायक



युगप्रवर्तक
जाणता-रयतेचा राजा

श्रीमंत योगी छत्रपती शिवाजी महाराज

अक्कलकोट नरेश

श्रीमंत विजयसिंहराजे भोसले

आशिर्वाद
भारतरत्न

आदरणीय गानसम्राज्ञी
लतादिदी मंगेशकर

## श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ (प.ट्र.नं.एफ/2279) अक्कलकोट

श्री स्वामी समर्थ महाराजांच्या असीम कृपेने श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ(प.ट्र.नं.एफ/२२७९) हे धर्मादाय न्यास
दि.२९ जुलै २०२६ रोजी ३९ व्या वर्षात यशस्वी पदार्पण करीत नेत्रदिपक प्रगतीची वाटचाल करीत आहे.

### गुरूपौर्णिमा व ३९ व्या वर्धापन दिनानिमित्त संपन्न होणारे कार्यक्रम

दि.२९ जुलै २०२६ बुधवार रोजी सकाळी ७ ते ९ - श्री स्वामी समर्थ चरित्र सारामृताचे पारायण
सकाळी ९ ते १० - नामस्मरण व श्रीगुरूपूजा स.१० वा.मान्यवरांच्या हस्ते स्वामींना महानैवेद्य

**सकाळी १०.३० ते ०४ वा.स्वामी भक्तांना महाप्रसाद**

स्नेहांकित

स्व.शिवाजीराव पिसे (महाराज)
मा.विश्वस्त व मुख्य पालखी परिक्रमा संयोजक अन्नछत्र मंडळ

शुभहस्ते

सन्मा.ना.श्री.मुरलीधर मोहोळ
केंद्रीय हवाई राज्यमंत्री

शुभहस्ते

सन्मा.ना.श्री.जयकुमार गोरे
पालकमंत्री, सोलापूर

शुभहस्ते

सन्मा.ना.श्री. भरतशेठ गोगावले
रोजगार हमी योजना मंत्री

शुभहस्ते

सन्मा.श्री. सचिन कल्याणशेट्टी
आमदार,अक्कलकोट

शुभहस्ते

सन्मा.श्री. सिध्दाराम म्हेत्रे
माजी गृहराज्यमंत्री

शुभहस्ते

सन्मा.श्री. महेश गावस्कर
सी.ए. पुणे

शुभहस्ते

सन्मा.श्री. जनार्दन उर्फ आण्णा थोरात
अध्यक्ष - अखिल मंडई मंडळ,पुणे
विश्वस्त - श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट

शुभहस्ते

सन्मा.श्री. सचिन सांबरेकर
पालखी परिक्रमा संयोजक
बेळगावी

शुभहस्ते

सन्मा.सौ. ललिताताई वीर
सन्मा. देणगीदार
आगासखिंड, नाशिक

महानैवेद्य व आरतीनंतर उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ (प.ट्र.नं.: एफ/२२७९) अक्कलकोट
संचलित अक्कलकोट नरेश श्रीमंत विजयसिंहराजे भोसले क्रिकेट ट्रेनिंग ॲकॅडमी उद्घाटन
प्रमुख उपस्थिती : मा.श्री. चंद्रकांत पंडीत (मा.भारतीय क्रिकेटपटू व प्रशिक्षक) व मा.श्री. समीर दिघे (मा.भारतीय क्रिकेटपटू) मा.श्री.संजयजी पाटील (सिलेक्टर रणजी ट्रॉफी, मुंबई व मुंबई क्रिकेट असोसिएशन, TRDO चे चेअरमन)
संस्थापक अध्यक्ष - जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले, कार्यकारी अध्यक्ष - अमोलराजे जनमेजयराजे भोसले
● उद्घाटन स्थळ : गट नं. ५८१, नवीन वाहनतळ, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ (प.ट्र.नं.: एफ/२२७९) अक्कलकोट ●


मा.जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले
संस्थापक अध्यक्ष
श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ (प.ट्र.नं.एफ/२२७९), अक्कलकोट

### पालखी व रथ मिरवणुकीचा शुभारंभ





मा.श्री. शेखर निकम
आमदार - चिपळुण यांच्या शुभहस्ते

सायं.०४ वा. श्री स्वामी समर्थांच्या पादुका पालखी आणि न्यासाच्या सुशोभित केलेल्या रथाच्या भव्य मिरवणुकीचा दिंड्या व वाद्यांच्या गजरात, अतुल बेहरे, पुणे यांच्या ''नादब्रम्ह'' या ढोलपथकाच्या तालात आणि स्वारांजली बँडपथक, लालबाग, मुंबई व विजुभाई तांडेल, चुनाभट्टी, मुंबई यांच्या '' आराध्य ''ढोलपथकाच्या तालात आणि अमोलराजे लेझीम संघाच्या शानदार खेळाने शुभारंभ


मा.श्री. बाळासाहेब दाभेकर
अध्यक्ष - भरत मित्र मंडळ, पुणे
क्रियाशील सभासद
श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अ.कोट
यांच्या शुभहस्ते


मा.श्री. शहाजीराजे पवार
भाजप प्रदेश कार्यकारणी सदस्य
यांच्या शुभहस्ते


मा.श्री. अमोलबापू शिंदे
नगरसेवक - सोलापूर महानगरपालिका
शिवसेना जिल्हाप्रमुख - सोलापूर
यांचे शुभहस्ते


मा.श्री. दिलीप कोल्हे
माजी उपमहापौर
सोलापूर महानगरपालिका
यांचे शुभहस्ते


मा.ॲड. नितीनजी हबीब
कायदेशीर सल्लागार
श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ
व जेष्ठ विधिज्ञ



मा.श्री. चेतन नरोटे
शहराध्यक्ष (काँग्रेस)
मा. स्थायी समिती चेअरमन मनपा,
सोलापूर यांचे शुभहस्ते


मा.श्री. संकेत पिसे
मा. शिक्षण सभापती
सोलापूर महानगरपालिका
यांचे शुभहस्ते

आराध्य ढोलपथक मार्गदर्शक

सन्मा.श्री.विजुभाऊ तांडेल, मुंबई
मा.नगरसेवक, चुनाभट्टी


मा.श्री. संतोष नाईक
सन्मा. देणगीदारसायन, मुंबई


श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ (प.ट्र.नं.एफ/२२७९), अक्कलकोट
यांचे नियोजित महाप्रसादगृह



अक्कलकोट नरेश
श्रीमंत विजयसिंहराजे भोसले
क्रिकेट ट्रेनिंग अकॅडमी


यात्री निवास


यात्री भुवन


निराधारांसाठी '' समर्थ महाप्रसाद सेवा ''


प्रशस्त वाहनतळ


शिवस्मारक


स्वामी समर्थवाटिका

संयोजक

मा.अमोलराजे जनमेजयराजे भोसले
कार्यकारी अध्यक्ष
श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ (प.ट्र.नं.एफ/२२७९), अक्कलकोट

**श्री.जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले** — संस्थापक अध्यक्ष
**श्री.अमोलराजे जनमेजयराजे भोसले** — कार्यकारी अध्यक्ष

विनित

। श्री.अभय गुणधर खोबरे-उपाध्यक्ष । श्री.स्वामिराव उर्फ शाम शिवराम मोरे-सचिव । श्री.संजय लखनलाल राठोड-खजिनदार
। सौ.अलकाताई जनमेजयराजे भोसले-विश्वस्त । सौ.अनिता अभय खोबरे-विश्वस्त । जनार्दन उर्फ आण्णा जगन्नाथ थोरात-विश्वस्त ।
। श्री.चंद्रकांत भानुदास कापसे-विश्वस्त । श्री.राजेंद्र शिवशंकर लिंबीतोटे-विश्वस्त । श्री.मयुरेश सतीश पै -विश्वस्त ।
। श्री.लक्ष्मण विठ्ठलराव पाटील-विश्वस्त । श्री.संतोष जगन्नाथ भोसले-विश्वस्त, पालखी परिक्रमा मुख्य संयोजक ।
। सौ.अर्पिताताई विजय उर्फ अमोलराजे भोसले-विश्वस्त। सौ.अनुयाताई संदिप फुगे-विश्वस्त
हिरकणी महिला बहुउद्देशिय संस्था, अक्कलकोट आणि सखी महिला
प्रशांत भगरे: प्रमुख जनसंपर्क अधिकारी सोमशेखर जमशेट्टी: प्रिंट मिडीया प्रतिनिधी
सर्व क्रियाशील सभासद, सेवेकरी व कार्यकर्ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ (प.ट्र.नं.एफ/२२७९), अक्कलकोट

ऑनलाईन देणगीसाठी
SBI भारतीय स्टेट बैंक
त्वरीत देणगी आणि पावतीसाठी इथे कुठल्याही UPI ॲप ने स्कॅन करुन व देणगी देऊन अन्नदानाच्या कार्यात सहभागी व्हा !
swamisamarth01@mahb
त्वरीत देणगी आणि पावतीसाठी इथे कुठल्याही UPI ॲप ने स्कॅन करुन व देणगी देऊन अन्नदानाच्या कार्यात सहभागी व्हा !

अन्नदान व बांधकाम सेवेत सहभागी व्हा !
टिप - देणगीदारास ८० जी कलमान्वये आयकरात सूट आहे

बँकेचे नांव : स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा : अक्कलकोट शाखा क्र. : ०३०४ बचत खाते क्र : 11419854447, आयएफएससी कोड : SBIN0000304

सौजन्य ● आरिहंत टेडर्स, अक्कलकोट ● विजय टेडर्स, अक्कलकोट ● वसंत कारपेट, सोलापूर ● न्यु सौंदर्या एल ई डी गोविंद केकडे, सोलापूर

## महत्त्वाचे

### नियंत्रण रेषेजवळ स्फोट, दोन जवान जखमी


**श्रीनगर :** देशाच्या संरक्षणासाठी अहोरात्र तैनात असलेले भारतीय लष्कराचे दोन जवान नियंत्रण रेषेजवळ झालेल्या एका शक्तिशाली सुरुंग स्फोटात जखमी झाले. ही घटना बारामुल्ला जिल्ह्यात उरी सेक्टरमध्ये मंगळवारी घडली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून लष्कराने तात्काळ बचावकार्य सुरू केले आहे. सरकारी अधिकाऱ्यांनी सांगितले की, मंगळवारी जवान नियमित गस्त आणि कर्तव्यावर असताना एका जुन्या सुरुंगात शक्तिशाली स्फोट झाला. हा स्फोट इतका मोठा होता की त्याचा आवाज आजूबाजूच्या परिसरात ऐकू आला. स्फोटात दोन जवान गंभीर जखमी झाले. दफादार विजय कुमार आणि नाईक शरणप्पा अंगारी अशी जखमी जवानांची नावे आहे. दोघेही ८ व्या राष्ट्रीय रायफल्सचे शूर जवान असून त्यांनी दीर्घकाळ देशाची सेवा केली आहे. घटनेनंतर लगेचच, सहकारी जवानांनी अदम्य धैर्य आणि शौर्य दाखवून दोन्ही जखमी जवानांना घटनास्थळावरून सुखरूप बाहेर काढले. घटनास्थळी प्रथमोपचारानंतर त्यांना तात्काळ हेलिकॉप्टरने श्रीनगरच्या बदामीबाग येथील लष्करी बेस हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. सध्या दोघांवरही बेस हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहे.

### ठाण्यात मेफेड्रोनसह एकाला अटक

**ठाणे :** महाराष्ट्रातील ठाणे शहरात तीन कोटी रुपये किमतीचे मेफेड्रोन बाळगल्याप्रकरणी एकाला अटक करण्यात आली आहे, अशी माहिती पोलिसांनी मंगळवारी दिली. मिळालेल्या माहितीच्या आधारे गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचला आणि रविवारी रात्री साडेदहाच्या सुमारास कल्याण फाटा येथे रिक्षातून आलेल्या आरोपीला ताब्यात घेतले, असे अधिकाऱ्याने सांगितले. मुंब्रा येथील रहिवासी असलेल्या सलमान मुन्ना शेख या आरोपीकडून पथकाने ३ कोटी रुपये किमतीचे १.५ किलो मेफेड्रोन जप्त केले. शेखचे नाव यापूर्वी खुनाच्या प्रयत्नाच्या एका गुन्ह्यात आले होते आणि तो अमली पदार्थांच्या तस्करीमध्येही सामील होता का, याचा पोलिस तपास करत आहेत. त्याला मादकपदार्थ पुरवणाऱ्या व्यक्तींची आम्ही ओळख पटवली असून, त्या दिशेनेही तपास वेगाने सुरू आहे, असे पोलिस उपायुक्त अमरसिंह जाधव यांनी सांगितले. शेखविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्याला ३१ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे, असे त्यांनी सांगितले.

### सतीश भुसारी यांचे निधन

**नागपूर :** नागपूर येथील रहिवासी सतीश भूसारी यांचे मंगळवार, २८ जुलै रोजी सकाळी अल्पशा आजारामुळे तळेगाव दाभाडे येथे त्यांच्या मुलाकडे दुःखद निधन झाले. ते ७४ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात, पत्नी, मूलगा, सून, दोन नातू, मूलगी, जावई, नात व नातू तसेच मोठा आप्त व मित्र परिवार आहे.



# आसाम, उत्तराखंडमध्ये पूरस्थिती गंभीर

## चारधाम यात्रा स्थगित; महामार्ग बंद, जनजीवन विस्कळीत



उत्तराखंडमध्ये मुसळधार पावसामुळे अनेक नद्यांना पूर आला असून, निवासी भागात पाणी शिरल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे



डेहराडून येथे मुसळधार पावसामुळे रस्त्याचा एक भाग कोसळला

**डेहराडून/गुवाहाटी, २८ जुलै**

देशाच्या पश्चिम आणि पूर्वोत्तर भागात पावसाने धुमाकूळ घातला आहे. जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंडसह, उत्तर प्रदेश आणि आसामात पुराने थैमान घातले. गेल्या ४८ तासांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे उत्तराखंडमधील जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक ठिकाणी झालेल्या भूस्खलनामुळे राष्ट्रीय महामार्ग बंद झाले असून, अनेक नद्या दुथडी भरून वाहत आहे. मसुरी, जॉली ग्रांट आणि उखीमठसह अनेक भागांमध्ये मुसळधार पाऊस सुरूच आहे. सततच्या पावसामुळे प्रशासनाने चारधाम यात्रा दोन दिवसांसाठी तात्पुरती स्थगित केली आहे.

भूस्खलनामुळे ढिगारे पडले असून, केदारनाथ, बद्रीनाथ आणि यमुनोत्री महामार्ग अनेक ठिकाणी बंद करण्यात आले. नद्या आणि ओढे दुथडी भरून वाहत आहेत, अनेक ठिकाणी ढिगारे आणि दगडांमुळे रस्ते बंद झाले. डेहराडूनमधील नंदा की चौकीजवळ १६ कोटींच्या खर्चातून नुकताच बांधण्यात आलेला पूल पावसात वाहून गेला. सुरक्षेच्या कारणास्तव पुलावरील वाहतूक थांबवण्यात आली आहे. यमुनोत्रीच्या पायी चालण्याच्या मार्गाचा काही भाग खचल्याने, महामार्गावर मोठा दगड कोसळून दोन यात्रेकरू जखमी झाल्याने, आणि टिहरीमधील नऊ ग्रामीण रस्ते बंद झाल्याने रहिवाशांच्या अडचणी वाढल्या आहेत. डोईवाला-भानियावाला भागातील मार्ग पुरामुळे बंद आहे.

**बद्रीनाथ महामार्ग बंद**

देहरादूनमध्ये भूस्खलन, झाडे कोसळणे आणि पाणी साचल्याच्या घटना समोर आल्या, तर चमोलीतील २१ ग्रामीण रस्ते बंद झाले आहेत आणि कांचन गंगा नाल्याजवळील ढिगाऱ्यांमुळे बद्रीनाथ महामार्ग बंद आहे. सौदा सरोली आणि मालदेवता भागात रस्त्यांवर ढिगारे साचले आहेत. सहस्त्रधारा येथे एक रस्ता खचल्याने येथील वाहतूक विस्कळीत झाली आहे.

**हिमाचलमध्ये परिस्थिती बिकट; एकाच कुटुंबातील पाच सदस्यांचा मृत्यू**

हिमाचल प्रदेशात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक जिल्ह्यांतील जनजीवन विस्कळीत झाले आहे. चंबा, शिमला, मंडी, कांग्रा, सोलन आणि सिरमौर येथे भूस्खलन, अचानक आलेला पूर, पाणी साचणे आणि रस्ते बंद झाल्याच्या घटना घडल्या. चंबा जिल्ह्यातील भरमौर-पठाणकोट राष्ट्रीय महामार्गावरील लाहादजवळ झालेल्या एका भीषण रस्ते अपघातात एकाच कुटुंबातील पाच सदस्यांचा मृत्यू झाला. एक अल्टो कार अनियंत्रित होऊन खोल दरीत कोसळली.

**६३१ गावे पाण्याखाली, ४५८ लोकांना सुरक्षितपणे वाचवले**

आसाम आणि नागालँडच्या पूरग्रस्त भागांमध्ये भारतीय हवाई दल आपली मानवतावादी व आपत्कालीन मदत मोहीम सुरूच आहे. राज्यातील ६३१ गावे पाण्याखाली असून १८४ शिबिरे आणि वितरण केंद्रांमार्फत मदतकार्य सुरू आहे.आतापर्यंत सुमारे २८,७०० लोकांना आधार देण्यात आला आहे. (वृत्तसंस्था)

### आसाममध्ये हाहाकार: आमदार देणार एक महिन्याच्या पगार

आसामच्या विविध भागांतील पूर परिस्थितीसंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी राज्यातील खासदारांसोबत बैठक घेतली. आसामच्या शिवसागर जिल्ह्यातील पूरस्थिती अधिकच गंभीर झाली आहे.नौजन गावात पुराचे पाणी घरांमध्ये शिरले आहे. असून रस्ते पाण्याखाली गेले आहे.त्यामुळे शेकडो कुटुंबे निवारा, अन्न आणि सुरक्षित पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करत आहेत.दरम्यान, आसामच्या आमदारांनी एक मोठा निर्णय घेतला. रायजोर दलाचे आमदार वगळता सर्व आमदारांनी राज्यातील पूरग्रस्तांना मदत आणि पुनर्वसनासाठी एक महिन्याचा पगार देतील, अशी घोषणा केली आहे.

# १८ वर्षांखालील निदर्शकांची सुटका करा

**नीट आंदोलनप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाचा आदेश**

**नवी दिल्ली, २८ जुलै**

नीट परीक्षांमधील झालेल्या अनियमिततांच्या विरोधात नुकत्याच झालेल्या विद्यार्थी आंदोलनात सहभागींवर कोणतीही कठोर कारवाई केली जाऊ नये तसेच कोणतेही गुन्हे नसलेल्या १८ वर्षांखालील निदर्शकांची सुटका करा, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला.

या प्रकरणाच्या तपासासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखालील विशेष तपास पथक स्थापन केले जाऊ शकते, असे संकेत न्यायासनाने दिले. परीक्षांमधील अनियमितता आणि नीट पेपरफुटीच्या विरोधातील निदर्शनांदरम्यान झालेल्या पोलिस अत्याचारांचे आरोप करणाऱ्या याचिकांवर सुनावणी करताना सरन्यायाधीश सूर्य कांत प्रमुख असलेल्या न्यायासनाने या प्रकरणी निष्पक्ष आणि स्वतंत्र चौकशीची आवश्यकता असल्याचे म्हटले.

सुरू असलेल्या निदर्शनांच्या संदर्भात अटक किंवा ताब्यात घेण्यात आलेल्या आणि ज्यांची कोणतीही गुन्हेगारी पृष्ठभूमी नाही, अशा १८ वर्षांखालील मुलांना मुक्त करण्याचा निर्देश सर्व राज्यांना देण्यात येत आहेत, असा आदेश न्यायासनाने दिला.

खरोखरच गरज भासल्यास या मुलांना स्वतःला किंवा त्यांच्या कुटुंबीयांच्या साध्या बंधपत्रावर मुक्त केले जावे, विशेषतः जेव्हा जामिनासाठी तशी अट घातली जाते, तेव्हा हे करणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने म्हटले. ज्या कोणी अतिरेक केला असेल किंवा कायदा हातात घेतला असेल, त्यांना जाब विचारला गेला पाहिजे. आंदोलकांवर पेलेट गन्स, खिळे लावलेल्या काठ्या रबराच्या गोळ्या आणि इलेक्ट्रिक बॅटन्सचा वापर केल्यामुळे अनेक विद्यार्थी तरुणींना जीवघेण्या स्वरूपाच्या गंभीर दुखापती झालेल्या आरोपांची दखलही न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. व्ही. मोहना यांचाही समावेश असलेल्या न्यायासनाने घेतली. (वृत्तसंस्था)

# नेपाळ, बांगलादेश घडविण्याचा डाव उधळून लावू

**संजय राऊत, रोहित पवारांवर भाजपाची टीका**

**मुंबई, २८ जुलै**

देशातील तरुणाईच्या रक्तात देशभक्ती भिनलेली असून, ती खंबीरपणे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाठीशी उभी आहे. मात्र, विद्यार्थ्यांच्या प्रश्नांशी कोणतेही देणेघेणे नसलेले संजय राऊत, उबाठा गट आणि विरोधक विद्यार्थ्यांची माथी भडकवून देशात नेपाळ आणि बांगलादेशसारखी अराजकता निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांचा हा देशविघातक डाव कधीही यशस्वी होऊ देणार नाही, असा घणाघाती प्रहार भाजपाचे प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी केला. विद्यार्थ्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून स्वतःची राजकीय पोळी भाजणाऱ्यांचा खरा चेहरा आता उघड झाला असल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

संसदेतील चर्चेपासून पळ काढणाऱ्या राहुल गांधींचे अनुकरण संजय राऊत करत आहेत. साठ वर्षांत ज्यांना कलम ३७० हटवता आले नाही, ते केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी करून दाखवले. देशात वंदे मातरम् सक्तीचे केल्यावर विरोधकांच्या पोटात दुखू लागले आहे, कारण त्यांची निष्ठा भारतासोबत नसून पाकिस्तान आणि मदरशांसोबत आहे. स्वतःच्या घरचा भांडुपचा वॉर्ड ज्यांना जिंकता आला नाही, त्यांनी देशपातळीवर भाष्य करू नये. उद्धव ठाकरे यांच्या अहंकाराची लंका महाराष्ट्रातील जनतेने आधीच जाळून खाक केली आहे, असा टोलाही त्यांनी लगावला. (तभा वृत्तसेवा)

### काँग्रेस आणि रोहित पवारांचे षडयंत्र

नीट पेपरफुटीच्या प्रकरणातील आरोपीला अटक झाल्यानंतर, आपण काँग्रेसचे नेते अमित देशमुख यांचे कार्यकर्ते असल्याचे त्याने स्वतः जाहीर सभेत सांगितले होते. मात्र, यावर संजय राऊत जाणीवपूर्वक मौन बाळगून आहेत. एमपीएससीचा पेपर फुटल्याची अफवा पसरवून राज्यात विद्यार्थ्यांच्या आडून दंगली घडवण्याचा आणि पोलिसांवर हल्ले करण्याचा रोहित पवारांचा कुटील डाव आहे. एमपीएससीच्या अध्यक्षांनी आणि स्वतः विद्यार्थ्यांनीच हे आरोप फेटाळून लावल्यानंतरही, आता एमएस-सीईटीच्या विद्यार्थ्यांना भडकावण्याचे षड्यंत्र रचले जात आहे. मात्र, राज्य सरकार सक्षम असून दंगेखोरांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा बन यांनी दिला.



वाराणसी येथे कवी-संत गुरू रविदास यांच्या ६५० व्या जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या 'कलश यात्रेत सहभागी झालेल्या महिला

## पत्रकारितेतील भीष्मपितामह लक्ष्मणराव जोशी कालवश

(पान ३ वरून)

तरुण भारतमध्ये सर्वाधिक काळ कार्य केले. त्यानंतर गोमंतक, गोवादूत, जळगाव तरुण भारत, मुंबई तरुण भारत येथेही त्यांनी संपादकपद भूषविले. नागपूरच्या लोकशाही वार्ता या दैनिकातही मुख्य संपादक म्हणून त्यांनी जबाबदारी पार पाडली. पत्रकारितेतील प्रामाणिकपणा, निर्भीड लेखन आणि सामाजिक बांधिलकीची परंपरा त्यांनी प्रकर्षाने जपली. त्यांच्या लेखणीने अनेक सामाजिक विषयांना प्रभावीपणे वाचा फफोडली. पत्रकारांच्या अनेक पिढ्या त्यांनी घडविल्या. वृत्तपत्रीय लेखनशैलीचे, वैचारिक चिंतनाचे, संतुलित दृष्टिकोनाचे व माध्यम अनुशासनाचे धडे व संस्कार त्यांनी अनेकांवर केले. भारताचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या हस्ते त्यांना 'पांचजन्य' पुरस्काराने गौरविण्यात आले होते. त्यांचे 'गावोगावी' हे आत्मचरित्र तसेच "सारांश' हे आणखी एक पुस्तक प्रकाशित झाले आहे. त्यांची अन्त्ययात्रा बुधवार, २९ जुलै रोजी सकाळी १०.३० वाजता पुखराज ट्युलिप अपार्टमेंट्स, सहकारनगर, नागपूर, येथील निवासस्थानावरून निघून सहकार नगर घाटावर जाईल. तेथे त्यांच्या पार्थिवावर अन्त्यसंस्कार करण्यात येतील.

### समाजमन घडविण्याचे कार्य केले

नागपुरातील ज्येष्ठ पत्रकार आणि संपादक लक्ष्मणराव जोशी यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद आहे. त्यांनी आपल्या लेखणीतून समाजमन घडविण्याचे कार्य केले, तसेच असंख्य पत्रकारांना मार्गदर्शन करत त्यांनी मूल्याधिष्ठित पत्रकारितेची समृद्ध परंपरा जपली. त्यांच्या निधनाने मराठी पत्रकारिता क्षेत्राने एक ज्येष्ठ, अभ्यासू आणि तत्त्वनिष्ठ व्यक्तिमत्त्व गमावले आहे.

**देवेंद्र फडणवीस**, मुख्यमंत्री

### सत्याधिष्ठित लिखाण करणारे संपादक

वृत्तपत्र क्षेत्रात आपले सत्याधिष्ठित लिखाण व आवश्यक मार्गदर्शन करणारा ज्येष्ठ संपादक काळाच्या पडद्याआड गेला, याचे अतीव दुःख आहे. त्यांच्या निधनाने कधीही भरून न येणारी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या लेखणीला सत्याचे अधिष्ठान होते. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**डॉ. विलास डांगरे**, अध्यक्ष,
श्री नरकेसरी प्रकाशन लिमिटेड

### पत्रकारितेत प्रचंड योगदान

लक्ष्मणराव जोशी यांनी दै. तरुण भारतचे मुख्य संपादक म्हणून अतिशय प्रभावीपणे कार्य केले. मुंबई तरुण भारतचे संपादक म्हणूनही त्यांनी उत्तमपणे जबाबदारी पार पाडली. पत्रकारितेच्या क्षेत्रात त्यांनी दिलेले प्रचंड योगदान कधीही विसरता येणार नाही.

**अनिल दांडेकर**, कार्यकारी अध्यक्ष
श्री नरकेसरी प्रकाशन लिमिटेड

### तरुण भारत परिवार ज्येष्ठ मार्गदर्शकास मुकला

लक्ष्मणराव जोशी यांच्या निधनामुळे तरुण भारत परिवार ज्येष्ठ मार्गदर्शकास मुकला आहे. लक्ष्मणरावांनी दीर्घ काळ तरुण भारतमध्ये सेवा दिली. कनिष्ठ पातळीवरील सहकारी ते मुख्य संपादक आणि प्रबंध संचालक अशा विविध भूमिकांत त्यांनी तरुण भारतसाठी कार्य केले. सव्यसाची आणि परखड पत्रकारिता आणि स्पष्टवादी लेखनासाठी बृहन्महाराष्ट्रात ख्यातकीर्त असलेले लक्ष्मणराव अखेरपर्यंत तरुण भारतात मार्गदर्शन करीत होते. विशेषतः, तरुण भारतच्या शताब्दी पर्वात-त्यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. संस्थेच्या प्रवासातील अनेक ऐतिहासिक प्रसंग त्यांनी सांगितले. पत्रकारितेच्या क्षेत्रातील या पितृतुल्य व्यक्तिमत्त्वास आम्ही कधीही विसरणार नाही. त्यांच्या स्मृतींना भावपूर्ण श्रद्धांजली.

**धनंजय बापट**, प्रबंध संचालक
श्री नरकेसरी प्रकाशन लिमिटेड

### हिंदुत्वाच्या प्रदीर्घ यात्रेत महत्त्वाची भूमिका

तरुण भारतचे माजी मुख्य संपादक लक्ष्मणराव जोशी यांच्या निधनाने नागपुरातील एका कर्मठ पत्रकारास आपण गमावले आहे. गेली कित्येक वर्ष त्यांनी पत्रकारिता क्षेत्रात अत्यंत मार्मिक कार्य केले. संघ विचारांना समाजात समर्थपणे पोहोचवण्यासाठी ते शेवटपर्यंत सक्रिय राहिले. त्यांच्या स्मृतींना विनम्र श्रद्धांजली.

**सुनील आंबेकर**
रा. स्व. संघाचे अ. भा. प्रचार प्रमुख

### संतोषी बजाज यांचे निधन



**मंगळवेढा, दि. २८ जुलै-**

कुंभार गल्ली येथील संतोषी नारायण बजाज (वय ४७) यांचे मंगळवार दि २८ जुलै रोजी रात्री ८.०० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचे पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी, सासू, सासरे, दीर असा परिवार आहे. चोखामेळा चौकातील कन्हैया ड्रेसेसचे मालक व गणेश परिवारचे सदस्य नारायण हरीकिसन बजाज यांच्या त्या पत्नी होत्या. बुधवारी सकाळी दहा वाजता मारवाडी समाज स्मशानभूमी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.

# घटस्फोटानंतरही पत्नीचे हक्क कायम

## गुजरात उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल



**अहमदाबाद, २८ जुलै**

कौटुंबिक न्यायालयाकडून घटस्फोटाचा आदेश मिळाल्यानंतर पतीचा मृत्यू झाल्यावरही पत्नीचे कायदेशीर हक्क संपुष्टात येणार नाहीत, असा महत्त्वपूर्ण निकाल गुजरात उच्च न्यायालयाने विवाह, घटस्फोट आणि वारसा हक्कांबाबत दिला आहे. उच्च न्यायालयाच्या मते, घटस्फोटाची प्रकरणे केवळ वैवाहिक संबंध तुटण्यापुरती मर्यादित नाहीत. त्याचा थेट परिणाम महिलेच्या सामाजिक ओळखीवर विधवा म्हणून तिच्या कायदेशीर दर्जावर आणि पतीच्या मालमत्तेतील तिच्या वाट्यावर (वारसा हक्क) होतो. त्यामुळे, पतीच्या मृत्यूनंतरही कायदेशीर अपील करण्यास मनाई राहणार नाही. तसेच योग्य वाटल्यास उच्च न्यायालय कौटुंबिक न्यायालयाचा घटस्फोटाचा निर्णय रद्दही करू शकते.

हे संपूर्ण प्रकरण आनंद जिल्हा कौटुंबिक न्यायालयाशी संबंधित आहे. याचिकाकर्ती महिला आणि तिचा पती यांच्यात दीर्घकाळापासून वैवाहिक वाद सुरू होता. त्यांचे लग्न १९७६ मध्ये झाले होते. त्यांना सहा मुले आहेत. पत्नीने परित्याग केल्याचा आरोप करत पतीने घटस्फोट कायदा, १८७९ अंतर्गत घटस्फोटासाठी याचिका दाखल केली.

पत्नी कौटुंबिक न्यायालयाच्या कामकाजात अनुपस्थित असल्यामुळे न्यायालयाने २०२२ मध्ये पतीच्या बाजूने एकतर्फी घटस्फोटाचा हुकूमनामा जारी केला. त्यानंतर पत्नीने गुजरात उच्च न्यायालयात या निर्णयाला आव्हान दिले. अपील प्रलंबित असताना २०२४ मध्ये पतीचे निधन झाले. त्यानंतर त्याच्या कायदेशीर वारसांना या खटल्यात पक्षकार बनवण्यात आले.

**याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद**

याचिकाकर्त्यांचे वकील, आकाश मोड यांनी उच्च न्यायालयात असा युक्तिवाद केला की, कौटुंबिक न्यायालयाने पुरेशा आणि विश्वासार्ह पुराव्याशिवाय पत्नीने पतीचा त्याग केला आहे, असे गृहीत धरले होते. केवळ पतीच्या एकतर्फी विधानांवर आधारित असा निर्णय कायदेशीररित्या अवैध आहे.

**न्यायालयाने काय म्हटले ?**

सामान्यतः खटल्याच्या सुनावणीदरम्यान एखाद्या पक्षकाराचा मृत्यू झाल्यास प्रकरण बंद केले जाऊ शकते. परंतु घटस्फोटाचा हुकूमनामा पारित झाल्यानंतर परिस्थिती पूर्णपणे बदलते. हुकूमनाम्यानंतर कायदेशीर स्थितीत होणाऱ्या बदलाचा थेट परिणाम मालमत्तेच्या हक्कांवर आणि सामाजिक प्रतिष्ठेवर होतो. त्यामुळे अशा परिस्थितीत, मृत्यूनंतरही कायदेशीर कार्यवाही सुरू राहू शकते आणि पीडित पक्षकाराला कौटुंबिक न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देण्याचा पूर्ण अधिकार आहे, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. (वृत्तसंस्था)

# १६ जहाल माओवाद्यांचे आत्मसमर्पण

### सहा जणांच्या शिरावर ३९ लाख रुपयांचे बक्षीस

**रांची, २८ जुलै**

येथे १६ जहाल माओवाद्यांनी मंगळवारी झारखंड पोलिसांसमोर शरणागती पत्करली. यापैकी सहा जणांच्या शिरावर ३९ लाख रुपयांचे बक्षीस ठेवण्यात आले होते, अशी माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

शरणागती पत्करलेल्यांमध्ये १२८ प्रकरणांमध्ये हवा असलेला आणि शिरावर १५ लाख रुपयांचे बक्षीस असलेल्या संतोष उर्फ बासुदेव उर्फ दिलीपचा समावेश आहे. १६ पैकी सहा माओवाद्यांवर एकूण ३९ लाख रुपयांचे बक्षीस होते. पाच महिला माओवाद्यांनीही शरणागती पत्करली आहे. यात एक प्रादेशिक समिती आणि विभागीय समितीच्या सदस्याचा समावेश असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. शरणागती पत्करणाऱ्यांमध्ये दोन उपविभागीय समिती सदस्य आणि दोन क्षेत्रीय समितीचे अधिकारी होते. प्रतिबंधित सीपीआय (माओवादी) संघटनेच्या प्रादेशिक समितीचे सदस्य संतोष महतो यांचे आत्मसमर्पण ही झारखंड पोलिसांची एक मोठी उपलब्धी आहे, असे अधिकाऱ्याने सांगितले. विविध जिल्ह्यांमधील १२८ प्रकरणांमध्ये संतोषचा शोध घेतला जात होता. १ मार्च रोजी मनोहपूर, छोटानगर आणि झारियाकेला या सीमावर्ती पोलिस ठाण्यांच्या हद्दीतील जंगलात झालेल्या आयईडी स्फोटात सहभागी असल्याचा आरोप त्याच्यावर होता. (वृत्तसंस्था)




CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | बुधवार, २९ जुलै २०२६

# ‘ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट’चा पाया ढासळला; मोठी खळबळ

## रिक्षाचालकाने उघडकीस आणले डिग्री रॅकेट




**पुणे, २८ जुलै**


काही वर्षांपूर्वीपर्यंत विद्येचे माहेरघर अशी ख्याती असलेल्या पुण्याच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात पैसे घेऊन बनावट डिग्री प्रमाणपत्र देत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. महेश कदम हे रिक्षा चालक असून त्यांनी हा प्रकार विद्यापीठ प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिला आहे. या प्रकारामुळे शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

महेश कदम हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आपल्या मुलाच्या उच्च शिक्षणासंदर्भात चौकशी करण्यासाठी गेले होते. त्यावेळी वित्त व लेखा विभागातील रमेश मुखेकर यांनी अन्य ३ ते ४ साथीदारांसह कदम यांची भेट घेतली. ३ लाख रुपयांत बी. कॉम.ची डिग्री सर्टिफिकेट देण्याचे कबूल केले. कदम यांनी मान्य केल्यानंतर मुखेकर आणि त्यांच्या साथीदारांनी युनिव्हर्सिटी ऑफ पुणे अशा नावाचे बनावट सर्टिफिकेट कदम यांना दिले. बी. कॉम. डिग्री या सर्टिफिकेटवर नमूद करण्यात आली. युनिव्हर्सिटी ऑफ पुणे अशा नावाचे सर्टिफिकेट बघून महेश कदम यांना संशय आला. त्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ असे नाव असताना, युनिव्हर्सिटी ऑफ पुणे या नावाने डिग्री सर्टिफिकेट का देता, अशी विचारणा केली. मुखेकर यांनी कदम यांना वेगळ्या वर्षांचे चार डिग्री सर्टिफिकेट दिल्याचे समोर आले आहे. कदम यांनी ही बाब विद्यापीठ प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली आहे.

या संदर्भात कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडे लेखी तक्रार करण्यात आली आहे. मुखेकर आणि अन्य कर्मचाऱ्यांची खाते अंतर्गत चौकशी सुरू झाली असून दोषी आढळणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करणार असल्याचे विद्यापीठ प्रशासनाने सांगितले आहे. काही वर्षांपूर्वी सुरक्षा रक्षक पुरवठा करणाऱ्या कंपनीने आपण पुणे विद्यापीठासोबत संलग्न असल्याचे सांगितले होते. पण, सुरक्षा रक्षक सेवा घेणाऱ्या काही बहुराष्ट्रीय कंपन्यांनी विद्यापीठाला संपर्क केल्यानंतर त्या कंपनीने संकेतस्थळावरून विद्यापीठाचे नाव काढून टाकले होते. ‘ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट’ अशी ओळख असणाऱ्या विद्यापीठाबाबत मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू आहे. आंतरराष्ट्रीय विद्यार्थिनींच्या वसतिगृहात ऑनलाइन डिलिव्हरी करणारा मुलगा थेट प्रवेश करतो. यावरून मोठ्या प्रमाणात गदारोळ झाला होता. विद्यापीठाच्या आवारात दारू पार्टीज होत असल्याचे वारंवार समोर आले आहे आहे. आता बनावट डिग्री प्रकरणाने विद्यापीठाचे नाव वेगळ्याच पद्धतीने चर्चेत येत आहे. ◂ (तभा वृत्तसेवा)

> सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासारख्या नामांकित आणि ऐतिहासिक संस्थेत बनावट पदवीचा गैरप्रकार उघडकीस येणे, ही अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक बाब आहे. लाखो विद्यार्थी प्रामाणिकपणे कष्ट करून, वर्षानुवर्षे अभ्यास करून पदवी मिळवतात. मात्र प्रशासनातील लोकांच्या लाचखोरीमुळे आणि प्रशासनाच्या ढिसाळपणामुळे जर पदव्या विकल्या जात असतील, तर हा कष्टकरी विद्यार्थ्यांच्या भविष्याशी आणि विद्यापीठाच्या प्रतिष्ठेशी चाललेला क्रूर खेळ आहे.
>
> **– शिवा बारोळे**
> अखिल भारतीय विद्यार्थी परिषद

## विचारपुष्प



> अत्यंत विकसित अशी कुटुंबव्यवस्था ही हिंदू समाजजीवनाची विशेषता आहे. जन्मापासूनच संयम, अनुशासन आणि संस्कारयुक्त धर्मपालनाच्या सवयीमुळेच हे शक्य होत आले आहे.
>
> **– स्व. हो. वे. शेषाद्री**
> रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

## आज गुरुपौर्णिमा





मंगळवारी दुपारी साडेबाराच्या सुमारास सुरू झालेल्या जोरदार पावसाने अवघे नागपूर जलमय झाले. केवळ अडीच तासांत १०८.१ मिमी पाऊस कोसळल्याने सर्वच प्रमुख रस्त्यांवर १ ते २ फूट पाणी साचले

## शुक्रवारपर्यंत राज्यात मुसळधार

**मुंबई :** बंगालच्या उपसागराकडून येणाऱ्या एका कमी दाबाच्या पट्ट्याच्या प्रभावामुळे राज्यातील विविध भागांत २९ ते ३१ जुलैदरम्यान पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. या कालावधीत विदर्भ, उत्तर मराठवाडा, खानदेश, कोकण तसेच मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात मुसळधार पावसाची शक्यता आहे. या काळात अतिवृष्टीसदृश पावसाच्या घटना घडण्याची शक्यता आहे.

# अवैध उत्खनन केल्यास १० पट दंड

## मंत्रिमंडळ निर्णय; माफियांचे धाबे दणाणणार



**मुंबई, २८ जुलै**

वाळू आणि इतर गौण खनिजांचे बेकायदेशीरपणे उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांविरोधात कडक कारवाई करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. अशा अवैध प्रकरणांमध्ये आता थेट ‘स्वामित्वधनाच्या (रॉयल्टी) १० पट’ दंड आकारण्याचे मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत निश्चित करण्यात आले. यामुळे वाळू आणि गौण खनिजांचे अवैध उत्खनन करणाऱ्या माफियांचे धाबे दणाणले आहे.

या कठोर कारवाईसाठी ‘महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६’ मधील कलम ४८(७) मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. सध्या विधिमंडळाचे अधिवेशन सुरू नसल्यामुळे या सुधारणेचा थेट अध्यादेश काढण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. या नव्या दंडात्मक तरतुदीमुळे अवैध उत्खननाला प्रभावी आळा बसेल आणि राज्याच्या महसुलातही मोठी वाढ होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

**लोकप्रतिनिधींना दिलासा**

ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेवर निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना राज्य सरकारने मोठा दिलासा दिला आहे. आता या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राखीव जागांवर निवडून आलेल्या सदस्यांना आपले जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी १२ महिन्यांची मुदत दिली जाणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

‘महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९’ आणि ‘महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१’मध्ये सुधारणा करण्यासाठी अध्यादेश काढण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी किंवा त्यानंतर झालेल्या सार्वत्रिक व पोटनिवडणुकीत निवडून आलेल्या उमेदवारांना हा निर्णय लागू राहील. मात्र, निर्धारित १२ महिन्यांच्या मुदतीत प्रमाणपत्र सादर न केल्यास संबंधित सदस्याची निवड पूर्वलक्षी प्रभावाने रद्द मानली जाईल आणि पदावर राहण्यास अपात्र ठरतील, अशी तरतूद आहे. ◂ (तभा वृत्तसेवा)

## महत्त्वाचे

### चढ-उतारानंतर बाजार ‘जैसे थे’

**मुंबई :** मागील सत्रात झालेल्या जोरदार घसरणीनंतर मंगळवारी भारतीय शेअर बाजाराचे निर्देशांक जवळपास स्थिर पातळीवर बंद झाले. आयटी, ऑटो आणि रिअल्टी क्षेत्रातील समभागांना मिळालेल्या मागणीमुळे बाजाराला काहीसा आधार मिळाला, तरीही ऊर्जा, एफएमसीजी, मेटल आणि बँकिंग क्षेत्रातील घसरणीमुळे हा फायदा मर्यादित राहिला. आशियाई बाजारातील मंदीच्या सावटामुळे आणि सेमीकंडक्टरशी संबंधित समभागांमधील विक्रीमुळे मंगळवारी भारतीय बाजाराची सुरुवात काहीशी मंद झाली. संपूर्ण दिवसभर बाजार एका ठराविक मर्यादेतच व्यवहार करत राहिला. दिवसभराच्या व्यवहारानंतर सेन्सेक्स ६९.८६ अंकांनी म्हणजेच ०.०९ टक्क्यांनी घसरून ७६,७६५.९२ वर बंद झाला, तर निफ्टी १०.६० अंकांनी म्हणजेच ०.०४ टक्क्यांनी घसरून २३,९८५.३५ च्या पातळीवर स्थिरावला. विस्तृत बाजाराचा विचार करता संमिश्र चित्र पाहायला मिळाले. निफ्टी मिडकॅप १०० निर्देशांकाने ०.१ टक्क्यांची किरकोळ वाढ नोंदवली, तर दुसरीकडे निफ्टी स्मॉलकॅप १०० निर्देशांकात ०.२ टक्क्यांची घसरण पाहायला मिळाली.

**ताज्या घडामोडी**
क्षणाक्षणाला मिळविण्यासाठी **तरुण भारत पोर्टलला भेट द्या** किंवा ९८८१०११६६२ व्हॉट्सअॅप क्रमांकावर संपर्क साधा. सोबत असलेला क्यूआर कोड स्कॅन करा आणि रहा **क्षणाक्षणाला अपडेट!**



ईश्वराप्रति असलेला भाव आणि भक्तीला कुठल्याही सीमा नसतात. उत्तर भारतात श्रावण महिन्याला अत्यंत पवित्र मानतात. उत्तरप्रदेशातील मेरठ शहरातील आरती आणि उषा सासूबाईंना कावडीवर बसवून गंगाजल आणण्यासाठी निघाल्या आहेत



# दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याचा प्रश्नच नाही


## शरद पवारांनी दिला चर्चेला पूर्णविराम

**बारामती, २८ जुलै**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या संभाव्य विलिनीकरणाबाबत सुरू असलेल्या राजकीय चर्चांना राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी आज स्पष्ट शब्दांत पूर्णविराम दिला. ‘दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्याचा प्रश्नच उद्भवत नाही,’ असे त्यांनी बारामती येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना स्पष्ट केले. गेल्या काही दिवसांपासून शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष राष्ट्रीय लोकशाही आघाडीत (एनडीए) सहभागी होणार असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. त्यातच संसदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पवारांनी घेतलेली भेट, त्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत दोन्ही गटांतील काही नेत्यांची भेट, तसेच अजित पवार गटाचे नेते पार्थ पवार आणि प्रफुल्ल पटेल यांनी शरद पवार यांची भेट घेतल्याने विलिनीकरणाच्या चर्चांना उधाण आले होते.

बारामती येथे माध्यमांनी या चर्चांबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना शरद पवार यांनी सर्व शक्यता फेटाळून लावल्या. त्यांच्या या भूमिकेमुळे दोन्ही गटांच्या विलिनीकरणाबाबत सुरू असलेल्या चर्चांना पूर्णविराम मिळाल्याचे मानले जात आहे. दरम्यान, शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बारामतीला येण्याचे निमंत्रण दिले आहे. विद्या प्रतिष्ठानच्या नक्षत्र गार्डनमध्ये उभारण्यात येत असलेल्या गौतम बुद्धांच्या पुतळ्याचे अनावरण पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते व्हावे, अशी त्यांची इच्छा आहे. ◂ (तभा वृत्तसेवा)

# पत्रकारितेतील भीष्मपितामह लक्ष्मणराव जोशी कालवश




**नागपूर, २८ जुलै**

पत्रकारितेच्या क्षेत्रातील तपस्वी मानले जाणारे दैनिक तरुण भारतचे माजी मुख्य संपादक, राजकीय-सामाजिक विषयांचे विश्लेषक आणि निःस्पृह व्यक्तिमत्त्वाचे लक्ष्मण त्र्यंबक जोशी यांचे मंगळवार, २८ जुलै रोजी दुपारी २ वाजता देवनगर येथील खाजगी रुग्णालयात निधन झाले. ते ८९ वर्षांचे होते. त्यांच्यामागे पत्नी उर्मिला तसेच अंजली प्रकाश मुळावकर व देवयानी संदीप भोपे या कन्या, नातवंडे आणि बराच मोठा आप्तपरिवार आहे.

मूळ पाथर्डी (ता. तेल्हारा) येथील असलेल्या लक्ष्मणरावांनी १९६७ साली दै. तरुण भारतमध्ये पत्रकारितेला प्रारंभ केला. त्याआधी पाच वर्षे त्यांनी भिकमचंद खंडेलवाल विद्यालयात शिक्षक म्हणून कार्य केले. पत्रकारितेतील आपल्या प्रदीर्घ कारकीर्दीत त्यांनी

(पान २ वर)

> व्रतस्थ व आदर्श पत्रकारिता जपलीज्येष्ठ पत्रकार, संपादक लक्ष्मणराव जोशी यांनी अनेक दशके व्रतस्थ आणि आदर्श पत्रकारिता केली. त्यांनी अनेक पत्रकारांना घडविले व त्यांच्या लेखणीला धार देण्याचे काम केले. त्यांच्या निधनाने मराठी पत्रकार सृष्टीचे मोठे नुकसान झाले आहे. त्यांना माझी भावपूर्ण श्रद्धांजली.
>
> **– नितीन गडकरी**
> केंद्रीय मंत्री



पावसाळी अधिवेशन

# युवकांच्या भविष्याशी कोणालाही खेळू देणार नाही : डॉ. जितेंद्रसिंह

## लोकपरीक्षा दुरुस्ती विधेयक-२०२६ वर वादळी चर्चा

**नवी दिल्ली, २८ जुलै**

भारतमातेच्या सुपुत्रांच्या भविष्याशी मोदी सरकार कोणालाही खेळू देणार नाही, असा खणखणीत निर्वाळा विज्ञान आणि तंत्रज्ञान तसेच पंतप्रधान कार्यालयातील राज्यमंत्री डॉ. जितेंद्रसिंह यांनी मंगळवारी लोकसभेत दिला.

लोकपरीक्षा (अनुचित प्रकाराला आळा घालणे) दुरुस्ती विधेयक २०२६ वर लोकसभेत चर्चा सुरु करतांना डॉ. जितेंद्रसिंह म्हणाले की, हे विधेयक म्हणजे स्वतंत्र भारताच्या इतिहासातील मैलाचा टप्पा ठरणार आहे, त्याचप्रमाणे हे विधेयक देशातील कोट्यवधी विद्यार्थी आणि तरुणांचे भविष्य सुरक्षित करण्याच्या मोदी सरकारच्या दृढनिर्धाराचे प्रतिकही आहे. हे विधेयक म्हणजे २०२४ मध्ये पारित केल्या गेलेल्या विधेयकाचे सुधारित आणि कठोर रुप आहे, याकडे लक्ष वेधत डॉ. जितेंद्रसिंह म्हणाले की, २०२४ मध्ये पारित करण्यात आलेला कायदा स्वतंत्र भारताच्या इतिहासातील अशा प्रकारचा पहिलाच कायदा होता. काँग्रेस आणि संपुआ शासनकाळात घडलेल्या पेपरफुटीच्या घटनांचा तपशील डॉ. जितेंद्रसिंह यांनी सभागृहात सादर केला.

**पेपरफुटीच्या घटना कशा रोखणार : अखिलेश यादव**

मंदिरातील देणग्यांच्या चोऱ्या जे सरकार थांबवू शकले नाही, ते पेपरफुटीच्या घटना कशा थांबवू शकेल, असा प्रश्न समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव यांनी लोकसभेत विचारला. लोकपरीक्षा दुरुस्ती विधेयकावरील चर्चेत सहभागी होता यादव यांनी सरकारवर जोरदार हल्ला चढवला. एका प्रधानाला हटवून पंतप्रधानाला वाचवण्यात आले, असा टोलाही त्यांनी मारला. ◂ (तभा वृत्तसेवा)

# भीमा नदीकाठच्या गावांना हाय अलर्ट

**उजनी धरण ९९.७८ टक्के भरले**

**भीमा नदीत ६१,६०० क्युसेस पाणी**

**धरणात ५५,५८७ क्युसेस पाण्याची आवक**



**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २८ जुलै-**

भीमा खोऱ्यात सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे उजनी धरणातील पाण्याची आवक वेगाने वाढत असल्याने पूर नियंत्रणासाठी उजनी धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्याच्या विसर्गात मंगळवारी मोठी वाढ करण्यात आली आहे. सध्या धरणाच्या सांडव्यावरून ६० हजार क्युसेस तर वीजगृहातून १ हजार ६०० क्युसेस असा एकूण ६१ हजार ६०० क्युसेस पाण्याचा विसर्ग भीमा नदीपात्रात सुरु आहे. त्यामुळे भीमा नदीकाठच्या गावांना हाय अलर्ट जारी करण्यात आला.

उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे धरणात मोठ्या प्रमाणावर पाण्याची आवक सुरु आहे. दौंड नदी मापन केंद्रावरुन धरणात ५५,५८७ क्युसेक्स पाणी येत असून नदीची पाणीपातळी ५०१.११० मीटर इतकी नोंदविण्यात आली आहे. धरणाची सुरक्षितता आणि पूर नियंत्रण लक्षात घेऊन धरण व्यवस्थापन विभागाने विसर्गात मोठी वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे.

मंगळवारी सायंकाळी ६ वाजेपर्यंतच्या नोंदीनुसार उजनी धरणाची पाणीपातळी ४९६.८२० मीटर इतकी झाली. धरणातील उपयुक्त पाणीसाठा १,५१३.८५ दशलक्ष घनमीटर (५३.४६ टीएमसी) आहे. धरणाची उपयुक्त साठा क्षमता ९९.७८ टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. धरणातील एकूण पाणीसाठा ३,३१६.६६ दशलक्ष घनमीटर (११७.११ टीएमसी) असून जलसाठा क्षेत्र ३३६.०७ चौ.कि.मी. इतके झाले आहे.

धरणातून सध्या भीमा नदीपात्रात ६१ हजार ६०० क्युसेस पाण्याचा विसर्ग सुरु असतानाच मुख्य कालव्यातून २,५०० क्युसेस, टनेलमधून ९०० क्युसेस, सीना-माढा उपसा सिंचन योजनेतून २८० क्युसेस आणि दहिगाव उपसा सिंचन योजनेतून ९० क्युसेस पाणी सोडण्यात येत आहे.

**या गावातील नागरिकांनी सतर्क राहावे**

उजनी धरणातून मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात येत असल्याने आलेगाव, रुई, टाकळी, आलेगाव बु., रांजणी, गारअकोले, शेवरे, बेंबळे, मिटकलवाडी तसेच भीमा नदीकाठच्या इतर गावांतील नागरिकांनी विशेष सतर्क राहावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

**आवश्यकेनुसार विसर्गात बदल**

नागरिकांनी नदीपात्रात किंवा नदीकाठावर जाणे टाळावे. मासेमारी, पोहणे अथवा इतर कारणांसाठी नदीत उतरु नये. नदीपात्रातील जनावरे, शेती साहित्य, मोटारी, पंप व इतर वस्तू तातडीने सुरक्षित ठिकाणी हलवाव्यात. धरण व्यवस्थापन विभाग परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून असून आवश्यकतेनुसार विसर्गात बदल करण्यात येणार आहे, असे उजनी धरण व्यवस्थापनच्या भीमानगर विभागच्या कार्यकारी अभियंता सु.उ.उंबरे यांनी सांगितले.

# बांगलादेशात हिंदूंवरील अत्याचारात वाढ

## हत्येच्या २५७ घटना; महिलांची सुरक्षा धोक्यात

**ढाका, २८ जुलै**

जानेवारी ते जूनदरम्यान, बांगलादेशात हिंदू, अल्पसंख्याकांविरुद्ध जातीय हिंसाचाराच्या २५७ घटनांची नोंद झाली, ज्यात ४४ जणांचा मृत्यू झाला. महिला आणि मुलींवरील बलात्कार, हत्या आणि लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्येही चिंताजनक वाढ नोंदवली असल्याची माहिती बांगलादेश हिंदू बौद्ध ख्रिश्चन ऐक्य परिषदेच्या अहवालातून समोर आली.

सहा महिन्यात नोंदवलेल्या घटनांमध्ये खून, हल्ला, महिलांवरील हिंसाचार, अपहरण, जबरदस्तीने ताबा घेणे आणि धार्मिक स्थळांचे नुकसान यांचा समावेश आहे. अपहरण, खंडणी आणि छळाच्या १० घटनांचाही अहवालात उल्लेख आहे. अल्पसंख्याकांवरील हल्ले, धमक्या आणि छळाच्या ४२ घटनांची नोंद झाली. धार्मिक स्थळांना लक्ष्य करून झालेल्या हिंसाचाराच्या ६२ घटनांची नोंद झाली, ज्यात मूर्तींची तोडफोड, लूटमार आणि जाळपोळ यांचा समावेश आहे. धार्मिक संस्थांच्या जमिनींवर कब्जा करण्याचा किंवा त्या बळकावण्याचा प्रयत्न केल्याच्या पंधरा घटना घडल्या, आणि घरे व व्यावसायिक आस्थापनांवर हल्ले, तोडफोड, लूटमार आणि जाळपोळीच्या ४७ घटनांची नोंद झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले. ◂ (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख

# पत्रकारितेतील आधारवड कोसळला

महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या लोकमान्य टिळक पत्रकारिता जीवन गौरव सन्मानाचे मानकरी, तरुण भारतचे माजी मुख्य संपादक लक्ष्मणराव जोशी यांच्या निधनामुळे मागील पिढीतील माहितीचा कोष असलेला खंदा पत्रकार हरपला आहे. पत्रकारितेचा आधारवड कोसळला आहे. आपल्या आयुष्यातील जवळजवळ सात दशके त्यांनी पत्रकारितेत घालवली. त्यांच्या निधनाने सव्यसाची पत्रकारितेच्या एका युगाचा अस्त झाला आहे. वास्तविक लक्ष्मणरावांची पत्रकारिता सुरू झाली तेव्हाचा काळ हाताने बातम्या लिहिण्याचा होता. त्या कालखंडात उपसंपादक-वार्ताहर पदापासून प्रारंभ करत त्यांनी तरुण भारतचे मुख्य संपादकपद आणि तरुण भारतचे प्रकाशन करणाऱ्या श्री नरकेसरी प्रकाशन संस्थेचे प्रबंध संचालकपदही भूषविले होते. ते वयोमानाप्रमाणे निवृत्त झाले आणि त्यानंतर पत्रकारितेत संगणक युगाचा प्रारंभ झाला. पण निवृत्त झाल्यावरही लक्ष्मणरावांनी ज्या पद्धतीने या नवीन युगावर स्वतःची जबर मांड ठोकली, ते अनोखेच होते. निवृत्त झाल्यावर ते संगणकावर आणि मोबाईलवरही आपला मजकूर स्वतः टंकमुद्रित करून सर्वत्र पाठवित असत.

लक्ष्मणरावांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत करारी होते. पत्रकारितेच्या इतिहासात लक्ष्मणराव जोशींच्या नावाने एक घटना नोंदविली गेली आहे. ती अशी की, मनोरमा कांबळे प्रकरणात एका नेत्याने घेतलेली पत्रकार परिषद सर्व दैनिकांनी प्रकाशित केली. त्यात त्यांनी न्यायपालिकेला दोष दिला. ती बातमी प्रकाशित केल्याने कोर्टाचा अवमान झाल्याचा मुद्दा पुढे आला. त्या प्रकरणात त्या नेत्याने आणि इतर संपादकांनी माफी मागवून स्वतःला मोकळे करून घेतले. लक्ष्मणरावांनी मात्र वेगळी भूमिका घेतली. त्या नेत्याचे वक्तव्य आपण प्रकाशित केले यात आपला कोणताही दोष नाही, असे त्यांचे म्हणणे होते. अवमानाच्या प्रकरणात सत्य हा बचाव असू शकत नाही, या मुद्यावर कोर्ट उठेपर्यंत लक्ष्मणरावांना शिक्षा ठोठावण्यात आली आणि त्यांनी ती भोगली. असे होते लक्ष्मणराव!

लक्ष्मणराव मूळचे पाथर्डीचे. त्यांचे वडील त्र्यंबकराव भिक्षुकी करीत. त्यानंतर ते तेल्हारा येथे आले. तेल्हारा येथे त्यांचे शिक्षण झाले. खेडेगावातील भिक्षुकाच्या घरात त्या काळात अठरा विश्वे दारिद्र्याशिवाय काय असेल? लक्ष्मणरावांनी मॅट्रिक होईपर्यंत पायात चप्पलही घातली नव्हती. त्याच काळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे गारुड त्यांच्यावर झाले आणि ते स्वयंसेवक झाले. स्वयंसेवक, गटनायक, शिक्षक, मुख्य शिक्षक, कार्यवाह या विविध जबाबदाऱ्या सांभाळीत काम करू लागले. चांगली संधी मिळावी म्हणून ते अकोला येथे गेले आणि तेथील भिकमचंद खंडेलवाल विद्यालयात शिक्षक म्हणून काम करू लागले. काही काळाने संघ कार्याव्यतिरिक्त ते 'मातृभूमी' या दैनिकातही काम करू लागले. शांताराम सरदेशपांडे हे पत्रकारितेतील त्यांचे प्रारंभिक गुरू. अकोला येथे असताना त्यांनी संघाचे प्रथम आणि द्वितीय वर्ष पूर्ण केले होते. संघ व्यवस्थेतूनच ते नागपूरच्या तरुण भारतात उपसंपादक म्हणून रुजू झाले. नुकतेच लग्न झालेले लक्ष्मणराव परिवार घेऊन नागपुरात आले होते. त्यापूर्वी त्यांनी नागपूर बघितलेही नव्हते. साधी सायकल देखील त्यांच्याजवळ नव्हती. पण काही काळातच त्यांनी नागपुरात आपला जम बसविला. बर्डीवरील संगम चाळीत बाळासाहेब देवरस यांचे घर होते. तिथे प्रदीर्घकाळ त्यांचे वास्तव्य होते. पुढे ते तरुण भारताचे मुख्य वार्ताहर झाले आणि खाजगीरीत्या त्यांनी राज्यशास्त्रात एम.ए. केले. एका अभ्यासक्रमासाठी त्यांची निवड झाली आणि ते विकसनशील पत्रकारिता या विषयात प्रयोग करणारे विदर्भातले पहिले पत्रकार ठरले. पेंच प्रकल्पाचा बदलता चेहरामोहरा ही त्यांची मालिका महाराष्ट्रभर गाजली. एखाद्या प्रकल्पाच्या प्रारंभबिंदूपासून तो प्रकल्प पूर्णत्वाला जाईपर्यंत त्याचा पाठपुरावा करणे आणि ती मालिका पाच-सहा वर्षे चालविणे हे त्यांच्या विकासविषयक पत्रकारितेचे वैशिष्ट्य होते. विदर्भ-मराठवाड्यातील सिंचनाच्या विषयात ते तज्ज्ञ मानले जात. मा. गो. वैद्य आणि मामासाहेब घुमरे यासारख्या पत्रकारितेतील दोन दिग्गज गुरूंनी त्यांच्या पत्रकारितेला पैलू पाडले.

स्वभावाने लक्ष्मणराव जरासे शीघ्रकोपी होते. शांत झाल्यावर मात्र एखाद्या लहान मुलासारखा निरागस भाव त्यांच्या चेहऱ्यावर दिसे. आपली चूक झाली किंवा आपण एखाद्यावर उगाच रागावलो तर एखाद्या कनिष्ठ सहकाऱ्याचीही माफी मागायला त्यांना कधी कमीपणा वाटला नाही. वरिष्ठ म्हणून सहकाऱ्यांकडून काम करवून घेताना ते सहकाऱ्यांना पूर्ण मोकळेपणा देत असत. कुठेही वृत्त संकलनाला पाठवत, पण तो परत येईपर्यंत त्याची काळजी करीत असत. त्यांच्या काळात त्यांनी काँग्रेस, भाजपा या पक्षांची राष्ट्रीय अधिवेशने व महत्त्वाच्या घटना झाल्या तेथे वृत्त संकलनासाठी तरुण भारतच्या पत्रकारांना पाठविणे सुरू केले. भोपाळ गॅस कांड, पाटणा भूकंप, लातूर भूकंप, अयोध्या राम जन्मभूमी आंदोलन या ठिकाणी तरुण भारतचे प्रतिनिधी पाठविणे सुरू झाले. ते स्वतः आसाममधील विद्यार्थी आंदोलनाचा आढावा घ्यायला आसाममध्ये गेले होते. त्यामुळे अनेक आसामी विद्यार्थी नेत्यांशी त्यांचा घनिष्ठ संबंध होता. आसाम विद्यार्थी आंदोलनावरही त्यांनी पुस्तक लिहिले होते. पंजाबमधील अतिरेकी कारवायांबाबत त्यांनी वृत्तमालिका चालवली होती. तरुण भारतमध्ये काम करत असताना त्यांचा वनवासी कल्याण आश्रमाशी संबंध आला आणि त्यातून वन योगी हे बाळासाहेब देशपांडे यांच्यावरील त्यांचे पुस्तक साकार झाले.

सर्वांना बरोबर घेऊन चालणे हे त्यांना संघ स्वयंसेवक आणि शिक्षक असल्याने चांगले जमत होते. सर्व सहकाऱ्यांच्या घरी ते जात आणि त्यांच्या सुखदुःखात वाटेकरी होत. सहकाऱ्यांना पुढे होण्यासाठी प्रोत्साहन देत आणि कुणी चुकला तर त्याला पाठीशी घालून अपयश आणि दोष स्वतःकडे घेणे हेही त्यांच्या स्वभावाचे वैशिष्ट्य होते. जबाबदारी कोणतीही असो, कामात कमी न पडणे ही त्यांच्या कर्तृत्वशैलीची विशेषता होती. त्यामुळेच वसंत नगर पत्रकार कॉलनीत तरुण भारतमधील पाच-सहा जणांना घरे मिळाली. संघटक म्हणून त्यात त्यांचा मोठा वाटा होता. ते पत्रकार संघटनेचे काम करत आणि प्रत्येक आंदोलनात आघाडीवर असत. तरुण भारतचे वृत्तसंपादक असतानाही ते पडेल ती जबाबदारी स्वीकारत असत. त्यामुळेच ते वृत्त संपादक पदावरून थेट मुख्य संपादक आणि नंतर काही काळ प्रबंध संचालकही झालेत. तरुण भारतच्या मुख्य संपादकपदावरून निवृत्त झाल्यावर त्यांच्या जीवनातील दुसरी इनिंग सुरू झाली. 'गोमंतक' या वृत्तपत्राचे संपादक म्हणून ते काम करू लागले. पुढे त्यांनी 'गोवादूत'मध्ये काम केले. जवळजवळ १० वर्षे ते गोव्यात होते. त्यानंतर मुंबई तरुण भारत, जळगाव तरुण भारत येथे मुख्य संपादक म्हणून ते कार्यरत होते. जळगाव तरुण भारतमधून निवृत्त झाल्यावर त्यांना घरी बसवत नव्हते म्हणून त्यांनी 'लोकशाही वार्ता' या नव्या वृत्तपत्राच्या संपादकपदाची जबाबदारी स्वीकारली. या वृत्तपत्रात असतानाच त्यांचा ७५ वा वाढदिवस भव्य प्रमाणात साजरा झाला. वयाच्या ८० व्या वर्षानंतर त्यांनी वृत्तपत्रात सेवा देणे बंद केले. मात्र फेसबुक, ट्विटर या सर्व माध्यमांतून ते अगदी आत्तापर्यंत त्यांचे अस्तित्व जाणवायचे. रा. सू. गवई यांच्यावरील 'अजातशत्रू' या ग्रंथाचे संपादन करणाऱ्या संपादक मंडळात त्यांचा समावेश होता. तसेच 'पांचजन्य' या हिंदी साप्ताहिकातर्फे त्यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते. हा पुरस्कार त्यांना तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी आणि लालकृष्ण अडवाणी या दोन दिग्गजांच्या हस्ते भव्य समारंभात देण्यात आला होता.

कुठल्याही परिस्थितीत मनाची स्थिरता, संयम आणि सद्सद्विवेक कसा कायम राखावा हे त्यांच्याकडून शिकता येणारे होते. तर्कशुद्ध मांडणी हे त्यांच्या लिखाणाचे वैशिष्ट्य होते. कुठल्याही वयात नवीन माध्यम आपलेसे करून त्यात व्यक्त होण्याची वृत्ती होती. काळाबरोबर चालणारा, सम्यक दृष्टीचा मार्गदर्शक म्हणूनही नवीन पिढी त्यांना ओळखत असे. पत्रकारितेतील एक दीपस्तंभ आणि एक सबळ आधारवड नवीन पिढीला सोडून अनंताच्या प्रवासाला निघून गेला आहे. त्यांना तरुण भारत परिवार आणि श्री नरकेसरी प्रकाशनातर्फे भावपूर्ण आदरांजली. ■

## विशेष

**प्रा. सुखदेव बखळे**

# सागरी पायाभूत सुविधांचा नवा कणा

महाराष्ट्र हा देशाच्या औद्योगिक, आर्थिक आणि व्यापार क्षेत्राचा कणा मानला जातो. उद्योग, सेवा, माहिती-तंत्रज्ञान, कृषी प्रक्रिया, बंदरे आणि दळणवळणाच्या सुविधा यामुळे राज्याने देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान निर्माण केले आहे. आता या विकासाला आणखी वेग देण्यासाठी महाराष्ट्र सरकारने एक महत्त्वाकांक्षी संकल्पना पुढे आणली आहे. महाराष्ट्रातील 'जेएनपीटी' हे देशातील सर्वांत मोठे कंटेनर बंदर असून भारतातील सुमारे ६० टक्के कंटेनर वाहतूक या बंदरातून केली जाते. याशिवाय पालघर जिल्ह्यात विकसित होणारे वाढवण बंदर हे भविष्यात जगातील १० सर्वांत मोठ्या बंदरांपैकी एक ठरण्याची क्षमता बाळगते. या दोन्ही बंदरांना राज्यातील औद्योगिक पट्टे, ड्राय पोर्ट्स आणि समृद्धी महामार्गाशी रेल्वेद्वारे जोडल्यास निर्यात-आयात प्रक्रिया अधिक वेगवान आणि स्वस्त होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकल्पामुळे हा खर्च सुमारे सात ते आठ टक्क्यांपर्यंत आणण्याचे लक्ष्य व्यक्त केले आहे. हे उद्दिष्ट साध्य झाले, तर महाराष्ट्रातील उद्योगांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मोठी स्पर्धात्मक ताकद मिळू शकते.

हा रेल्वे कॉरिडॉर समृद्धी महामार्गालगत उभारण्याचा विचार आहे. नागपूर ते मुंबई जोडणाऱ्या या महामार्गासाठी आधीच रेल्वेमार्गासाठी जागा राखीव ठेवण्यात आली आहे. त्यामुळे जमीन संपादनाचा प्रश्न मोठ्या प्रमाणात टाळता येईल. हा मार्ग जालना आणि वर्धा येथील ड्राय पोर्टसना जोडत गडचिरोलीपर्यंत विस्तारण्याचा विचार आहे. विशेषतः गडचिरोली जिल्हा खनिज संपत्तीने समृद्ध असून भविष्यात स्टील आणि खनिजाधारित उद्योगांचे मोठे केंद्र बनण्याची क्षमता आहे. त्यामुळे या भागातील औद्योगिक विकासाला नवे बळ मिळेल. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था देशातील सर्वांत मोठ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. राज्याचा देशाच्या सकल देशांतर्गत उत्पन्नात सुमारे १४ टक्के वाटा आहे, तर देशाच्या एकूण निर्यातीत जवळपास २० टक्के योगदान महाराष्ट्राचे आहे. ही आकडेवारी राज्याच्या औद्योगिक सामर्थ्याची साक्ष देते. इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन, वाहन उद्योग, औषधनिर्मिती, माहिती-तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, वस्त्रोद्योग आणि सेवा क्षेत्रात महाराष्ट्राने उल्लेखनीय प्रगती केली आहे. महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन आणि डेटा सेंटर क्षेत्रातही वेगाने पुढे जात आहे. देशातील सुमारे ६० टक्के डेटा सेंटर क्षमता महाराष्ट्रात विकसित होत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), 'क्लाऊड कॉम्प्युटिंग', डिजिटल सेवा आणि फिनटेक क्षेत्रातील वाढ लक्षात घेता डेटा सेंटरचे महत्त्व अधिक वाढत आहे. त्यांनी मुंबई आणि पुणे या दोन शहरांना भारताचे 'क्वांटम व्हॅली' असे संबोधले. 'क्वांटम कॉम्प्युटिंग', कृत्रिम बुद्धिमत्ता, इलेक्ट्रॉनिक्स, संशोधन आणि नवोपक्रम यामध्ये ही दोन्ही शहरे विकसित होत असून प्रस्तावित हाय-स्पीड रेल्वे व इतर दळणवळण प्रकल्प पूर्ण झाल्यास मुंबई-पुणे हा देशातील सर्वांत मोठा तंत्रज्ञान आणि नवोपक्रम आर्थिक कॉरिडॉर ठरू शकतो.

मोठ्या उद्योगांकडे स्वतःची वाहतूक व्यवस्था असते; परंतु लहान उद्योगांना वाहतूक खर्चाचा मोठा फटका बसतो. बंदरांशी थेट रेल्वे संपर्क उपलब्ध झाल्यास त्यांचा खर्च कमी होईल आणि त्यांच्या उत्पादनांना जागतिक बाजारपेठेत स्पर्धा करण्याची संधी मिळेल. शेती आणि कृषी प्रक्रिया उद्योगांनाही या प्रकल्पाचा मोठा फायदा होईल. महाराष्ट्रात द्राक्षे, डाळिंब, संत्री, कांदा, ऊस, कापूस, सोयाबीन आणि इतर अनेक कृषी उत्पादने मोठ्या प्रमाणावर तयार होतात. ही उत्पादने कमी वेळेत बंदरांपर्यंत पोहोचल्यास निर्यात वाढू शकते. रस्ते वाहतुकीच्या तुलनेत रेल्वेमुळे इंधनाचा वापर कमी होतो, कार्बन उत्सर्जन घटते आणि रस्त्यांवरील वाहतुकीचा ताणही कमी होतो. त्यामुळे शाश्वत विकासाच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा ठरतो. अर्थात, एवढा मोठा प्रकल्प यशस्वी करण्यासाठी अनेक आव्हानेही आहेत. मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक, केंद्र आणि राज्य सरकारमधील समन्वय, रेल्वे मंत्रालयाचे सहकार्य, पर्यावरणीय मंजुरी, स्थानिक पायाभूत सुविधा आणि वेळेत प्रकल्प पूर्ण करणे या बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. महाराष्ट्राने यापूर्वी समृद्धी महामार्ग, मेट्रो प्रकल्प, किनारी रस्ते, नवीन विमानतळ, औद्योगिक कॉरिडॉर आणि विविध लॉजिस्टिक पार्क उभारून पायाभूत सुविधांच्या विकासात महत्त्वाची झेप घेतली आहे. प्रस्तावित रेल्वे मालवाहतूक कॉरिडॉर हा त्या विकासाचा पुढचा टप्पा ठरू शकतो.

या प्रकल्पामुळे राज्यातील औद्योगिक विकासाचा केंद्रबिंदू केवळ मुंबई-पुण्यापुरता मर्यादित न राहता विदर्भ, मराठवाडा आणि इतर भागांपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. या दिशेने सातत्याने पावले उचलल्यास अधिक परकीय गुंतवणूक आकर्षित होईल, रोजगारनिर्मिती वाढेल आणि राज्याच्या आर्थिक विकासाला नवी गती मिळेल. एकंदरीत, 'जेएनपीटी' आणि वाढवण बंदरांना समृद्धी महामार्गाशी जोडणारा प्रस्तावित रेल्वे मालवाहतूक कॉरिडॉर हा केवळ वाहतुकीचा प्रकल्प नाही, तर तो महाराष्ट्राच्या भविष्यातील औद्योगिक, आर्थिक आणि निर्यातक्षम विकासाचा पाया ठरू शकतो. बंदरे, महामार्ग, रेल्वे आणि औद्योगिक क्षेत्र यांची साखळी मजबूत झाली, तर महाराष्ट्र जागतिक पुरवठा साखळीतील एक महत्त्वाचे केंद्र म्हणून अधिक सक्षमपणे उदयास येईल. या प्रकल्पाची यशस्वी अंमलबजावणी झाली, तर 'विकसित महाराष्ट्र' आणि 'विकसित भारत' या संकल्पनांना प्रत्यक्ष बळ मिळेल. भारताच्या आर्थिक विकासाला गती देण्यासाठी आणि जागतिक व्यापारात देशाचे स्थान बळकट करण्यासाठी पायाभूत सुविधांचा विकास अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. गेल्या काही दशकांमध्ये भारताने रस्ते, रेल्वे आणि बंदरांच्या आधुनिकीकरणावर विशेष भर दिला आहे. याच मालिकेतील एक अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि 'गेम-चेंजर' प्रकल्प म्हणजे जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण (जेएनपीटी) आणि नियोजित वाढवण बंदर यांना जोडणारा स्वतंत्र रेल्वे मालवाहतूक कॉरिडॉर (डेडिकेटेड फ्रीट कॉरिडॉर).

महाराष्ट्राच्या सागरी किनाऱ्यावर आकाराला येत असलेला हा रेल्वे कॉरिडॉर केवळ दोन बंदरांना जोडणारा मार्ग नसून भारताच्या आयात-निर्यात क्षेत्राची कार्यक्षमता वाढवणारा, लॉजिस्टिक खर्च कमी करणारा आणि देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापाराला नवी दिशा देणारा एक महामार्ग ठरणार आहे. ■


(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## श्रद्धांजली

**केतन पाठक**

# जीवनध्येय जगलेले लक्ष्मणराव!

गेल्या आठवड्यातच फोन आला. मला वाटले नेहमीसारखे कोणत्यातरी राजकीय विषयावर चर्चा करण्यासाठी असेल. पण, तिकडून लक्ष्मणरावांचा आवाज आला, 'मी गोव्यात अडकलो आहे आणि मला आता तुम्हीच बाहेर काढू शकता. तत्काळ गोवा पोलिसांना फोन करा आणि मला मदत करायला सांगा.' मी त्यांना लगेच तुमचे लोकेशन द्या, नेमक्या कोणत्या संकटात आहात, अशी विचारपूस केली. 'बाहेर खूप पाणी साचले आहे आणि आम्ही एका इमारतीत अडकलो आहोत...' लक्ष्मणराव सांगत होते. मला खरेच वाटले. कारण त्यादिवशी पाऊस खूप होता. आणखी विचारपूस केली, तर नागपूर विमानतळ आणि सहकारनगर असा उल्लेख ते करीत होते. मनात शंकेची पाल चुकचुकली. कारण, एक कणखर आणि बाणेदार आवाज ऐकण्याचीच लक्ष्मणरावांच्या बाबतीत सवय लागली होती. हललेले लक्ष्मणराव कधी ऐकलेच नाहीत. पण, नंतर लक्षात आले, आयुष्यात जगलेल्या एका मोठ्या कालखंडांची मेंदू वयाच्या नव्वदीत उजळणी करतो, तसेच काहीसे ते होते. ते संकटात नसल्याची खात्री करून घेतली आणि लगेच सुधीरजी पाठक यांना फोन केला. त्यांनी योग्य ती माहिती दिली.



मी १९ वर्षांचा असेन. लक्ष्मणरावांसोबत एका बैठकीत होतो. 'वाचकांच्या मनोगत'साठी काही पत्र त्यांच्या हाती दिली आणि त्यांनी लगेच 'तरुण भारता'त जॉईन होता का, अशी थेट विचारणा केली. पहिलीच भेट होती आणि थेट ही विचारणा! तेथून जे 'बाँडिंग' तयार झाले ते अगदी गेल्या आठवड्यापर्यंत कायम होते. साधारणतः ३५ वर्षांचा परिचय. मला पत्रकारितेत घडविणारी जी महनीय नावे, त्यातील लक्ष्मणराव हे अग्रणी. त्यांचा आशीर्वाद आजतागायत कायम पाठीशी राहिला. तो काळ फार गंभीर पत्रकारितेचा होता. तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांची पत्रपरिषद नागपूरच्या राजभवनात होणार होती. पंतप्रधानांची पत्रपरिषद कव्हर करायला कोण जाईल, यावर चक्क ऑफिसमध्ये मीटिंग झाली होती आणि ती संधी त्यांनी मला दिली.

आयुष्यात रागावले अनेकदा. पण, तितकेच प्रेमही केले... सतत चांगलेच झाले पाहिजे, हा आग्रह त्यांच्याकडूनच शिकायला मिळाला. खूप कठोर परिश्रम करून घेतले. पण, तितकेच चांगले शिकवलेही... जबाबदाऱ्या खूप टाकल्या; त्यातून कामात पक्के करत गेले. क्रिकेटवर प्रचंड प्रेम करायचे. रात्री २ वाजता मॅच संपली की आवर्जून बातमी कशी गेली पाहिजे, यावर फोन करून सांगायचे. पत्रकारितेव्यतिरिक्त क्रिकेट हा त्यांचा एकमेव व्यासंग होता. एकदा सामनाविरोधात त्यांनी लेख लिहिला, तेव्हा 'फायटिंग विथ टायगर' अशी 'आऊटलूक'ने त्यावेळी स्टोरी केली होती. मनोरमा कांबळे बलात्कार प्रकरणात जी ठाम भूमिका घेतली, तेव्हा आपल्या बातमीदारासाठी प्रसंगी कोर्टाच्या अवमानाची शिक्षाही भोगली. (बबनराव वाळके हे तेव्हा बातमीदार होते. आज तेही हयात नाहीत) अजूनही आठवते, प्रा. जोगेंद्र कवाडे सरांनी त्यांना मिरवणुकीतून ऑफिसपर्यंत आणले होते. गोसे खुर्दवर सातत्याने लिखाण केले. सातत्याने वाचनाचा आग्रह ते सतत करीत. त्यावेळी देशभरातील इंग्रजी वर्तमानपत्र ३-४ दिवसांनी नागपूरला यायचे. पण, त्याचे वाचन सक्तीचे असे.

लक्ष्मणराव हे खऱ्या अर्थाने पत्रकार घडविणारे विद्यापीठ होते. ग्रामीण भागातून त्यांनी कित्येकांना पत्रकारितेच्या मुख्य प्रवाहात आणले. पत्रकारिता आणि लेखन हेच जीवनध्येय असलेल्या आणि ते क्षणोक्षणी जगलेल्या एका महान तपस्वी व्यक्तिमत्त्वाला आज गुरुपौर्णिमेच्या आदल्या दिवशी आपण मुकलो.

लक्ष्मणरावांना भावपूर्ण श्रद्धांजली. ॐ शांति ■

(लेखक मुख्यमंत्र्यांचे ओएसडी आहेत)

## धर्म-संस्कृती

**प्रा. दिलीप जोशी**

# शक्ती उपासनेचा पर्वकाळ 'नवरात्र'

हिंदू धर्मात नवरात्राचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. देशाच्या पंतप्रधानापासून तर सामान्य देवी भक्त नवरात्रात आदिशक्तीची साधना व्रतस्थ राहून करतात. कोणी निर्जल, कोणी अनवानी, कोणी नक्त करून विविध हट साधना भक्त करतात. महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती त्रिगुणात्मिका जगदंबेची आर्त उपासना नऊ दिवस केली जाते. नवरात्र फक्त एकाच प्रकारात नसून हिंदू धर्मात चार प्रकारचे नवरात्र आहेत.

१) चैत्री नवरात्र २) आश्विन नवरात्र ३) माघी नवरात्र ४) आषाढी नवरात्र.

**१) चैत्री नवरात्र :** चैत्र महिन्यातील नवरात्राला चैत्री नवरात्र म्हणतात. हे नवरात्र वसंत ऋतूत येते म्हणून याला वासंतिक नवरात्र असेही म्हणतात. चैत्र शुद्ध प्रतिपदेला गुढी उभारून प्रारंभ होऊन श्रीराम नवमीला या नवरात्राचा समारोप असतो. चैत्र शुद्ध प्रतिपदेला गुढीपाडवा, वर्षप्रतिपदा असेही म्हणतात. भारतीय नववर्षाचा हा प्रथम दिन म्हणूनही साजरा केला जातो. गुढी पाडवा ते रामनवमी या नऊ दिवसांत शक्तीची उपासनाच प्रामुख्याने होते. श्रीराम आणि श्रीरामवरदायिनी दोन्हीचीही आराधना या नवरात्रात केली जाते.

**२) आश्विनी नवरात्र :** आश्विन महिन्यात येते म्हणून हे आश्विनी नवरात्र. हे नवरात्र शरद ऋतूत येते म्हणून शारदीय नवरात्र. आश्विन शुद्ध प्रतिपदेला घटस्थापनेने प्रारंभ होऊन आश्विन शुद्ध नवमी म्हणजे महानवमीला होमहवनाने शारदीय नवरात्रीची सांगता होते. याला लागूनच विजयादशमी म्हणजे दसरा असतो. भगवती महिषासुरमर्दिनी दुर्गेचे राक्षसासोबत नऊ दिवस-रात्र युद्ध चालले म्हणून हे नवरात्र. रावण वधापूर्वी भगवान श्रीरामांनी नऊ दिवस शक्तीची उपासना केली म्हणून नवरात्र साजरे केले जाते. हिंदू धर्मात वासंतिक आणि शारदीय या प्रमुख नवरात्रीसोबत अजून दोन प्रकारचे गुप्त नवरात्र असतात; जे फार प्रचलित नाहीत म्हणून सर्वांना ते फार ज्ञात नाहीत. या गुप्त नवरात्रात यंत्र, तंत्र आणि मंत्रांच्या समन्वयाने शक्तीची साधना केली जाते. दशमहाविद्याची साधना या नवरात्रात केली जाते. गुप्त नवरात्र पुढील प्रमाणे आहेत.

**३) माघी नवरात्र :** नवरात्रातील तिसरा प्रकार माघ शुद्ध प्रतिपदा ते माघ शुद्ध नवमी असतो. या गुप्त नवरात्रात प्रामुख्याने दशमहाविद्या पूजली जातात; ज्यात वल्गामुखी जिला आपण अपभ्रंशाने 'बगलामुखी' म्हणतो तिचे पूजन होते. शिवाय काली, छिन्नमस्ता, मातंगी, भैरवी यांचे तांत्रिक पूजन होते.

**४) आषाढी नवरात्र :** आषाढ शुद्ध प्रतिपदा ते आषाढ शुद्ध नवमी या काळात शाक्त उपासक गुप्त साधना करतात. यात दशमहाविद्यातील तारा, षोडशी, भुवनेश्वरी, धुमावती आणि कमला यांची तंत्र पूजा होते.

असे नवरात्रीचे चार प्रकार असले, तरी आश्विनी नवरात्र देशभर उत्साहात साजरे होते. महाराष्ट्रातही शारदीय नवरात्रीला सर्वत्र महत्त्व दिले जाते. म्हणून त्याचाच विचार आज आपण करू. या नवरात्रात नऊ दिवसांचे आपापले महत्त्व आहे.

**१) आश्विन शुद्ध प्रतिपदा :** नवरात्रीच्या या पहिल्या दिवसाला घटस्थापना म्हणतात. या दिवशी घट म्हणजे मातीच्या घड्याची (सुगडे, मडके, कुंभ) स्थापना केली जाते. देवासमोर काळी माती पसरवून त्यावर गहू आदी धान्य टाकले जाते. त्यावर जलाने भरलेला घट ठेवला जातो. त्यावर मातीचेच पूर्णपात्र ठेवले जाते. त्यातही धान्य वाण टाकले जाते. ज्वारीच्या पाच धांड्याची खोपडी असते. घरात ठेवलेल्या वाणाची उपजाऊ क्षमता मोजण्याचे हे विज्ञान आहे. याच घटावर रोज एक पुष्पांची माळ ठेवतात. पहिली माळ, दुसरी माळ असा गणनक्रम त्या तिथीनुसार असतो. घटस्थापना आपल्याला घरी जमत नसेल तर देवीच्या मंदिरातील घट दर्शन रोज करावे. घरी शैलपुत्रीचे ध्यान करून सायंकाळी आरती करावी.

**२) आश्विन शुद्ध द्वितीया :** नवरात्रीचा दुसरा दिवस. या दिवशी चौसष्ठ योगिनींचे पूजन केले जाते. कारण या दिवशी ६४ योगिनी एकत्र येऊन भगवतीचा उदोकार करतात. परशुरामाची जननी श्रीरेणुका मातेचे मळवट त्या भरतात अशी धारणा आहे. आपल्या घरी ब्रह्मचारिणी दुर्गेचे स्मरण करावे.

**३) आश्विन शुद्ध तृतीया :** तृतीयेच्या दिवशी अष्टभुजा नारायणीचे पूजन पातळ, मळवट आणि शृंगार करून करतात. या दिवशी घरी आरतीच्या वेळी चंद्रघंटा दुर्गेचे स्मरण करावे.

**४) आश्विन शुद्ध चतुर्थी :** चौथी माळ असलेल्या या दिवशी विश्वव्यापी आद्याशक्ती अनुपम स्वरूपात असते. ती मुक्तहस्ते कृपेची उधळण करते म्हणून या दिवशी सर्व देव तिला लोटांगण घालत येतात. याच दिवशी गणपतीसह कूष्मांडा दुर्गेचे स्मरण करावे.

**५) आश्विन शुद्ध पंचमी :** या दिवसाला ललिता पंचमी असेही म्हणतात. उपांग ललितेचे पूजन, महात्रिपुरसुंदरीचे ललिता सहस्त्रनाम अर्चनेने पूजन, घारी-खिरीचा नैवेद्य आणि गायनाने दुर्गापूजन केले जाते. रात्री जागरण, देवीची कथा, भजन केले जाते. घरी धूप दीप नैवेद्यासह स्कंदमाता दुर्गेचे चिंतन करावे.

**६) आश्विन शुद्ध षष्ठी :** सहाव्या माळेला कवड्याची माळ घालून हातात दिवट्या घेऊन आईचा गोंधळ घातला जातो. जोगवा मागण्याचा सर्वोत्तम दिवस हाच आहे. या दिवशी कात्यायनी दुर्गेचे ध्यान करावे.

**७) आश्विन शुद्ध सप्तमी :** सप्तमीला सप्तशृंगी गडावर पूजन केले जाते. फुलांचा शृंगार केला जातो. संकटात धावून येणाऱ्या दुर्गेची मनोभावे आराधना केली जाते. या दिवशी कालरात्री दुर्गेचे स्मरण करावे.

**८) आश्विन शुद्ध अष्टमी :** अष्टभूजा नारायणीचे पूजन केले जाते. या दिवशी कुमारिका पूजन असते. लहान मुलींना दुर्गा रूपात पाद्यपूजन करून यथाशक्ती वस्त्रालंकार आणि सात्त्विक भोजन दिले जाते. अष्टमीला उपवास करण्याचीही पद्धत आहे. या दिवशी श्री दुर्गा महागौरीचे ध्यान करावे.

**९) आश्विन शुद्ध नवमी :** नवरात्राची सांगता होते. या दिवशी होमहवन होते. या तिथीला महानवमी असेही म्हणतात. या दिवशी सिद्धिदात्री दुर्गेचे पूजन करावे.

नवरात्रात प्रत्येक तिथीचे महत्त्व आहे. त्यातील सर्व आपल्याला जमेलच असे नाही. असले तरी आपण नवरात्रात व्रतस्थ राहून दररोज किमान सकाळी घटाला माळ घालून पूजन आणि सायंकाळी सामूहिक आरती, भजन, पूजन केल्यास त्रिगुणात्मिका जगदंबा कृपेचा वर्षाव निश्चित करते. आपण केवळ एखादी कवडी म्हणजे यथाशक्ती अर्पण केले तर ती रत्न मण्यांचे हार म्हणजे भरभरून ऐश्वर्य आपल्याला देते. म्हणूनच-

**'जगदंब जगदंब ऐसे म्हणावे देहातित होवोनी जावे**
**स्वानंद साम्राज्य भोगावे समाधिस्थितीत ।'** ■

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### शिक्षकांचे शिक्षक

शिक्षकांचे शिक्षक म्हणजे मुख्याध्यापक. शाळेचे प्रमुख. विद्यार्थ्यांना शिस्त लावण्याबरोबरच शाळेतील शिक्षकांना प्रोत्साहन देणे, त्यांच्याकडून अपेक्षित परिणाम देणारे शिक्षण विद्यार्थ्यांना देणे, शिक्षकांच्या अडचणीत शिक्षकांच्या पाठीशी उभे राहणे. घरातील कर्ता जसे घरातील सर्वांना समान वागणूक देतो तसेच मुख्याध्यापकांनी वर्तन करणे आवश्यक असते. कोणत्या शिक्षकाला कोणते काम आवडते त्याप्रमाणे ती जबाबदारी त्या शिक्षकांवर सोपवणे हे समजण्याची कला मुख्याध्यापकांना अवगत असली तर त्या शाळेतील कामकाज उत्तम होते. प्रत्येक शिक्षकाकडे सर्वच गुण असतील असे नाही तर त्या शिक्षकातील गुण ओळखून ते काम शिक्षकाला दिले तर तो शिक्षक आनंदाने ते काम करतो. शाळा चालवणे ही सांघिक जबाबदारी असते. प्रशासकीय जबाबदारी, शैक्षणिक कामगिरी, शाळेचा निकाल, शाळेतील स्वच्छता, विविध प्रशिक्षणे, शाळाबाह्य कामे, शाळेतील शिस्त याचबरोबर शाळेतील वातावरण कसे चांगले राहील यासाठी मुख्याध्यापकांवर जबाबदारी असते. शाळेचे नाव मोठे कसे होईल यासाठी मुख्याध्यापकांना चतुरस्र लक्ष ठेवावे लागते. आदर्श मुख्याध्यापक अशी सर्व कामे आनंदाने करीत असतात. मुख्याध्यापक एका अर्थाने गुरूंचेगुरू असतात. गुरुपौर्णिमेनिमित्त वंदन.

**सुदाम विश्वे**/पुणे । ९८६०५८६१४७

■■■

### संपूर्ण सुविधांशिवाय 'फ्लॅट'ची नोंदणी नाही

मंगळवारच्या तरुण भारतात उपरोक्त बातमी वाचण्यात आली. महानगराच्या विस्तारात उंच इमारती व 'फ्लॅट' योजनांना दिलेल्या परवानगीच्या अटींची पूर्तता न करताच भोगवटा प्रमाणपत्र दिली जात असल्याचे समोर आल्यावर पालकमंत्री तथा महसूलमंत्री यांनी मोठा निर्णय घेतला. जोपर्यंत सर्व सुविधांची पडताळणी होत नाही, तोपर्यंत कोणत्याही फ्लॅटची नोंदणी करू नये, असे आदेश त्यांनी जिल्हा उपनिबंधकांना दिले. तथापि, काही बिल्डर्सनी उपरोक्त सुविधा दिल्यानंतरही त्यांना ऑक्युपेशन सर्टिफिकेट मिळण्यास का विलंब होतो, याचाही विचार होणे आवश्यक आहे. मनपाकडून भोगवटा प्रमाणपत्र न मिळाल्याने फ्लॅटच्या नोंदणीला उशीर होत आहे. सबब, ज्या बिल्डर्सनी उपलब्ध सुविधांची पूर्तता केली आहे त्यांना मनपाने लवकरात लवकर भोगवटा प्रमाणपत्र उपलब्ध करून द्यावे, ही विनंती.

**शशिकांत दलाल**/नागपूर । ९८२२३६५१९०

■■■

### गुरूंचे माहात्म्य

**'गुरुर्ब्रह्मा: गुरुर्विष्णु: गुरुर्देवो महेश्वरा: ।**
**गुरुः साक्षात परब्रह्म तस्मै श्री गुरुवे नमः ।।'**


आज गुरुपौर्णिमा. गुरुपूजनाचा दिवस. आपल्या जीवनात आपल्या गुरूंना अनन्यसाधारण महत्त्व आहे. संकटांवर मात करण्यासाठी आणि आध्यात्मिक शांतता मिळविण्यासाठी गुरूंचे मार्गदर्शन अत्यंत आवश्यक असते. व्यास ऋषींनी लोकांना वेदाचे ज्ञान दिले. ते आपले आद्यगुरू आहेत. अध्यात्मात ईश्वर प्राप्ती करायची असेल तर गुरूंशिवाय पर्याय नाही. कुठलेही ज्ञान घ्यायचे असेल तर गुरूचे मार्गदर्शन आवश्यक असते. त्याशिवाय कुठलेही ज्ञान योग्यरीत्या आपण प्राप्त करू शकत नाही. कारण गुरू म्हणजे ईश्वराचे साक्षात सगुण रूप असते. अशा आपल्या गुरूंना कोटी कोटी प्रणाम!

**अपर्णा अग्निहोत्री**/नागपूर.

■■■

### जीवन जगण्याची योग्य दृष्टी देणारे गुरू

एक महात्मा आपल्या दोन शिष्यांची परीक्षा घेतात. दोघांनाही एक फळ देऊन आज्ञा देतात- 'जिथे तुम्हाला पाहणारे कोणीच नसेल, अशा ठिकाणी जाऊन हे फळ खा.' एक शिष्य खोली बंद करून फळ खातो; परंतु दुसरा शिष्य खूप जागा शोधतो. अखेर फळ घेऊन परत येतो. तो म्हणतो, 'गुरुदेव, मला अशी जागाच सापडली नाही. कारण देव सर्वत्र आहे. मी कुठेही गेलो, तरी देव मला पाहत होता तसेच माझ्या मनात तुम्ही आहात त्यामुळे माझ्या प्रत्येक कृतीकडे, विचाराकडे तुमचे लक्ष आहे, असे मला जाणवले.' हीच खरी गुरुकृपा आणि गुरूंच्या शिकवणीचे सार आहे. गुरूंचे ज्ञान केवळ ऐकून उपयोग होत नाही, ते आचरणात उतरवले की जीवनाला दिशा देते. गुरू शिष्याला पुस्तकी विद्या देत नाहीत तर त्याचे अंतर्मन जागृत करतात. ते प्रत्येक कृतीत ईश्वराचे अस्तित्व अनुभवायला शिकवतात. आजच्या धावपळीच्या जीवनात माणूस देवाला मंदिरापुरता मर्यादित समजतो; पण गुरू शिकवतात की देव प्रत्येक जीवात, प्रत्येक क्षणात आणि प्रत्येक कृतीत आहे. ही अनुभूती ज्याला येते, त्याचे जीवनच बदलते. गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने आपणही गुरूंच्या शिकवणीचे केवळ श्रवण न करता ती आचरणात आणण्याचा संकल्प करूया. ■



**प्रांजली ब्रह्मे**/नागपूर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# शिवराय, जिजाऊ, सावित्रीबाई यांच्यावरील पोवाड्याचे सादरीकरण



## शाहिरी महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जुलै-**

महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्यावतीने आयोजित शाहिरी महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी छत्रपती शिवाजी महाराज, जिजाऊ, सावित्रीबाई फुले यांच्यासह राष्ट्र पुरुषांवरील पोवाडयाने हुतात्मा स्मृती मंदिरचा रंगमंच दणाणून गेला. प्रारंभी या कार्यक्रमाचे समन्वयक अमोल धाबळे यांनी प्रास्ताविक करून शाहिरी महोत्सवाच्या तीन दिवसाच्या कार्यक्रमाची माहिती दिली संपूर्ण महाराष्ट्रातून आलेल्या नऊ शाहिरांची ओळख आणि त्यांचा सत्कार यावेळी करण्यात आला याप्रसंगी कवी मारुती कटकधोंड, जितेश कुलकर्णी,विजय दादा साळुंखे अविनाश महागावकर, प्रशांत बडवे आदी मान्यवर उपस्थित होते.

शाहीर गणेश गलांडे, शाहिरा संगीता हेमंतराजे मावळे, शाहीर राजेंद्र कांबळे या शाहीरांनी आपली कला सादर करीत राष्ट्रपुरुषावरील पोवाड्याचे गायन केला. शाहीर राजेंद्र कांबळे यांनी त्यांच्या सहकार्यासह छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्याची गाथा सांगणारा अफजल खान वध आपल्या पोवाडातून मांडून हुतात्मा स्मृती मंदिरात रोमांच उभे केले. तर शाहिरा प्रा.संगीता मावळे यांनी लोक कलेवरील पोवाडा सादर केला.

तीन दिवसीय शाहिरी महोत्सवाचा आजचा दुसरा दिवस होता तर बुधवारी या महोत्सवाचा समारोप होणार आहे.रसिक श्रोत्यांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन अमोल धाबळे यांनी केले.



## शहा-कोठारी प्रशालेत 'एलजी मोबाईल विज्ञान प्रयोगशाळा' उपक्रम उत्साहात

**सोलापूर, दि. २८ जुलै -**

सन्मती ज्ञान प्रसारक मंडळ संचलित श्री नवलबाई फुलचंद शहा कोठारी हायस्कूल येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि एलजी इलेक्ट्रॉनिक्स यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'एलजी मोबाइल विज्ञान प्रयोगशाळा' हा अभिनव उपक्रम विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागात व उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयाबद्दल कुतूहल, आवड आणि संशोधनाची वृत्ती निर्माण करणे हा होता. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना विविध वैज्ञानिक उपकरणे प्रत्यक्ष हाताळण्याची तसेच विज्ञानातील संकल्पना प्रयोगांच्या माध्यमातून समजून घेण्याची अनोखी संधी मिळाली.

अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक रमेश यादवाड होते. यावेळी व्यवस्थापक राहुल जगताप, निशांत जगताप, रवी मगर, सचिन मोहिते, नयनदास मोहिते, सिताराम बहिर आणि रामेश्वर देवकुळे यांनी विद्यार्थ्यांना विज्ञान विषयाचे मार्गदर्शन केले. राहुल जगताप व त्यांच्या सहकाऱ्यांनी द्रवरूप नायट्रोजन, विज्ञान किट, वैज्ञानिक लघुनाटिका तसेच विविध वैज्ञानिक मॉडेल्सच्या साहाय्याने आकर्षक व प्रात्यक्षिक स्वरूपातील प्रयोग सादर केले. विद्यार्थ्यांनी या प्रयोगांमध्ये उत्साहाने सहभाग घेत विज्ञानातील विविध संकल्पना प्रत्यक्ष अनुभवातून आत्मसात केल्या. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनवृत्ती आणि नवसंकल्पनांबद्दलची जिज्ञासा अधिक दृढ झाली.कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बगले एस. एम. यांनी केले, तर उपस्थितांचे आभार पाटील बी. एस. यांनी मानले.

## तरुणास मारहाण करून जबरदस्तीने रुपये काढून दुचाकीस्वार पसार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जुलै -**

दुचाकी वरून आलेल्या तिघा तरुणांनी घराजवळ फिरणाऱ्या एका तरुणास मारहाण करून त्याच्या जवळील रुपये जबरदस्तीने काढून घेतल्याप्रकरणी विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आदित्य भोसले व २ अनोळखी मुले अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत रोहन देविदास जाधव (रा-०२ नंबर झोपडपट्ट पंचशील रिक्षा स्टाफ जवळ सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी रोहन हा दि २७ जुलै २०२६ रोजी रात्री ११.३० वा चे दरम्यान २ नंबर झोपडपट्टी ,पंचशील रिक्षा स्टाफ घराजवळ फिरत असताना सदर ठिकाणी एका स्प्लेडर मोटार सायकलवरून तीन मुले फिर्यादीच्या समोर येवून मोटार सायकल थांबवली व त्यापैकी फिर्यादीचे ओळखीचा आदित्य व इतर २ जणांनी फिर्यादीस शिवीगाळ व लाथा बुक्क्याने मारहाण करून फिर्यादीच्या पॅन्टच्या खिश्यातील एक हजार रूपये जबरदस्तीने काढून घेतल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक खामकर या गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.


### जाहीर समन्स

**मा. उपनिबंधक सहकारी संस्था, (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि. सोलापूर**
११३(अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया, ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर

**बारामती सहकारी बँक लि., शाखा करमाळा** - **अर्जदार**
विरुद्ध
(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) - **जाब देणार**

| अ. क्र. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार | जाब देणार यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | १२५०/२०२५-२६ | ३६८१९४.६६/- | २ | **अलिम रफिक शिकीलकर** रा. सुमंत नगर, करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर |
| | | | ५ | **प्रमोद नामदेव झिंजाडे** रा. पोथरे, ता. करमाळा, जि. सोलापूर |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.

**उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार - मंगळवार, दि. ११/०८/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रांसह या कार्यालयात हजर रहावे.**

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. त्याप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दिनांक : २८/०७/२०२६ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

शिक्का

**सही/-**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**



## नगर परिषद कार्यालय, तुळजापूर

**जि. धाराशिव-४१३६०१**
**E-mail : tuljapurmc@gmail.com**

जा क्र/न.प.तु/स्व.वि./२०२६/ दि. २८/०७/२०२६

### सार्वजनिक सूचना

**घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ ची अंमलबजावणी बाबत**

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल विभागाच्या दिनांक २७ जानेवारी २०२६ च्या अधिसूचनेनुसार घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ निर्गमित करण्यात आलेले असून सदर नियम दिनांक ०१ एप्रिल २०२६ पासून अंमलात आले आहेत.

तुळजापूर शहरातील सर्व नागरिक, व्यापारी, संस्था, गृहनिर्माण संस्था, आस्थापना, लोकप्रतिनिधी तसेच मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणारे घटक (Bulk Waste Generators) यांना सूचित करण्यात येते की सदर नियमांनुसार व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या नागरी अपील क्र. ६१७४/२०२३ मधील आदेशानुसार प्रत्येक नागरिक व संस्थेवर कचरा वर्गीकरण व वैज्ञानिक व्यवस्थापनाची जबाबदारी निश्चित करण्यात आलेली आहे.

नियमांनुसार प्रत्येक घर, दुकान, आस्थापना, कार्यालय, हॉटेल, बाजारपेठ, संस्था व इतर कचरा निर्मात्यांनी खालीलप्रमाणे कचऱ्याचे स्त्रोतावरच वर्गीकरण करणे बंधनकारक राहील-

**१.** ओला कचरा अन्न, भाजीपाला अवशेष, स्वयंपाकघरातील कचरा **२.** सुका कचरा प्लास्टिक, कागद, धातू, काच इत्यादी **३.** सॅनिटरी कचरा डायपर्स, सॅनिटरी नॅपकिन्स इत्यादी **४.** विशेष / घातक कचरा बॅटरी, बल्ब, औषधे, ई-कचरा इत्यादी

**नागरिकांची जबाबदारी :-**

**१.** सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नये. **२.** कचरा जाळणे, नाले / रस्त्यावर टाकणे किंवा उघड्यावर फेकणे टाळणे. **३.** ओला व सुका कचरा मिसळून न देणे. **४.** प्लास्टिक, बांधकाम कचरा, ई-कचरा इत्यादी स्वतंत्रपणे देणे **५.** सॅनिटरी कचरा सुरक्षितरीत्या गुंडाळून देणे. **६.** घरगुती कचऱ्याचे चार प्रकारात वर्गीकरण करूनच स्वच्छता कर्मचाऱ्यांकडे / घंटागाडीत सुपूर्द करणे.

**लोकप्रतिनिधींची जबाबदारी :-**

**१.** आपल्या प्रभागात / वॉर्डात जनजागृती करणे. **२.** नागरिकांना कचरा वर्गीकरणासाठी प्रोत्साहन देणे. **३.** स्वच्छता, कचरा प्रक्रिया व पर्यावरण संरक्षणाबाबत सक्रिय सहभाग घेणे. **४.** स्थानिक स्वराज्य संस्थेस सहकार्य करून नियमांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करणे.

**Bulk Waste Generators (मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणारे) यांची जबाबदारी :-**

ज्या संस्था / इमारती / संकुले यांचे क्षेत्रफळ २०,००० चौ. मी. पेक्षा जास्त आहे किंवा दररोज १०० किलोपेक्षा अधिक कचरा निर्माण होतो अथवा ४०,००० लिटरपेक्षा जास्त पाण्याचा वापर होतो, अशा आस्थापनांना Bulk Waste Generators म्हणून घोषित करण्यात आले आहे.

**अशा संस्थांनी-**

**१.** ओल्या कचऱ्याची जागेवरच कंपोस्ट / बायोगॅस प्रक्रिया करणे **२.** कचऱ्याची स्वतंत्र साठवणूक व वर्गीकरण करणे, **३.** प्रक्रिया न झालेला कचरा उघड्यावर टाकू नये, **४.** महानगरपालिका / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सूचनांचे पालन करणे, **५.** अधिकृत कचरा प्रक्रिया यंत्रणेशी समन्वय ठेवणे बंधनकारक राहील.

नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती, संस्था किंवा आस्थापनांवर 'Polluter Pays Principle' नुसार दंडात्मक कारवाई व पर्यावरण भरपाई आकारण्यात येईल. तरी सर्व नागरिकांनी स्वच्छ, सुंदर व पर्यावरणपूरक शहर निर्मितीसाठी घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ चे काटेकोर पालन करावे, ही विनंती.

**सही/-** **नगराध्यक्ष** **नगरपरिषद तुळजापूर**

**सही/-** **मुख्याधिकारी** **नगरपरिषद तुळजापूर**



### जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु प्रकरण
अर्ज क्र. ९४/२०२६

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**१. शिवाजी चंद्रकांत यादव** - **अर्जदार**
रा. नांदणी ता. बार्शी, जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील महेश आ. जगताप)
विरुद्ध
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी** - **गैरअर्जदार**
**तथा ग्रामपंचायत अधिकारी ग्रा.प. नांदणी**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचा मुलगा जयवंत शिवाजी यादव, रा. नांदणी ता. बार्शी जि. सोलापूर यांचा मौजे नांदणी, ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी दिनांक २७ नोव्हेंबर २०१० रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारित २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराचा मुलगा जयवंत शिवाजी यादव यांचा दिनांक २७ नोव्हेंबर २०१० रोजी मौजे नांदणी, ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून १ महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ११ जून २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का

**सही/-**
**(एफ.आर. शेख)**
**तहसिलदार, बार्शी**



### सिलींग जमीन भोगवटदार वर्ग २ वरुन भोगवटदार वर्ग १ करीता जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मोजे निंबळक, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील शेतजमीन गट नंबर ४० मधील क्षेत्र हेक्टर ४.१० आर ही मिळकतीचे खातेदार श्री. दत्तात्रय संदीपान पवार (माजी सैनिक), रा. मु. पो. उपळे (दु), ता. बार्शी, जि. सोलापूर यांनी सदरची जमीन भोगवटदार वर्ग २ ची असल्याने सदर जमीनीची भोगवटदार वर्ग २ वरुन भोगवटदार वर्ग १ करीता आमचे अशील श्री. दत्तात्रय संदीपान पवार यांनी मा. अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर (कुळकायदा शाखा) या कार्यालयास अर्ज सादर केलेला आहे.

तरी उक्त नमुद शेतजमीनीबाबत व त्यामध्ये झालेल्या व्यवहाराबाबत किंवा इतर कुठल्याही प्रकारचे व्यवहाराबाबत किंवा उक्त जमिनीबाबत कोणाचाही करार, लिज, भाडेपट्टा, पोटगी हक्क, वारसाहक्क, बोजा, गहाण, दान, लिन, कर्ज, कोर्ट केसेस, मृत्यूपत्र, खरेदी विक्री, साठेखत, पतसंस्थेचा बोजा, सावकारी देणे घेणे इ. बाबत काही हरकत / तक्रार / हितसंबंध / अधिकार असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात (७) दिवसांचे आत मा. अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर (कुळकायदा), सात रस्ता, सोलापूर या पत्यावर आपली हरकत नोंदवावी. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून उक्त शेतजमीनीचा झालेला खरेदी व्यवहार विधीग्राहय होणेसाठी पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

ता. २८/०७/२०२६

**सही/-**
**ॲड. राहुल अंकुश पाटील**
**जिल्हा व सत्र न्यायालय बार्शी**
**ता. बार्शी जि. सोलापूर**
**अशिल - श्री. दत्तात्रय संदीपान पवार**



### जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी येथील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि. सोलापूर सब. डि. व ता. बार्शी, बार्शी म्यु.पल येथील जमीन ३६२ क्षेत्र ०१ हे. ०८ आर, त्यापैकी उत्तर बाजूचे क्षेत्र ०० हे. ५४ आर, आकार ०२ रू. ०० पै. याशी चतुःसिमा :- पूर्वेस - गट नं. ३६० व ३५९ (देशमुख यांची जमीन), दक्षिणेस - गट नं. ३६२ पैकी उर्वरित क्षेत्र व ३६३ (सावळे यांची जमीन), पश्चिमेस - ओढा व गट नं. २८९, उत्तरेस - गट नं. ३६१ (सावळे यांची जमीन), येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक वर्णनाची जमीन, अशा वर्णनाची शामसुंदर दत्तात्रय मुळे, रा. सोलापूर रोड, बार्शी यांच्या मालकीची व कब्जेदार वहिवाटीची आहे. सदरील जमीन आमचे अशिल अमोल शिवाजी जगताप, रा. माळे गल्ली, बार्शी यांना त्यांचे कायदेशीर गरजेपोटी विक्रीस काढलेवरून सदरील जमिनीचे खरेदीखताचा ठराव आमचे अशिल अमोल शिवाजी जगताप यांच्या बरोबर झाला असून त्यांनी आमचे अशिलाकडून इसारा दाखल रक्कम स्विकारेलेली आहे. सदरील वर्णनाची मिळकत त्यांनी व्यवहार करतेवेळी सदरची मिळकत निर्वेध, निजोखमी असल्याचा विश्वास दिला आहे.

सबब या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदरील मिळकतीबाबत इतर कोणाचे गहाण, दान, हस्तांतरण इ. स्वरूपाचा व्यवहार असेल तर सदरील नोटीस प्रसिध्द झालेपासून ०७ दिवसांचे आत आमचे अशिलास किंवा खालील पत्यावर तक्रार नोंदवावी मुदतीमध्ये कोणाचीही तक्रार न आलेस आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर आलेल्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसवगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली.

ता. २९/०७/२०२६

**सही/-**
**ॲड. श्री. एस.एस. ठोंबरे**
**बी.कॉम.(ऑनर्स), एल.एल.बी.**
**फुले प्लॉट, बार्शी, ता. बार्शी जि. सोलापूर**
**मो.नं. ९३७११६२४२५**
**अमोल शिवाजी जगताप**
**रा. माळे गल्ली, ता. बार्शी,**
**जि.सोलापूर मो.नं. ९५११६२५२०३**



### जाहीर प्रसिध्दीकरण

दि.क्रि. अर्ज २१/२०२६
नि.नं. ५

**बार्शी येथील मे. सिव्हील जज ज्युनियर डिव्हिजन साहेब यांचे कोर्टात**

**१) सिंधु सर्जेराव पाटील,**
वय - ७५ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. पाथरी, ता. बार्शी, जि. सोलापूर.
**२) ज्योती सर्जेराव पाटील,**
वय - ४३ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. एकलासपूर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर.
**३) शक्तीदेवी रविकिरण पाटील,**
वय - ४० वर्षे, धंदा - घरकाम,
रा. जाधववाडी, चिखली जि. पुणे
**४) गोकुळ सर्जेराव पाटील,**
वय - ३७ वर्षे, धंदा - शेती,
रा. पाथरी, ता. बार्शी, जि. सोलापूर
— **अर्जदार**
विरूध्द
**कोणी नाही** - **सा.वाला**

तमाम जनतेस या जाहीर प्रसिद्धीकरणाद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी यात मूळ पुरुष सर्जेराव वैजिनाथ पाटील हे असून त्यांना अर्जदार नं. **१** सिंधु हि पत्नी आहे. अर्जदार नं. **२** ज्योती, अर्जदार नं. **३** शक्तीदेवी हे यातील मयत सर्जेराव व अर्जदार नं. १ सिंधु यांच्या मुली आहेत. तर अर्जदार नं **४** गोकुळ हा यातील मयत सर्जेराव व अर्जदार नं. १ सिंधु यांचा मुलगा आहे, अशाप्रकारे यातील मयत सर्जेराव व अर्जदार नं. १ सिंधु यांना एकूण ३ अपत्ये होती. यातील मूळ पुरुष म्हणजेच सर्जेराव वैजिनाथ पाटील हे दिनांक ११/०२/२०२६ रोजी मयत झालेले आहेत. यातील अर्जदार नं १ ते ४ यांना शासकीय, निमशासकीय कार्यालयीन कामकाजाकरिता तसेच फॉर्मल recognition साठी अर्जदार नं १ ते ४ यांना वारस दाखल्याची गरज आहे. त्यामुळे यातील अर्जदारांनी त्यांना वारस दाखला मिळणे बद्दल हा अर्ज मे या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, सदर मयत सर्जेराव वैजिनाथ पाटील यांना यातील अर्जदार व्यतिरिक्त इतर कोणाचा वारसा हक्क हितसंबंध असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत वकिलामार्फत अगर स्वतः मे कोर्टात नेमलेल्या तारखेसह दि. ०७/०८/२०२६ रोजी अगर त्यापूर्वी हजर होऊन म्हणणे मांडावे सदर मुदतीत कोणाचीही तक्रार न आल्यास यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारसा दाखला देणेत येईल याची नोंद घ्यावी.

हे प्रसिद्धीकरण माझ्या सहीने व मे. कोर्टाचे सही शिक्यानिशी दिले ता. २७/०७/२०२६.

**सही/-** **कनिष्ठ लिपीक**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**अधीक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय**
**क स्तर बार्शी, जि. सोलापूर**



### जाहीर समन्स

रे.मु.नं. २५५/२०२३
निशाण क्र.

**मोहोळ येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**
**(मा. श्री. एस.व्ही. मुंडे साहेब)**

**अनिल बळवंत बचुटे वगैरे ३** - **वादी**
विरुद्ध
**शिवाजी आत्माराम शिंदे, वगैरे २१** - **प्रतिवादी**

प्रति -
**१०) चंद्रा शामराव जाधव, रा. तिऱ्हे,**
ता.उत्तर सोलापूर, जि. सोलापूर.
**११) निलेश भारत शिंदे, रा. वरकुटे,**
ता. मोहोळ, जि.सोलापूर.

ज्याअर्थी उपरोक्त वादी यांनी तुमच्या विरुद्ध अतिक्रमीत क्षेत्राचा ताबा मिळण्यासाठीचा दावा या न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. सदर दाव्याचे संदर्भात आपले म्हणणे मांडण्यासाठी दि. २५/०८/२०२६ रोजी मध्यान्ही ११.०० वाजता या न्यायालयात स्वतः अगर वकीलामार्फत हजर होण्यासाठी तुम्हाला बोलावण्यात येत आहे व आपल्या बचावाच्या पुष्ट्यर्थ तुम्ही ज्यांचा आधार घेऊ इच्छिता असे सर्व दस्तऐवज त्या दिवशी रूजू करण्याचा तुम्हाला आदेश देण्यात येत आहे.

सदर समन्स प्रसिध्द होऊनही आपण गैरहजर राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत दाव्याची सुनावणी होऊन निर्णय दिला जाईल, याची दखल घ्यावी.

हे जाहीर समन्स आज रोजी माझे सहीनिशी व शिक्यानिशी प्रसिद्ध केले असे.

**सही/-** **लिपिक**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर मोहोळ**





## स्वातंत्र्यवीर सावरकर शिक्षण प्रसारक मंडळ, वडशिंगे

**ता. माढा, जि. सोलापूर**

### थेट मुलाखत

संस्थेच्या सोलापूर जिल्ह्यातील अनुदानित माध्यमिक विद्यालयातील कनिष्ठ लिपिकाचे पद भरण्यासाठी खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या पात्र उमेदवारांनी संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल वडशिंगे, ता. माढा, जि. सोलापूर या पत्त्यावर रविवार दिनांक ०२/०८/२०२६ रोजी सकाळी १० ते १ या वेळेत थेट मुलाखतीसाठी उपस्थित राहावे.

| अ. क्र | पदाचे नाव | शैक्षणिक पात्रता | एकूण पदे | मानधन | आरक्षण प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ लिपीक | कोणत्याही शाखेचा पदवीधर मराठी-३० व इंग्रजी-४० टंकलेखन उत्तीर्ण व संगणकाचे ज्ञान आवश्यक | १ | १०,०००/- एकत्रित | खुला |

**सही/-**
**अध्यक्ष**
**स्वातंत्र्यवीर सावरकर शिक्षण प्रसारक मंडळ, वडशिंगे**
**ता. माढा, जि. सोलापूर**



### जाहीर नोटीस

सोलापूर येथील तमाम जनतेस विशेषतः अक्कलकोट ग्रामीण, ता. अक्कलकोट येथील जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन : डि व सब डि सोलापूर पैकी तालुका अक्कलकोट पैकी मौजे अक्कलकोट ग्रामीण येथील गट नं. १०१०/७, यासी क्षेत्र १ हे २१ आर यासी आकारणी रू. २-२५० पैसे जिरायत शेतजमिन

वर नमूद मिळकत ही शंकुतला शामराव व्हटकर यांच्याकडून आमचे अशिल विशाल चंद्रसेन राठोड, रा. १४३, खासबाग गल्ली, हसापूर रोड, अक्कलकोट यांनी दि. ३१/१२/२०२५ रोजी दस्त क्र. ९४०१/२०२५ अन्वये खरेदी घेतलेली आहे. सदरची शेतजमिन ही त्याचे मालकी कब्जेदार वहिवाटीचे असून सदरची मिळकत भोगवटदार २ मधील असून त्यास भोगवटदार १ मध्ये हस्तांतरण (तबदील) करण्यासाठी जा.क्र. कु.का/कार्या-२/ई.ऑ.क्र. ७३४५४००/आरआर/५५३/२०२६ अन्वये मा. जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांच्याकडून पत्र मा. तहसीलदार साहेब अक्कलकोट यांच्याकडे अटी व शर्तीस अधिन राहुन सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करत आहोत.

तरी वर नमूद मिळकतीबाबत इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक, हितसंबंध, गहाण, दान, लीज, टाच, पोटगी, कोर्ट प्रकरण व इतर कायदेशीर हक असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी आपली हरकत नोंदवावी. त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी.

जाहीर नोटीस दिली ता. २८/०७/२०२६

**सही/-**
**ॲड. सौ. अरूणा संजय घोडके (साळुंके)**
**ब्लॉक नं. ९, विद्युत नगर, लक्ष्मी पेठ,**
**सोलापूर मो. नं. ९५५२४७६२३८**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**



### सिलींग जमीन भोगवटदार वर्ग २ वरुन भोगवटदार वर्ग करीता जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मोजे भालगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील शेतजमीन गट नंबर २२२/१/ब मधील क्षेत्र हेक्टर १.२२ आर ही मिळकतीचे खातेदार श्री. तानाजी भिवा दराडे, रा मु.पो. भालगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर यांनी सदरची जमीन भोगवटदार वर्ग २ ची असल्याने सदर जमिनीची भोगवटदार वर्ग २ वरुन भोगवटदार वर्ग १ करीता आमचे अशील तानाजी भिवा दराडे यांनी मा. अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर (कुळकायदा शाखा) या कार्यालयास अर्ज सादर केलेला आहे.

तरी उक्त नमुद शेतजमिनीबाबत व त्यामध्ये झालेल्या व्यवहाराबाबत किंवा इतर कुठल्याही प्रकारचे व्यवहाराबाबत किंवा उक्त जमिनीबाबत कोणाचाही करार, लिज, भाडेपट्टा, पोटगी हक्क, वारसाहक्क, बोजा, गहाण, दान, लिन, कर्ज, कोर्ट केसेस, मृत्युपत्र, खरेदी विक्री, साठेखत, पतसंस्थेचा बोजा, सावकारी देणे घेणे इ. बाबत काही हरकत / तक्रार / हितसंबंध / अधिकार असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात (७) दिवसांचे आत मा. अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर (कुळकायदा), सात रस्ता, सोलापूर या पत्यावर आपली हरकत नोंदवावी. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झालेस कोणाचीही हरकत नाही असे समजून उक्त शेतजमिनीचा झालेला खरेदी व्यवहार विधीग्राह्य होणेसाठी पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

ता. २८/०७/२०२६

**सही/-**
**ॲड. राहुल अंकुश पाटील**
**जिल्हा व सत्र न्यायालय बार्शी**
**ता. बार्शी जि. सोलापूर**
**अशिल- तानाजी भिवा दराडे**



### जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु प्रकरण
अर्ज क्र. ९७/२०२६

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**१. हनुमंत प्रकाश घोडके** - **अर्जदार**
रा. काटी (वाणेवाडी) ता. जि. धाराशिव
(असल्यास, तर्फे वकील महेश आ जगताप)
विरुध्द
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी** - **गैरअर्जदार**
**तथा मुख्याधिकारी न.प. बार्शी**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराची मुलगी मृणाल हनुमंत घोडके रा. काटी (वाणेवाडी) ता. जि. धाराशिव यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र बार्शी बारबोले हॉस्पिटल ता. बार्शी जि सोलापूर या ठिकाणी दिनांक ०४ फेब्रुवारी २०२० रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराची मुलगी मृणाल हनुमंत घोडके यांचा दिनांक ०४ फेब्रुवारी २०२० रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र बार्शी बारबोले हॉस्पिटल ता. बार्शी, जि. सोलापूर या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून १ महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ११ जुन २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का

**सही/-**
**(एफ.आर. शेख)**
**तहसिलदार, बार्शी**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### कोरियाचा हॉकी संघ २० वर्षांनंतर पाकिस्तानात

**इस्लामाबाद :** कोरियाचा हॉकी संघ २० वर्षांत प्रथमच चार सामन्यांची मालिका खेळण्यासाठी पाकिस्तानात दाखल झाला आहे. पाकिस्तान हॉकी फेडरेशनच्या अधिकाऱ्यांनी विमानतळावर संघाचे स्वागत केले. पाकिस्तान आणि कोरिया यांच्यातील सामने ३० जुलै, २, ४ आणि ७ ऑगस्ट रोजी खेळले जातील. बेल्जियम आणि नेदरलँड्समध्ये होणाऱ्या विश्वचषकाच्या तयारीसाठी ही मालिका अत्यंत महत्त्वाची आहे. पाकिस्तानने अलिकडेच आपल्या संघासाठी एका परदेशी प्रशिक्षकाची नियुक्ती केली आहे. पाकिस्तानी संघ आठ वर्षांनंतर विश्वचषकात सहभागी होणार आहे. गेल्या वर्षी, पाकिस्तानला प्रो लीगमध्ये एकही सामना जिंकता आला नाही आणि तो नवव्या व शेवटच्या स्थानावर राहिला होता.

### डी. गुकेशला जावोखिर सिंदारोव्हचे आव्हान

**नवी दिल्ली :** विद्यमान बुद्धिबळ विजेता डी. गुकेश आणि आव्हानवीर जावोखिर सिंदारोव्ह यांच्यातील फिडे विश्व चॅम्पियनशिप २०२६ चा सामना स्वित्झर्लंडमधील जिनिव्हा येथे २५ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर दरम्यान खेळला जाईल. गुकेश आणि उझबेकिस्तानचा सिंदारोव्ह हे दोघेही फक्त २० वर्षांचे आहेत. त्यामुळे विश्व चॅम्पियनशिपच्या इतिहासातील खेळाडूंमधील हा सर्वात तरुण सामना ठरेल. गुकेशने २०२४ मध्ये चीनच्या डिंग लिरेनला हरवून विजेतेपद पटकावले होते. तो सर्वात तरुण विश्वविजेता आहे. फिडेचे अंतरिम अध्यक्ष विश्वनाथन आनंद यांनी या निर्णयाचे स्वागत करत म्हटले, भारत, अमेरिका आणि सायप्रससह अनेक देशांनी फिडे विश्व चॅम्पियनशिपचे आयोजन करण्याची इच्छा व्यक्त केली होती. विश्व चॅम्पियनशिप सामन्यात १४ क्लासिकल सामने असतील.

# गोळाफेकमध्ये पॅरा-ॲथलिट शर्मिला धनकरला सुवर्ण पदक

## राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा, शिल्पा के. शायलाला कांस्यपदक

**ग्लासगो, २८ जुलै**

भारतीय पॅरा-ॲथलिट शर्मिला धनकरने ग्लासगो येथे महिलांच्या गोळाफेक एफ ५७ प्रकारात ९.८१ मीटरच्या सर्वोत्तम फेकीसह सुवर्णपदक जिंकले. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पॅरा-ॲथलेटिक्समध्ये सुवर्णपदक जिंकणारी शर्मिला ही पहिली भारतीय खेळाडू ठरली.

याव्यतिरिक्त, वेटलिफ्टर वल्लुरी अजय बाबू आणि ज्ञानेश्वरी यादव यांनी प्रत्येकी रौप्यपदक जिंकले, ज्यामुळे राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारतासाठी आणखी एक प्रभावी दिवस ठरला.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये महिलांच्या शॉटपुट एफ ५७ प्रकारात सुवर्णपदक जिंकल्याबद्दल शर्मिला धनकर आणि कांस्यपदक जिंकल्याबद्दल शिल्पा के. शायला यांचे अभिनंदन केले. एका सोशल मीडिया पोस्टमध्ये राष्ट्रपती म्हणाल्या की, पॅरा-ॲथलेटिक्समध्ये भारताची पहिली राष्ट्रकुल क्रीडा सुवर्णपदक विजेती बनून शर्मिलाने एक ऐतिहासिक कामगिरी केली आहे.

युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत महिलांच्या शॉटपुट एफ ५७ प्रकारात सुवर्णपदक जिंकून इतिहास रचल्याबद्दल शर्मिला धनकरचे अभिनंदन केले. एका सोशल मीडिया पोस्टमध्ये मांडविया म्हणाले की, राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पॅरा-ॲथलेटिक्समध्ये सुवर्णपदक जिंकणारी शर्मिला ही पहिली भारतीय खेळाडू आहे. ते म्हणाले की, शर्मिलाच्या अदम्य धैर्याने जागतिक स्तरावर देशाला अभिमान वाटला आहे. (वृत्तसंस्था)



महिलांच्या 'गोळाफेक एफ ५७' प्रकारात अनुक्रमे सुवर्ण आणि कांस्यपदक जिंकल्यानंतर आनंद साजरा करताना भारताच्या शर्मिला धनकर (डावीकडे) आणि शिल्पा के. शायला

commonwealth games GLASGOW 2026

# सर्वेश कुशारेला उंच उडीमध्ये रौप्य पदक

## शेतकरी पुत्राचा ग्लासगोमध्ये यशाचा झेंडा

**ग्लासगो, २८ जुलै**

भारताचा राष्ट्रीय विक्रमधारक सर्वेश कुशारे याने २०२६ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत इतिहास रचला. ३१ वर्षीय खेळाडूने पुरुषांच्या उंच उडीत २.२५ मीटरची उडी मारून रौप्य पदक जिंकले. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या इतिहासात या प्रकारात रौप्य पदक जिंकणारा तो पहिला भारतीय ठरला आहे. यापूर्वी तेजस्विन शंकरने २०२२ च्या बर्मिंगहॅम गेम्समध्ये कांस्य पदक जिंकून इतिहास रचला होता.

सर्वेश आणि जमैकाचा रोमेन बेकफोर्ड या दोघांनीही २.२५ मीटरचा टप्पा यशस्वीरीत्या पार केला, परंतु दोघेही २.२८ मीटरवर अयशस्वी ठरले. हा निर्णय काउंटबॅक नियमावर आधारित होता. बेकफोर्डने सुवर्णपदक जिंकले, तर सर्वेशला रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. इंग्लंडच्या जॅक किमानीने २.२० मीटरच्या उडीसह कांस्य पदक जिंकले. भारताच्या आदर्श रामने २.१५ मीटर उडी मारून पाचवे स्थान पटकावले.

महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील देवगावचा रहिवासी असलेल्या सर्वेश कुशारेचा प्रवास खडतर राहिला आहे. त्याचे वडील कांद्याची शेती करतात. लहानपणी संसाधनांच्या कमतरतेमुळे, सर्वेशला उंच उडीचा सराव करता यावा यासाठी त्याच्या वडिलांनी आणि पहिल्या प्रशिक्षकाने मक्याची टरफले, कापूस आणि शेतातील इतर कचऱ्यापासून एक तात्पुरता लँडिंग पिट (उडी मारण्याचा खड्डा) तयार केला होता.

**डायमंड लीग जिंकल्याने आत्मविश्वास वाढला**

सर्वेश गेल्या काही महिन्यांपासून उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहे. या महिन्यात, त्याने मोनाको डायमंड लीगमध्ये २.२६ मीटर उडी मारून तिसरे स्थान पटकावले आणि डायमंड लीगमध्ये व्यासपीठावर पोहोचणारा तो चौथा भारतीय खेळाडू ठरला. यापूर्वी, त्याने भुवनेश्वर येथे झालेल्या राष्ट्रीय आंतर-राज्य चॅम्पियनशिपमध्ये २.३१ मीटर उडी मारून एक नवीन राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला होता. आपले पहिले राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील पदक जिंकल्यानंतर सर्वेश म्हणाला, हे माझे पहिले पदक आहे आणि एका मोठ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेतीलही माझे पहिलेच पदक आहे. ऑलिम्पिकच्या तयारीसाठी आशियाई क्रीडा स्पर्धा आणि राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा या महत्त्वाच्या स्पर्धा आहेत. ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकणे हे माझे ध्येय आहे. (वृत्तसंस्था)



पुरुषांच्या उंच उडीच्या अंतिम फेरीत रौप्यपदक जिंकल्यानंतर आनंद साजरा करताना सर्वेश कुशारे

# भारतीय महिला संघाचा मलेशियाकडून पराभव

## जागतिक स्क्वॅश ज्युनियर सांघिक चॅम्पियनशिप

**नवी दिल्ली, २८ जुलै**

नुकतीच जागतिक ज्युनियर चॅम्पियन बनलेल्या अनाहत सिंगने आपला सामना जिंकला, परंतु इतर भारतीय खेळाडू चांगली कामगिरी करू न शकल्याने, केनडातील ओंटारियो येथे सुरू असलेल्या जागतिक स्क्वॅश ज्युनियर सांघिक चॅम्पियनशिपमध्ये महिला संघाला मलेशियाकडून १-२ असा पराभव पत्करावा लागला.

पहिले दोन सामने गमावल्यानंतर, अनाहतने अंतिम सामन्यात व्हिटनी विल्सनचा ११-२, ११-४, ११-५ असा सहज पराभव केला. पहिल्या सामन्यात रुद्र सिंग हरलीन टँनकडून ५-११, ४-११, ६-११ अशी पराभूत झाली, तर पाच गेमच्या रोमांचक सामन्यात अनिका दुबे ये सान लीकडून ८-११, ११-८, ११-८, १०-१२, ९-११ अशी पराभूत झाली. यापूर्वी, भारतीय महिला संघाने आपल्या सलामीच्या सामन्यात चायनीज तैपईचा ३-० असा पराभव केला होता. आता संघाचा पुढचा सामना दक्षिण आफ्रिकेविरुद्ध होईल, तर पुरुष संघ कुवेतविरुद्ध खेळेल. (वृत्तसंस्था)



स्कॉटलंडमधील ग्लासगो येथे झालेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील पुरुषांच्या ७९ किलो वजनी गटातील भारोत्तोलन स्पर्धेनंतर, सुवर्णपदक विजेता मलेशियाचा एरी हिदायत मुहम्मद. सोबत रौप्यपदक विजेता भारताचा वल्लुरी अजय बाबू आणि कांस्यपदक विजेता इंग्लंडचा ख्रिस मरे

# श्रीहरी १०० मीटर बॅकस्ट्रोकच्या उपांत्य फेरीत

## साजन प्रकाश ५० मीटर बटरफ्लायमधून बाहेर

**ग्लासगो, २८ जुलै**

भारतीय जलतरणपटू श्रीहरी नटराजने राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या जलतरण स्पर्धेतील १०० मीटर बॅकस्ट्रोकच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे, तर अनुभवी साजन प्रकाश मंगळवारी येथे पात्रता फेरीच्या हीटमध्ये (प्राथमिक फेरी) बाहेर पडला.

नटराजने ५५.५८ सेकंदांची वेळ नोंदवत आपल्या हीटमध्ये पाचवे आणि एकूण १३ वे स्थान पटकावले. प्राथमिक फेरीतील १६ सर्वात वेगवान जलतरणपटू अंतिम फेरीत प्रवेश करतात. नटराजची ५० मीटरनंतरची वेळ २६.२६ सेकंद होती. त्याची वैयक्तिक सर्वोत्तम वेळ ५३.७७ सेकंद आहे, जो एक राष्ट्रीय विक्रम देखील आहे.

दरम्यान, साजन पुरुषांच्या ५० मीटर बटरफ्लाय प्रकारात आपल्या हीटमध्ये आठव्या आणि एकूण २८व्या स्थानावर राहिल्याने उपांत्य फेरीसाठी पात्र ठरू शकला नाही.

३२ वर्षीय साजन नवव्या आणि अंतिम पात्रता गटाचा भाग होता. त्याने २४.९४ सेकंदांची वेळ नोंदवली, त्यामुळे तो स्पर्धेतून बाहेर पडला. तो त्याच्या २३.८३ सेकंदांच्या वैयक्तिक सर्वोत्तम वेळेच्या जवळपासही पोहोचू शकला नाही, जो एक राष्ट्रीय विक्रम देखील आहे. दोन वेळा ऑलिम्पिकमध्ये सहभागी झालेला साजन सोमवारी २०० मीटर बटरफ्लायच्या अंतिम फेरीत आठव्या आणि शेवटच्या स्थानावर राहिला. त्याने १:५८.०५ सेकंदांची वेळ नोंदवली. त्याची कामगिरी निराशाजनक होती, कारण त्याची वैयक्तिक सर्वोत्तम आणि राष्ट्रीय विक्रम १:५६.३८ सेकंद आहे. २५ वर्षीय नटराज देखील भारताच्या ४x२०० मीटर फ्रीस्टाइल रिले संघाचा भाग होता, ज्याने अंतिम फेरीत सहावे स्थान मिळवले. भारताला राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत जलतरणाचे एकमेव पदक प्रशांत कर्माकरने मिळवले, ज्याने २०१० मध्ये दिल्ली येथे झालेल्या स्पर्धेत ५० मीटर फ्रीस्टाइल एस९ पॅरा प्रकारात तिसरे स्थान पटकावले. (वृत्तसंस्था)



# सोनम, हिमांशूने पटकावले कांस्य पदक

### आयएसएसएफ विश्वचषक स्पर्धा

**हांगझू, २८ जुलै**

रायफल नेमबाज सोनम उत्तम मस्कर आणि हिमांशु ढिल्लन यांनी येथे आयएसएसएफ विश्वचषक स्पर्धेत १० मीटर एअर रायफल मिश्र सांघिक स्पर्धेत कांस्यपदक जिंकले. या विश्वचषकात भारताने आता एक सुवर्ण, एक रौप्य आणि दोन कांस्य पदके पटकावली आहेत.

सोनमने ३१७.२ आणि हिमांशूने ३१७.४ अशी एकूण ६३४.६ गुणांची नोंद केली. एलावेनिल वलारिवन (३१६.८) आणि पार्थ राकेश माने (३१७.४) ६३४.२ गुणांसह पाचव्या स्थानी राहिले. सोनम आणि हिमांशूने अंतिम फेरीत ४४९.२ गुण मिळवून चायना वन आणि चायना टू यांच्यामागे कांस्यपदक पटकावले. एलावेनिल आणि पार्थ चौथ्या स्थानी राहिले. (वृत्तसंस्था)



# भारतीय खेळाडूंची निराशाजनक कामगिरी

**तैपेई (तैवान), २८ जुलै**

तैपेई ओपन सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेच्या पात्रता फेरीत भारतीय खेळाडूंची कामगिरी निराशाजनक ठरली असून, मंगळवारी झालेल्या पुरुष एकेरीच्या पात्रता फेरीच्या दुसऱ्या फेरीत केवळ रौनक चौहानच पुढे सरकला आहे.

दुसरे मानांकित चौहानने पात्रता फेरीत केनडाच्या जोशुआ गुयेनचा २१-१५, २१-११ असा पराभव केला. आता त्याचा पुढील सामना चायनीज तैपेईच्या कुआन लिन कुओशी होईल.

रौनक वगळता, पुरुष एकेरीच्या पात्रता फेरीत सहभागी झालेले इतर सर्व भारतीय खेळाडू पहिल्याच फेरीत बाद झाले. ऋत्विक संजीव जपानच्या अव्वल मानांकित रिको ताकेईकडून १०-२१, ११-२१ असा पराभूत झाला, तर शंकर सुब्रमण्यम अमेरिकेच्या गॅरेट टॅनकडून १७-२१, १०-२१ असा पराभूत झाला.

तुषार सुवीरने कडवी झुंज दिली, पण अखेरीस तो चायनीज तैपेईच्या कुआन लिन कुओकडून १९-२१, २१-१६, १२-२१ ने पराभूत झाला. महिला एकेरीच्या पात्रता फेरीत सहभागी झालेली एकमेव भारतीय खेळाडू, चौथी मानांकित आकर्षी कश्यप, देखील चांगली कामगिरी करू शकली नाही आणि मलेशियाच्या किसोना सेल्वदुरेकडून १५-२१, १९-२१ ने पराभूत झाली. पुरुष दुहेरीच्या पात्रता फेरीत, अच्युतादित्य राव डोड्डावरपू आणि अर्जुन रेड्डी पोचना या भारतीय जोडीलाही चायनीज तैपेईच्या चेन बो युआन आणि लू मिंग चे यांच्याकडून ५-२१, ८-२१ ने पराभव पत्करावा लागला. (वृत्तसंस्था)

## श्रीलंका कसोटी मालिकेसाठी

# भारतीय संघ जाहीर

## सारांश जैनला संधी, जडेजाचे पुनरागमन, बुमराहचा निर्णय तंदुरुस्तीवर अवलंबून

**नवी दिल्ली, २८ जुलै**

बीसीसीआयने श्रीलंकेविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी भारतीय संघ जाहीर केला आहे. अष्टपैलू रवींद्र जडेजाचे संघात पुनरागमन झाले आहे. सारांश जैन हा संघातील नवीन चेहरा आहे. शुभमन गिल कर्णधार आणि केएल राहुल उपकर्णधार असेल.



सारांश जैन



रवींद्र जडेजा

वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह आणि साई सुदर्शन यांचा संघात समावेश करण्यात आला आहे, परंतु त्यांचा सहभाग त्यांच्या तंदुरुस्तीवर अवलंबून असेल. तंदुरुस्त नसल्यामुळे नितीश कुमार रेड्डीची निवड झालेली नाही. हॅम्स्ट्रिंगच्या दुखापतीमुळे वॉशिंग्टन सुंदर पहिल्या कसोटीतून बाहेर झाला आहे. दोन सामन्यांची कसोटी मालिका १५ ऑगस्ट रोजी गॉल येथे सुरू होईल.

**सारांशची कामगिरी**

मध्य प्रदेशचा फिरकी अष्टपैलू खेळाडू सारांश जैनचा भारतीय कसोटी संघात पहिल्यांदाच समावेश करण्यात आला आहे. त्याने नुकतेच श्रीलंका दौऱ्यावर भारत 'अ' संघाकडून खेळताना दुसऱ्या चार दिवसीय सामन्यात नाबाद ७० धावा केल्या आणि सहा बळी घेतले. ऑफ-स्पिनर सारांशने आतापर्यंत ५४ प्रथम-श्रेणी सामन्यांमध्ये ३१.७५ च्या सरासरीने २,२२३ धावा केल्या आहेत. त्याने १८८ प्रथम-श्रेणी बळीही घेतले आहेत.

भारतीय फलंदाजीचा क्रम कायम आहे. केएल राहुल आणि यशस्वी जयस्वाल डावाची सुरुवात करतील. कर्णधार शुभमन गिल चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करेल. साई सुदर्शनसोबत देवदत्त पडिक्कलही संघात आहे. ऋषभ पंत यष्टीरक्षकाची जबाबदारी सांभाळेल. ध्रुव जुरेल राखीव यष्टीरक्षक असेल. फिरकी विभागात रवींद्र जडेजा आणि कुलदीप यादव यांचा संघात समावेश आहे. आपल्या कसोटी पदार्पणात ७ बळी घेणारा मानव सुथारही संघात आहे. वेगवान गोलंदाजीची धुरा बुमराह, सिराज आणि प्रसिद्ध सांभाळतील. भारत आणि श्रीलंका यांच्यातील पहिला कसोटी सामना १५ ऑगस्टपासून गॉल येथे खेळला जाईल. दुसरा कसोटी सामना २३ ऑगस्टपासून कोलंबो येथील एसएससी मैदानावर खेळला जाईल. (वृत्तसंस्था)

# जीत कुने डो मार्शल आर्ट स्पोर्ट्स स्पर्धा पारितोषिक वितरण उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**

**सोलापूर, दि. २८ जुलै -**

सोलापूर जिल्हा जीत कुने डो मार्शल आर्ट स्पोर्ट्स स्पर्धा २०२६ मध्ये प्राविण्य प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ व प्रमाणपत्र वितरण सोहळा ग्रँडमास्टर युवराज गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात पार पडला.

अनुपम पार्क, सैफुल येथे या सोहळ्याचे अध्यक्षस्थान अभिजीत गायकवाड यांनी भूषवले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून वसुंधरा कला महाविद्यालयाचे प्रा. डॉ. मारुती घंटेवाड, प्रा. डॉ. बापू राऊत, चंद्रकांत कमळे, कुमार नारायणे, शस्त्रांग मार्शल आर्ट असोसिएशनचे सचिव सम्राट गायकवाड, टेक्निकल डायरेक्टर किशोर चंदनशिवे, कार्याध्यक्ष सुनील बरगोडिया, संदीप गायकवाड, नागेश कांबळे, लेडीज कोच वैभवी दळवी, किमया सपाटे आदी उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांसमोर शिस्त, आत्मविश्वास, नियमित सराव आणि शिक्षणासोबत खेळाचे महत्त्व यावर विचार मांडले. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. ग्रँडमास्टर युवराज गायकवाड आणि टेक्निकल डायरेक्टर आनंद जाधव यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



# अक्कलकोटमध्ये श्रीमंत विजयसिंहराजे भोसले क्रिकेट ट्रेनिंग अकॅडमीस आज सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**

**अक्कलकोट, दि. २८ जुलै-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून ३९ वर्षांमध्ये अनेक उल्लेखनीय उपक्रम राबविले जात आहेत. यामध्ये क्रीडा क्षेत्राची भर पडली आहे. गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून मंडळालगत असलेल्या एस.टी. बस वाहनतळ जागेत श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ ट्रस्ट अक्कलकोट संचलित अक्कलकोट नरेश श्रीमंत विजयसिंहराजे भोसले क्रिकेट ट्रेनिंग अकॅडमीस बुधवारी (दि.२९) सुरुवात होईल.



या अकॅडमीच्या माध्यमातून क्रिकेट महिला व पुरुष खेळाडूंना सराव करिता चेंजिंग रूम, कॅफे, ओपन जीम इ. सर्व अत्याधुनिक सोयी-सुविधांसह उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदरचे टर्फ हे दर तासी माफक दर आकारले जाणार आहे. अकॅडमी उभारणी कामी सोलापूर क्रिकेट असोसिएशनचे चंद्रकांत रेम्बोर्सी, सुनिल मालप, किशोर बोरामणी, उदय डोके, राजेंद्र गोटे, संतोष बडवे, अभिजित गुंड यांचे सहकार्य लाभले असून, या अकॅडमीच्या टर्फची उभारणी धर्मराज सिंग, सिंगसब स्पोर्टस्, मुंबई यांनी केली आहे.

याचा उद्घाटन सोहळा केंद्रीय हवाई राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, पालकमंत्री, जयकुमार गोरे, रोजगार हमी योजना मंत्री भरतशेठ गोगावले, चिपळूणचे आमदार शेखर निकम, येथील आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी गृहराज्य मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, सी.ए.महेश गावस्कर (पुणे), अखिल भारतीय मंडई मंडळ पुणे अध्यक्ष जनार्दन उर्फ अण्णा गणपत थोरात यांच्या हस्ते व श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष- जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली आणि माजी भारतीय क्रिकेटपटू व आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक चंद्रकांत पंडित, माजी भारतीय क्रिकेटपटू व प्रशिक्षक समीर दिघे, रणजी ट्रॉफी सिलेक्टर संजय पाटील, सिंगस स्पोर्ट्स मुंबईचे धर्मराज गोपाल सिंग, ॲड. नितीन हबीब, ॲड. संतोष खोबरे तसेच ओंकारेश्वर उटगे, अरविंद शिंदे, योगेश अहंकारी, बालाजी सलगर, किरण पाटील आदी इंजिनिअर्स व कॉन्ट्रॅक्टर यांच्या प्रमुख उपस्थितीत २९ जुलै बुधवारी दु. १२.३० वा. होणार आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### सोलापुरात भटक्या कुत्र्यांचा वाढता उपद्रव; व्यापक नसबंदी व लसीकरणाची मागणी

**सोलापूर, दि. २८ जुलै-**

शहरात, विशेषतः प्रभाग क्र. ५ मध्ये भटक्या कुत्र्यांचा वाढता उपद्रव नागरिकांसाठी गंभीर समस्या बनला आहे. यावर तातडीने उपाययोजना म्हणून व्यापक नसबंदी, रेबीज प्रतिबंधक लसीकरण आणि स्वतंत्र नियंत्रण कक्ष सुरू करण्याची मागणी भाजप नगरसेवक तथा स्थायी समिती सदस्य बिज्जू संगप्पा प्रधाने यांनी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. भवानी पेठेतील घोंगडे वस्तीतील चिमुकल्याच्या मृत्यूचा उल्लेख करत त्यांनी शाळा, रुग्णालये व सार्वजनिक ठिकाणी विशेष मोहीम राबवणे, हेल्पलाइन सुरू करणे, तात्काळ पथके नियुक्त करणे, जनजागृती करणे आणि मोहिमेचा नियमित सार्वजनिक आढावा जाहीर करण्याची मागणी केली.



### वर्ल्ड डिजिटल डिटॉक्स दिनानिमित्त सिंहगड महाविद्यालयाचा गौरव

**पंढरपूर, दि.२८ जुलै-**

वर्ल्ड डिजिटल डिटॉक्स दिन व झेप फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने एस. के. एन. सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, कोर्टी, पंढरपूर यांना ''डिजिटल वेलबीइंग क्षेत्रातील चार वर्षांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल'' प्रतिष्ठेचा आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. याबाबतची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलास करांडे यांनी दिली. पुरस्कार वितरण सोहळा झेप फाउंडेशन व वर्ल्ड डिजिटल डिटॉक्स दिन यांच्या संस्थापिका डॉ. रेखा चौधरी, समन्वयक सौ. वैशाली चव्हाण, उपप्राचार्य डॉ. स्वानंद कुलकर्णी, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. चंद्रकांत देशमुख, प्रा. सुमित इंगोले, प्रा. गुरुराज इनामदार यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. सूत्रसंचालन विद्यार्थिनी राधिका निकम व वैभवी पवार यांनी केले.

### बसु अण्णारेड्डी सोलापूर शहर व जिल्हयातून १ वर्षाकरीता तडीपार

**सोलापूर, दि. २८ जुलै-**



सोलापूर - गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असलेला सदर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार बसु सुनकप्पा अण्णारेड्डी(वय-४८ वर्षे, रा. धम्म नगर, कोंचीकोरवी गल्ली, मौलाली चौक, सोलापूर) यास सोलापूर शहर व उर्वरित सोलापूर जिल्ह्यातून १ वर्षाकरीता तडीपार करण्यात आले आहे.त्याच्या विरुद्ध सन २०१७,२०२० व २०२६ या कालावधीमध्ये गैरकायद्याची मंडळी जमा करुन दंगा व मारामारी करणे, घातक शस्त्रे जवळ बाळगून दहशत निर्माण करणे, जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे यासारख गुन्हे दाखल असल्याने त्याचेविरुध्द सदर बझार पोलीस ठाणेकडून महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वयेचा तडीपार प्रस्ताव पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ), सोलापूर शहर यांना सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाचे अनुषंगाने पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ) प्रितम यावलकर यांनी कार्यवाही करुन त्यांचेकडील तडीपार आदेश जा.क्र.१९६७/२०२६ दि.२२/०७/२०२६ अन्वये सदर गुन्हेगाराला सोलापूर शहर व उर्वरीत सोलापूर जिल्हा येथून एक वर्षाकरीता तडीपार केले आहे.

# ग्रीन बिल्डिंगला मिळणार मिळकत करात १० टक्के सूट

**▶▶ महापालिकेचा निर्णय**

**▶▶ सात निकषांची करावी लागणार पूर्तता**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जुलै-**

वाढते शहरीकरण, ऊर्जा वापर, पाण्याची टंचाई, वायू प्रदूषण आणि वाढते तापमान या समस्यांवर पर्यावरणपूरक व शाश्वत बांधकाम हा प्रभावी उपाय मानला जात आहे. याच पार्श्वभूमीवर सोलापूर महानगरपालिका स्थायी समितीने शहरात ग्रीन बिल्डिंग संकल्पनेला प्रोत्साहन देण्यासाठी म हत्वपूर्ण निर्णय घेतला असून, ग्रीन बिल्डिंग प्रमाणपत्र प्राप्त इमारतींना मिळकत करात १० टक्के सवलत देण्याचा अभिनव उपक्रम सुरू केला आहे.

शहरात पर्यावरणपूरक व हरित इमारतींचा प्रसार व्हावा, ऊर्जा व पाण्याची बचत व्हावी तसेच प्रदूषणात घट व्हावी, या उद्देशाने ही योजना राबविण्यात येत आहे. या सवलतीमुळे नागरिकांना पर्यावरणस्नेही बांधकाम ाकडे वळण्यास प्रोत्साहन मिळणार आहे. ग्रीन बिल्डिंग कर सवलतीचा लाभ घेण्यासाठी इमारतींनी निश्चित करण्यात आलेल्या सात निकषांची पूर्तता करणे आवश्यक राहणार आहे. त्यामध्ये सौर ऊर्जा, नैसर्गिक वायुवीजन व एलईडी दिव्यांच्या माध्यमातून ऊर्जा बचत, वर्षा जलसंधारण व जलपुनर्भरण व्यवस्था, पर्यावरणपूरक व टिकाऊ बांधकाम साहित्याचा वापर, कचऱ्याचे वर्गीकरण व पुनर्वापर, नैसर्गिक प्रकाशाचा अधिकाधिक वापर, गच्चीवरील बाग व परिसरात वृक्षारोपणाद्वारे जैवविविधतेला प्रोत्साहन तसेच प्रदूषणमुक्त पर्यावरणपूरक वाहनांचा वापर या बाबींचा समावेश आहे.

या वलतीसाठी मिळकतधारकांनी मान्यताप्राप्त संस्थेकडून प्राप्त वैध ग्रीन बिल्डिंग प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहणार आहे. ही सवलत नवीन तसेच नूतनीकरण केलेल्या जुन्या इमारतींनाही लागू राहणार आहे.

**या सात निकषांची पूर्तता आवश्यक**
- सौर ऊर्जा, नैसर्गिक वायुवीजन, एलईडी दिवे आदींचा वापर.
- वर्षा जलसंधारण व जलपुनर्भरण प्रणाली.
- पर्यावरणपूरक, कमी प्रदूषण करणारे व टिकाऊ बांधकाम साहित्य.
- कचऱ्याचे व्यवस्थापन व पुनर्वापर.
- नैसर्गिक प्रकाशाचा प्रभावी वापर.
- गच्चीवरील बाग व परिसरात वृक्षारोपण करून जैवविविधतेला प्रोत्साहन.
- प्रदूषणमुक्त पर्यावरणपूरक वाहनांचा वापर.

**शहराच्या पर्यावरणीय गुणवत्ता निर्देशांकात सुधारणा होईल : रंजिता चाकोते**

स्थायी समितीच्या सभापती रंजिता चाकोते म्हणाल्या, या निकषांची पूर्तता करणाऱ्या मिळकतधारकांनी मान्यताप्राप्त संस्थेकडील वैध ग्रीन बिल्डिंग प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. ही सवलत नवीन तसेच नूतनीकरण केलेल्या जुन्या इम ारतींनाही लागू राहील. नागरिकांनी ग्रीन बिल्डिंगकडे कल वाढविल्यास शहराच्या पर्यावरणीय गुणवत्ता निर्दे शांकात सुधारणा होईल. ऊर्जा व पाण्याची मोठ्या प्रमाणात बचत होईल, पर्यावरणावर सकारात्मक परिणाम होईल, शाश्वत शहरी विकासाला चालना मिळेल तसेच स्वच्छ भारत अभियान व हरित शहर अभियानासही हातभार लागेल.

### जागेच्या वादातून मारहाण करून दिली जीवे मारण्याची धमकी

**चुलत भावावर गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जुलै-**



जागेच्या वादातून चुलत भावाला मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी दुसऱ्या चुलत भावावर एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गिरीष नरसय्या इप्पाकायल (रा-कर्णिक नगर सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून याबाबत राम दास नरसय्या इप्पाकायल (रा-सी/१४ एमआयडीसी अ. कोट रोड सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीचा चुलत भाऊ म्हणजे यातील आरोपी हा दि २७ जुलै रोजी १२.२० वा चे सुमारास फिर्यादीच्या कब्जे वहीवाटी च्या जागेत येवून सदर जागा माझे वडीलांची असून तुमचा या जागेवर काही हक्क नाही असे म्हणून फिर्यादीला शीवीगाळ करून जिवे मारण्याची दमदाटी केली. तसेच सदर मालमत्ता ही तुमच्याकडून हिसकावून घेणार असल्याचे सांगून फिर्यादीला तोंडावर मारून ढकलून दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस हवालदार डोके हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.



### अर्णव संकुलाचे शिष्यवृत्ती परीक्षेत ४३ विद्यार्थी पात्र

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २८ जुलै-**

सासुरे फाटा परिसरातील अर्णव शैक्षणिक संकुलच्या विद्यार्थ्यांनी पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता चौथी) आणि पूर्व माध्यमिक (इयत्ता सातवी) शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केले आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात संकुलातील तब्बल ४३ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत.

परीक्षेत दोन्ही इयत्तांमधील विद्यार्थ्यांनी गुणांची टक्केवारी राखत उत्कृष्ट कामगिरी केली. अनेक विद्यार्थ्यांनी १५० हून अधिक गुण मिळवून आपले नाव उज्वल केले आहे. त्यापैकी दोन्ही वर्गांतील चम कलेले गुणवंत विद्यार्थी खालीलप्रम ाणे - इयत्ता चौथी (पूर्व उच्च प्राथमिक): आर्यन माने - २२२ गुण, सोनम जाधव - २०४, श्रुती बोधले - २००. इयत्ता सातवी (पूर्व माध्यमिक): स्वराज बोधले - २४२, श्रुती आवारे - २४१, संस्कृती सोलनकर - २०६. या मुख्य गुणवंतांसोबतच संकुलातील इतर अनेक विद्यार्थ्यांनीही १५० पेक्षा जास्त गुण मिळवून पात्रतेचा टप्पा यशस्वीपणे पार केला आहे. या यशाबद्दल संस्थेचे सचिव रवींद्र कापसे आणि मुख्याध्यापिका अर्चना डिसले यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

### रत्नाई पुरस्काराचे थाटात वितरण



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २८ जुलै-**

श्री जयसिंह मोहिते पाटील विद्यालय, संग्राम नगर येथे रत्नाई पुरस्कार वितरण समारंभ उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण विस्तार अधिकारी भक्ती नाचणे तर प्रमुख पाहुणे म्हणून जावेद मुलाणी, निशा गिरमे, महादेवराव अंधारे, मुख्याध्यापक राजेंद्र फडतरे व प्राथमिक विभाग मुख्याध्यापक गणेश करडे उपस्थित होते.

प्रतिमापूजन व स्वागतगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी रत्नाई पुरस्काराने गौरविण्यात आलेले विद्यार्थी आराध्या इंगळे, विनायक इंगळे, हिंदवी देवशेटे, सारा शेख, हर्षवर्धन जाधव, चि. सोहम पवार, समर्थ काळे, ज्ञानेश्वरी उबाळे, वेदा काळे, सिद्धेश्वर स्वामी, श्रेया क्षीरसागर, संयोगिता माने, अनम शेख व अनुष्का मगर यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन गणेश करडे व सुभाष चव्हाण यांनी केले. संगीत विभाग व विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'सारे जहाँ से अच्छा' या समूहगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## अभय योजनेत गाळे सीलचे उद्दिष्ट पूर्ण न केल्याने १४ कर्मचाऱ्यांवर दंड

**लँड फी, मेजर व मिनी गाळे पथकातील अधिकारी-कर्मचाऱ्यांवर १ हजार ते ५ हजारांची कारवाई**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जुलै-**

महापालिकेच्या अभय योजनेअंतर्गत गाळे सील करण्याचे दैनंदिन उद्दिष्ट पूर्ण न करता आयुक्तांच्या आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी भूमी व मालमत्ता विभागातील लँड फी, मेजर गाळे आणि मिनी गाळे पथकातील १४ अधिकारी व कर्मचाऱ्यांवर आर्थिक दंडाची कारवाई करण्यात आली आहे. अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांनी आदेश जारी केले आहेत.

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीत ६ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत अभय योजनेअंतर्गत शहरातील गाळेधारकांच्या थकबाकीवरील दंडाची १०० टक्के माफी देऊन सप्टेंबर २०२६ पर्यंत संपूर्ण थकीत भाडे वसूल करण्याचे निर्देश देण्यात आले होते. तसेच थकबाकी न भरणाऱ्या गाळेधारकांचे गाळे सील करण्यासाठी वसुली पथके स्थापन करून दररोज किमान पाच गाळे सील करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते.

मात्र, संबंधित पथकांनी सोमवारी हे उद्दिष्ट पूर्ण केले नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे आयुक्तांच्या आदेशाचे उल्लंघन करून कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत महसूल उत्पन्न वाढीस बाधा आणल्याबद्दल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांतर्गत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर आर्थिक दंडाची कारवाई करण्यात आली. महापालिका आयुक्तांच्या आदेशानुसार सहाय्यक आयुक्त विनोद कुलकर्णी यांनी या सदर्भात कर्मचाऱ्यांचा अहवाल सादर केला. त्यानुसार अतिरिक्त आयुक्त पवार यांनी ही कारवाई केली.

लँड फी पथकातील पाच कर्मचाऱ्यांवर प्रत्येकी ५ हजार रुपये दंड करण्यात आला आहे. यामध्ये आर. एस. शिवशिंपी, श्रीकांत यादव, सचिन गडदे, ए. व्ही. क्षीरसागर आणि सोमनाथ अंकुशे यांचा समावेश आहे.

मेजर गाळे पथकातील बी. आर. रोडगे, डी. एम. बनसोडे, विजय जाधव आणि अनिल तडलगी यांच्यावर प्रत्येकी १ हजार रुपये दंडाची कारवाई करण्यात आली आहे. मिनी गाळे पथकातील पी. पी. जाधव, रघुनाथ सुरवसे, राजरत्न कांबळे, एस. एन. कुरापाटी आणि अजिंक्य चव्हाण यांच्यावरही प्रत्येकी १ हजार रुपये दंड आकारण्यात आला आहे. दंडाची रक्कम जुलै पेड इन ऑगस्ट २०२६ च्या वेतनातून वसूल करण्यात येणार आहे.

वरिष्ठांच्या आदेशांचे पालन न करणे, कामात हलगर्जीपणा करणे आणि महसूल वसुलीच्या कामात अडथळा निर्माण करणे हा गंभीर शिस्तभंग आहे. भविष्यात अशा प्रकारच्या निष्काळजीपणाबाबत अधिक कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांनी दिला आहे.

### मोटारीच्या धडकेने दुचाकीवरील दोघे जखमी

**सोलापूर, दि. २८ जुलै-**

रस्ता क्रॉस करीत असताना मोटारीच्या धडकेने दुचाकी वरील दोघेजण गंभीर जखमी झाले. हा अपघात शांती चौकाजवळील ताना-बाना चौकाजवळ रविवारी रात्रीच्या सुमारास घडला. महादेव मुत्तण्णा इमडे (वय १८ रा. विडी घरकुल कुंभारी) महादेव फुटलगी (वय २६ रा.आकाशवाणी केंद्र) अशी जखमींची नावे आहेत. ते दोघे तानाबाना चौक येथे रस्ता क्रॉस करीत होते. त्यावेळी शांती चौकच्या दिशेने येणाऱ्या केए-२९-पी-२९ १७ ही मोटार धडकेने दोघे जखमी झाले. त्यांना उपचारासाठी पवन मारता याने शासकीय रुग्णालयात दाखल केले.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांचा सन्मान

**▶▶ स्वच्छता, आरोग्य सेवा आणि समन्वयात्मक नियोजनाची दखल**

**▶▶ 'निर्मलवारीसमृद्धवारी'चा यशस्वी झाला समारोप; वारी व्यवस्थापनात सोलापूर जिल्हा परिषदेचा राज्यस्तरीय गौरव**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जुलै -**

आषाढी वारीदरम्यान लाखो वारकऱ्यांना स्वच्छ, सुरक्षित आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राबविण्यात आलेल्या 'निर्मलवारीसमृद्धवारी' अभियानाचा आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाच्या 'चरणसेवा' उपक्रमाचा उत्साहपूर्ण वातावरणात समारोप झाला. यावेळी आषाढी यात्रेतील उत्कृष्ट नियोजन, प्रभावी स्वच्छता व्यवस्थापन आणि विविध विभागांमध्ये समन्वय साधत यशस्वी वारी घडवून आणल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांचा विशेष सन्मान करण्यात आला.



पंढरपूर पंचायत समिती येथे झालेल्या समारोप सोहळ्यात मुख्यमंत्री फडणवीस यांनी वारकऱ्यांच्या सेवेसाठी शासनाने राबविलेल्या विविध उपक्रमांचे कौतुक करत, डॉक्टर, स्वयंसेवक आणि युवकांनी 'चरणसेवा' उपक्रमातून केलेली निस्वार्थ सेवा ही महाराष्ट्राच्या युवा शक्तीचे प्रेरणादायी उदाहरण असल्याचे सांगितले. ते म्हणाले, महाराष्ट्राची संतपरंपरा आणि वारी ही राज्याच्या सांस्कृतिक अस्मितेचे प्रतीक आहे. लाखो वारकऱ्यांना स्वच्छ, सुरक्षित आणि सुसज्ज सुविधा उपलब्ध करून देणे ही शासनाची प्राथमिक जबाबदारी असून त्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने उत्कृष्ट कार्य केले आहे.यंदाच्या आषाढी वारीत सुमारे ३० ते ३५ लाख वारकऱ्यांनी पंढरपुरात दर्शन घेतले. या पार्श्वभूमीवर स्वच्छता, पिण्याचे पाणी, फिरते शौचालय, स्नानगृहे, विश्रांती केंद्रे, मोबाईल चार्जिंग सुविधा आणि आपत्कालीन आरोग्य सेवा प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यात आल्या. 'चरणसेवा' उपक्रमातून हजारो वारकऱ्यांना मोफत वैद्यकीय उपचार आणि औषधोपचाराचा लाभ मि ळाला.

पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, जिल्हा परिषदेने वारीच्या नियोजनात, स्वच्छता व्यवस्थापनात, वारकऱ्यांसाठी उभारलेल्या सुविधा आणि सर्व विभागांमध्ये प्रभावी समन्वय राखत उल्लेखनीय कामगिरी केली. या यशामागे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्या नेतृत्वाची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. चंद्रभागा नदी परिसर, वाळवंट आणि संपूर्ण पंढरपूर स्वच्छ ठेवण्यासाठी प्रशासन, स्वयंसेवी संस्था आणि नागरिकांनी संयुक्तपणे उल्लेखनीय योगदान दिले. समारोप कार्यक्रम ात 'निर्मलवारीसमृद्धवारी' आणि 'चरणसेवा' उपक्रमांवरील माहितीपट प्रदर्शित करण्यात आला. यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, जि.प. अध्यक्ष दीपक वैद्य, आमदार समाधान आवताडे, गोपीचंद पडळकर, मंगेश चव्हाण, माजी आमदार प्रशांत परिचारक, जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी आदी उपस्थित होते.

## कर्जमाफीला वेग; नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचा न्यायाचा प्रश्न कायम

**▶▶ २६ हजार २५३ शेतकरी कर्जमाफीसाठी पात्र; ५० हजार प्रोत्साहन अनुदानाची प्रतीक्षा कायम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जुलै-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत सोलापूर जिल्ह्यात कर्जमाफीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली असून पात्र शेतकऱ्यांच्या याद्या गावपातळीवर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. दुसरीकडे, नियमितपणे कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना जाहीर करण्यात आलेल्या ५० हजार रुपयांच्या प्रोत्साहन अनुदानाची अंम लबजावणी अद्याप न झाल्याने त्यांच्यात नाराजी वाढत आहे.

जिल्ह्यातील १,०७८ गावांतील पात्र लाभार्थ्यांची नावे सेवा सहकारी संस्था, तलाठी कार्यालये आणि संबंधित बँक शाखांमध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहेत. राज्य शासनाने पोर्टलवर नोंद असलेल्या ५९ हजार ८५१ थकीत कर्जदारांपैकी २६ हजार २५३ शेतकऱ्यांना कर्जमाफीसाठी पात्र ठरविले आहे. यापैकी गेल्या दोन दिवसांत ६ हजार ९३८ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण (ई-केवायसी) पूर्ण केले असून उर्वरित लाभार्थ्यांनी ३१ जुलैपूर्वी ही प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे.

योजनेचा लाभ घेण्यासाठी ॲग्रीस्टॅक नोंदणी आणि आधार प्रमाणीकरण अनिवार्य करण्यात आले आहे. ज्या शेतकऱ्यांनी अद्याप नोंदणी केलेली नाही, त्यांनी तातडीने आपले सरकार सेवा केंद्र किंवा सीएससी केंद्रावर जाऊन प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

प्रशासनाच्या माहितीनुसार येत्या ४ दिवसांत पात्र शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची प्रक्रिया पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. मात्र, कर्जमाफीचा लाभ वेगाने मिळत असताना वेळेवर कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना जाहीर केलेले ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान अद्याप प्रत्यक्षात मिळालेले नाही. त्याम ुळे आर्थिक शिस्त पाळणाऱ्या शेतकऱ्यांना प्रतीक्षा आणि थकीत कर्जदारांना तातडीचा लाभ, अशी विसंगती असल्याची भावना ग्रामीण भागात व्यक्त होत आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही शासनाने तातडीने न्याय द्यावा, अशी मागणी आता अधिक जोर धरत आहे.

**आधार प्रमाणीकरण पूर्णपणे मोफत**

कर्जमाफीसाठी पात्र शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅक नोंदणी आणि आधार प्रमाणीकरण कोणतेही शुल्क न देता पूर्ण करावे. ही सेवा आपले सरकार सेवा केंद्र, सीएससी केंद्र आणि संबंधित बँक शाखांमध्ये मोफत उपलब्ध असून कोणालाही पैसे देऊ नयेत, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक मुकुंद पवार यांनी केले आहे.



''पात्र शेतकऱ्यांनी ३१ जुलैपूर्वी ॲग्रीस्टॅक नोंदणी आणि आधार प्रमाणीकरण पूर्ण करावे. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कर्जमाफीचा लाभ जलदगतीने वितरित करण्यात येईल. आधार प्रमाणीकरणासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही.

**-मुकुंद पवार,**
**जिल्हा उपनिबंधक, सोलापूर**

**लाभासाठी हे करा**
- ॲग्रीस्टॅक नोंदणी अनिवार्य
- ई-केवायसी पूर्ण करा
- ३१ जुलैपूर्वी प्रक्रिया पूर्ण करा
- सेवा सहकारी संस्था, आपले सरकार सेवा केंद्र, सीएससी केंद्र किंवा संबंधित बँक शाखेत सुविधा उपलब्ध

# भक्ती, भावगीतांसह देशभक्तीपर गीतांना प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद

## श्रीस्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या वतीने धर्मसंकीर्तन व सांस्कृतिक महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२८ जुलै-**

गुरुपौर्णिमा व श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या ३९ व्या वर्धापन दिनानिमित्त श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली आयोजित केलेल्या धर्मसंकीर्तन व सांस्कृतिक म होत्सवांतर्गत मंगळवार, दि.२८ जुलै २०२६ रोजी निपाणी येथील श्री स्वामी समर्थ भक्त मंडळ प्रस्तुत 'सुर भक्तीचे उमटले' या कार्यक्रमाद्वारे सादर करण्यात आलेल्या भक्ती, भावगीतांसह देशभक्तीपर गीतांना प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. यावेळी महेश भोसले, अजिंक्य श्रीमान यांना विशेष गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सादरकर्ते अशोक जाधव, रितेश शहा, अमृत परीट, प्रतिक शहा, मंगेश सारंग यांचा सत्कार करण्यात आला.

प्रारंभी जनार्दन थोरात, बाळासाहेब दाभेकर, आबा बालगुडे, बाबासाहेब पाटील, लक्ष्मण झंपले, सारिका कुर्ले, अक्षय चौगुले, अमर सिरसाट, गणेश गोब्बुर, लखन झंपले, धर्मराज गुंजले, किशोर गायकवाड, वैभव काळे, मल्लिनाथ स्वामी, राजेंद्र लवटे, चंदन बकरे, पप्पू पवार, हर्षद शेलार, उमेश मेस्त्री, अनिल ऐनापुरे, संदीप खर्डीकर, प्रमोद घाडगे, सुधीर शिंदे, दिपक खेडेकर, सिद्धेश सुर्वे, बसवराज तिकोणे, सुरेश गायकवाड, सुबोध गायकवाड, सौरभ गायकवाड, प्रतिक वांजळे, राजेंद्र पंडित यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. संजय व सोमकांत कुलकर्णी यांनी पौरोहित्य केले. श्वेता हुल्ले यांनी सूत्रसंचालन केले. शामराव मोरे यांनी आभार मानले. उत्कृष्ट लाईट व्यवस्था शंभूराजे इलेक्ट्रिकल व मंडप सजावट कल्लप्पा छकडे यांनी केले.

यावेळी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ विश्वस्त, हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्था अध्यक्षा अलकाताई जनमेजयराजे भोसले, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ विश्वस्त, हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्था सचिवा अर्पिताराजे अमोलराजे भोसले, अनुयाताई फ गे, सरोजिनी मोरे, अनित खोबरे, स्वाती निकम, तेजस्विनीराजे भोसले, स्वामिनीराजे भोसले, दिव्या मोरे, स्मिता कदम, पल्लवी कदम, संगीता भोसले, रूपा पवार, स्वप्ना माने, प्रिया निकम, कविता वाकडे, सुवर्णा घाडगे, राजश्री माने, अनिता गडदे, धनश्री पाटील, कविता भोसले, छाया पवार, कल्पना मोरे, अक्षता मोरे, तृप्ती बाबर, कोमल क्षीरसागर, शितल क्षीरसागर, अक्षता खोबरे, रुपाली भोसले, अभय खोबरे, संदीप फुगे, हर्षवर्धनराजे भोसले, लक्ष्मण पाटील, संतोष भोसले, राजेंद्र लिंबीतोटे, राजाभाऊ निकम, मनोज निकम, बाळासाहेब कुलकर्णी, अश्पाक काझी, रोहित खोबरे, प्रवीण देशमुख, अप्पा हंचाटे, सौरभ मोरे, गणेश सोनटक्के, विजय इंगळे, बाबुराव कुलकर्णी, बालाजी पाटील, आकाश शिंदे, रोहन शिर्के, सागर गोंडाळ, डॉ. किरण पाटील, शिवराज स्वामी, रुद्रय्या स्वामी, प्रा.सायबण्णा जाधव, किरण जाधव, बाळासाहेब घाटगे, बाळासाहेब पोळ, आकाश गडकरी, कुमार सलबत्ते, लक्ष्मण विभूते, अक्षय मोरे, गणेश पाटील, शहाजी यादव, कुमार पाटील, प्रशांत साठे, सतीश महिंद्रकर, मल्लिकार्जुन बिराजदार, दत्ता माने, दत्ता मोरे, आकाश शिंदे, यश विभूते, श्रीनिवास गवंडी, लक्ष्मण बिराजदार, महांतेश स्वामी, संजय गोंडाळ, सिद्धेश्वर मसुती, प्रसाद मोरे, वैभव मोरे, फहीम पिरजादे, केदार तोडकर, योगेश पवार, आकाश सूर्यवंशी, सागर पवार, सागर जाधव, चंद्रकांत कुंभार, अभिषेक चव्हाण, लक्ष्मण शिंदे, अमित कोळी, निखील शिंदे, विनायक भोसले, भरत राजेगावकर, प्रा. शरणप्पा आचलेर, ज्ञानेश्वर भोसले, किरण साठे, असद फुलारी, रमेश हळसंगी, मुन्ना वाकडे, पप्पू कोल्हे, संतोष माने, श्रीशैल कुंभार, मारुतीराव बोरकर, दिलीप कदम, रोहित कदम, समर्थ चव्हाण, सुमित कल्याणी, राहुल इंडे, सागर सुतार, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठलराव रेड्डी उपस्थित होते.



### ज्ञान, संस्कार, मूल्याधिष्ठित जीवनाची प्रेरणा देणारा उत्सव

गुरुपौर्णिमा हा भारतीय संस्कृतीतील गुरु-शिष्य परंपरेचा गौरव करणारी आणि ज्ञान, संस्कार, मूल्याधिष्ठित जीवनाची प्रेरणा देणारा उत्सव आहे. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट यांच्या ३९ व्या वर्धापन दिनानिमित्त तसेच श्री गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त आयोजित धर्मसंकीर्तन व सांस्कृतिक कार्यक्रमास माझ्या अनेक शुभेच्छा. श्री स्वामी समर्थ महाराजांनी दिलेला सेवा, श्रध्दा आणि लोककल्याणाचा संदेश समाजासाठी प्रेरणादायी राहिला आहे, अशा आशयाचे शुभेच्छा संदेश मुंबईच्या महापौर रितू राजेश तावडे यांनी पाठवून दिल

### पारायण, नामस्मरण, गुरुपूजा

बुधवार, दि.२९ जुलै रोजी गुरुपौर्णिमेनिमित्त सकाळी ७ ते ९ पर्यंत महाप्रसादगृह येथे श्री स्वामी समर्थ चरित्र सारामृत ग्रंथाचे पारायण, सकाळी ९ ते १० पर्यंत नामस्मरण, जप व श्री गुरुपूजा, सकाळी १० वाजता महाआरती व महानैवेद्य असे कार्यक्रम होणार आहेत. याप्रसंगी केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहळ, सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री भरतशेठ गोगावले, आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, सी.ए. महेश गावस्कर, अखिल मंडई मंडळ पुणेचे अध्यक्ष व न्यासाचे विश्वस्त जनार्दन थोरात, सचिन सांबरेकर, पालखी परिक्रमा संयोजक बेळगावी, ललितताई वीर आदींची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे, असे सांगण्यात आले.

### या नियोजनकारांचा करण्यात आला गौरव

प्रशांत भगरे, सोमशेखर जमशेट्टी, सृष्टी मसुती, अरविंद शिंदे, आतिश पवार, शुभम सावंत, राजेंद्रकुमार पवार, तानाजी पाटील, रमेश हेगडे, प्रवीण घाटगे, निखील पाटील, विजय माने, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, स्वामीनाथ बाबर, श्वेता हुल्ले, महादेव अनगले, अनिल गवळी, राऊत, गोविंद केकडे, संदीप सरवदे, जोगदंड, ज्ञानेश्वर भोसले, कल्लप्पा छकडे, गणेश देवडिंग.


### नादब्रम्ह ढोलपथक, अमोलराजे लेझिम पथक

महाआरती व महाप्रसाद वाटपानंतर म्हणजे दुपारी ४ वाजता श्री स्वामी समर्थांच्या पादुका पालखी, न्यासाच्या सुशोभित केलेल्या रथाच्या भव्य मिरवणूकीचा दिंड्या व वाद्यांचा गजरात काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत अतुल बेहरे यांच्या 'नादब्रम्ह' ढोलपथक आणि अमोलराजे लेझिम पथक सामील होणार आहे. आमदार शेखर निकम, बाळासाहेब दाभेकर, शहाजीराजे पवार, अमोलबापू शिंदे, दिलीप कोल्हे, अॅड.नितीन हबीब, चेतन नरोटे, संकेत पिसे, विजुभाऊ तांडेल, संतोष नाईक आदींच्या हस्ते मिरवणुकीचा शुभारंभ करण्यात येणार आहे.

# श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक जनमेजयराजे यांच्या कार्याची सुवर्णाक्षरांनी होणार नोंद

**तभा वृत्तसेवा । नंदकुमार जगदाळे**
**अक्कलकोट, दि. २८ जुलै -**

एक आदर्श धर्मादाय संस्था न्यास कसे असावे याचा मापदंड श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे भोसले यांनी घालून दिला आहे . श्री स्वामी समर्थ महाराजांच्या लिला कार्याने पावन झालेली अक्कलकोट तीर्थक्षेत्र भुमी धार्मीक पर्यटनामुळे संपूर्ण जगात नावारूपास आली . तीर्थक्षेत्र अक्कलकोटमध्ये दररोज हजारो भाविकानां व उत्सव काळात लाखो भाविकाना मोफत महाप्रसाद अन्नदान सेवेचा पाया संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे भोसले यांनी रचला . तर गरीब आनाथ व्याधीग्रस्तानं घरपोच जेवण हा उपक्रम श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांनी चालु करून यावर कळस चढविण्याचे कार्य केले आहे .ज्ञानदेव रचिला पाया तुका झालासे कळस ही उक्तीची आठवण यामुळे होते . . संस्थापक अध्यक्ष जनमेयजयराजे भोसले यांच्या कार्याबद्दल स्वर्गीय गान कोकीळा लता मंगेशकर छत्रपती शिवाजी महाराज चरित्राचे ख्यातनाम व्याख्याते प्रा नितीन बानगुडे पाटील राष्ट्रीय प्रबोधनकार किर्तनकार इंदोरीकर म हाराज यांनी गौरवोद्गार काढले आहेत . यामुळे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ धार्मिक सामाजिक वैदयकीय पर्यावरण विषयक शैक्षणिक क्रीडाविषयक राष्ट्र जडणघडणीत जे उपक्रम राबवित आहे याची अक्कलकोटच्या इतिहासातच नव्हे तर










भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी ऐत्यासिक नोंद होईल यात तिळमात्र शंका नाही . श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाची स्थापना करून संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे भोसले यांनी एक इतिहास रचला आहे . ध्येयप्राप्ती होण्यासाठी त्या काम ाप्रती झोकून द्यावे लागते त्या कार्यासाठी वेडे व्हावे लागते आणि ध्येयवेडया माणसा कडूनच इतिहास घडविला जातो . असाच इतिहास रचला संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे भोसले यांनी ... आज अन्नछत्र मंडळाची ख्याती जगात साता समुद्रा पार गेली आहे . अचानकआपल्या घरात दोन माणस पाहुणे जास्त आली तर तारांबळ उडते येथे रोज लाखो भाविक महाप्रसाद घेऊन तृप्त होतात .

**जे का रंजले गांजले । तोसी म्हणे जो आपुले ।**

देव तेथेची जाणावा ! महाराष्ट्र ही संताची भुमी येथे अनेक साधु संत महात्मे होऊनी गेले . आज आपण संताच्या आचार विचार अनुकरणाने त्या मार्गावर जाण्याचा प्रयत्न करत आहोत . असेच संताच्या अनेक विचारान आचारान भारलेले वेळप्रसंगी नाठाळाशी मारू काठी प्रसंगी एखाद्या च्या मदतीसाठी धाऊन जाणारे पाठीशी खंबीरणे उभे राहणारे जनमेजयराजे भोसले १९८८ साली अंत्यत प्रतिकुल परिस्थितीमध्ये आपल्या घरदार कुटुंबाकडे दुर्लक्ष करीत ध्येय वेड्यासारखे झपाटल्यागत कष्ठ सोसले .स्वामी भक्ताना मोफत महाप्रसाद भोजन मिळावे या उद्देशाने अवघ्या तीन किलो तांदळावर अंत्यंत दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर अन्नदान महाप्रसाद सेवा सुरु केली . त्यांचे ध्येय उदात्त अंत्यत कल्याणकारी होते अन. साक्षात श्री स्वामी समर्थच अन्नछत्र मंडळाच्या पाठीशी उभे राहिले ! . स्वामी भक्तानां मोफत महाप्रसाद मिळावा हा उदात्त हेतु सफल झाला . . आज श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात रोज हजारो भक्तानां उत्सव काळात लाखो भक्तानां सळाळी संध्याकाळी दोन्ही वेळेस मोफत महाप्रसाद दिला जातो .मोफत महाप्रसाद देण्याच्या कार्याचा प्रारंभ पाया रचण्याचे काम संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे भोसले यांनी केल . तर यावर कळस चढविला ते श्रीस्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांनी . जे कोणी एखाद्या व्याधीने रंजले आहेत गांजले आहेत अनाथ आहेत . उदरनिर्वाह करू शकत नाहीत अशांना मुख्य कार्यकारी



विश्वस्त अमोलराजे भोसले यांनी आपलेस केल . त्यांना दया दाखविली . स्वामी भक्ताना देण्यात येणारा महाप्रसाद भोजन हेच भोजन रोज डब्यामध्ये अंत्यत गरीब गरजुनां अनाथांना घरपोच दिला जातो तीर्थक्षेत्र अक्कलकोटमध्ये कोणी गरीब अनाथ उपाशी राहु नये याची दक्षता श्री स्वामी समर्थ मंडळाचे मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांनी घेतली आहे . म्हूणून म्हणावेसे वाटते की जे का रंजले गांजले । तोसी म्हणे आपुले देव तेथेची जाणावा ! आपल्या घरी अचानक पाहुणे आले तर त्याची व्यवस्था करताना आपली . फारच तारांबळ होते स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात रोजच स्वामी भक्त येतात . या साऱ्यांची मोफत महाप्रसाद सेवेची सोय करणे म्हणजे हा स्वामी समर्थाचा चमत्कारच आहे . हजारो नव्हे तर उत्सव काळात लाखो स्वामी भक्तांना कुठल्याही प्रकारची कमतरता न भासवता हे अन्नदाना चा मोठा यज्ञ चालु आहे . याकरिता मोठी दानतही लाकते उदारताही लागते स्वामी भक्त उदार हातानी देतात . हे सर्व करून आणण्याची मानसिकता हवी . जगात अब्जोधिश लोक आहेत पण दानत साऱ्याकडेच आहे असे होत नाही . मोठी दानतही असावी लागते ही मोठी दानतही श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे यांच्या जवळ आहे . श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ न्यास राष्ट्र उभारणीत जडण घडणीत मोठे योगदान देत आहे . युवा पिढी बलवान तर राष्ट्र बलवान होईल ही उक्ती प्रमाणे मंडळाने युवकासाठी बंदिस्त जिम उभारले खुले जिमही उभारले आहे एवढेच नव्हे तर सुदृढ राष्ट्र निर्मीतीसाठी युवक सुदृढ बनविण्यासाठी पुढाकार घेतला . तालुक्यतील कुस्तीगिराना खुराक देऊन सुदृढ केले या कुस्तीगिरामध्ये स्पर्धा घेतली. प्राविण्य मिळिवलेल्या कुस्तीगिराना स्पर्धेमध्ये नैपुण्यासाठी प्रोत्साहन दिले. पोशख खुराक मध्ये सातत्य ठेवले . कुस्तीगिरासाठी विशेष लक्ष देऊन युवा पिढी याकडे आकर्षित होण्यासाठी प्रोत्साहन देण्याचे कार्य मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांनी निरंतर कायम ठेवले आहे. या कुस्तीगिरांचे पालकत्वच मंडळाने घेऊन महाराष्ट्रातील लोप पावत असलेला खरा मैदानी खेळ कुस्ती जिंवत ठेवण्याच कार्य अमोलराजे भोसले यांनी केल आहे. कोवीड काळात श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाने केलेल्या कार्याला तोडच नाही . मंडळाने कोवीड काळात सर्व इमारती कोवीड सेंटरला दिल्या . अंत्यत गरजुना मंडळाने शिजवलेले जेवणाचे अन्न व शिधा ही पुरविले. जीवनावश्यक वस्तूचे किट वाटपही केले .

### अमोलराजे भोसले यांचे कार्य प्रेरणादायी :प्रा.नितीन बानगुडे-पाटील

ज्या समाजात पाठीवर कौतुकाची थाप मारणारे असतात तो समाज क्रांती करतो. स्वामी समर्थअन्नछत्र मंडळा कडून येथे जे यशस्वी विद्यार्थी गुणीजनांचा आदर्श व्यक्ती चा गौरव केला जातो कौतुकाची थाप मारली जाते हे फार मोठ प्रेरणादायी कार्य स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्याकडून केल जात आहे. साऱ्याच्या वर कौतुकाची थाप मारणारे अमोलराजे भोसले यांचे कार्य मोठे प्रेरणादायी असल्याचे गौरवोदगार प्रा नितीन बानगुडे पाटील यांनी यावेळी काढले .

### कीर्तनकार इंदोरीकर महाराज यांच्याकडून भोसले कुटुंबाचे कौतुक

स्वामी समर्थाच्या कृपेमुळे हे अन्नदान धर्मसंकीर्तन चालू आहे जगात फक्त अक्कलकोट मध्येच अन्नदान मोठ्या प्रमाणात चालू आहे भोसले परिवार जोपर्यंत स्वामीची सेवा करतील तोपर्यंत अक्कलकोट परिसराला कायच कमतरता भासणार नाही असे गौरवोद्गार राष्ट्रीय कीर्तनकार प्रबोधनकार हभप इंदोरीकर महाराज यांनी कीर्तनसेवा प्रसंगी काढले आहेत .

### बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले

स्वर्गीय गान कोकीळा लता मंगेशकर कुटुंबियांचे जनमेजयराजे भोसले यांचे यांच्याशी अंत्यत स्नेहाचे संबंध स्वर्गीय लता मंगेशकर यांनी जनमेजयराजे भोसले यानां हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे दिव्य स्मारक उभे करावे असे सुचविले. लता दिदीचा हा आदेश मानून जनमेजयराजे भोसले यांनी अन्नछत्र मंडळात छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य गड किल्ले शिवस्मारक उभे केले . छत्रपती शिवाजी महाराजांचे अजरामर धातु शिल्प शिव चरित्र प्रसंगाचे दालन उभे केले आहे. स्व लता दिदीनां जो शब्द दिला होता तो शब्द जनमेजयराजे भोसले यांनी पाळला. म्हणून जनमेजयराजे भोसले यांच्या बाबत ठामपणे म्हणावेसे वाटते की बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले.

**श्री स्वामी समर्थ! जय जय स्वामी समर्थ!!**

### ठळक मुद्दे

✻ मंडळाच्या उभारणीत प्रारंभी एसटी महामंडळाचे कर्मचारी प्रत्येक महिन्याला स्वामीसेवा म्हणून मोठे योगदान दिले हे योगदान फार मोलाचे आहे . या योगदानाची कायम आठवण रहावी व यातुन उतराई होण्यासाठी मंडळाने एसटी साठी वाहन तळ कर्मचाऱ्यांना विश्राम कक्ष स्थापन केले. ✻ लातुर किल्लारी भुकंपात सर्वप्रथम १ महिना भर टुकभर शिजवलेले अन्न भोजन पुरवठा केला ✻ अक्कलकोट शहराच्या सोंदर्यात भर घालण्या साठी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा सिंहाचा वाटा आहे. अनेक चौक व रस्त्यानां नामफलक सुशोभीरण केले आहे. ✻ राजे फत्तेसिंह चौक येथे भाविकांच्या स्वागतासाठी भव्य स्वागत कमान उभारली आहे यामुळे शहराच्या सौंदर्यात मोठी भर पडली आहे. ✻ राजे फत्तेसिंह क्रिंडागणावर वृक्षलागवड संरक्षक भिंतीवर पर्यावरण संरक्षणाचे संदेश व बसण्यासाठी आसन व्यवस्था केली. ✻ अक्कलकोटवासीय व भाविकासाठी रुग्णवाहिकेची सोय केली आहे. ✻ श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या वतीने शहरात तालुक्यात आग लागल्यास अग्निशमन वाहन तात्काळ तेथे सेवे देते. ✻ स्वामीभक्ताना दर्शनासाठी तुळजापुरला जाता नाही आले तर अन्नछत्र मंडळात अंत्यत देखणे आई तुळजा भवानी मातेचे मंदिर उभे करून भाविकांची आई जगदंबेच्या दर्शनाची आस पुर्ण व्हावी या हेतुने मंदिर उभे केले आहे. ✻ छत्रपती शिवरायांचे गडकिल्ले शिव स्मारक अजरामर धातुशिल्प शिवचरित्र दालन ' वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरी ची साक्ष देणारे बालोद्यान रोपवाटिका ' भव्य स्वागत कमान जगदंबेचे मंदिर आदिची निर्मीती करून इतिहास घडविला .




हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



## महत्वाचे...

### कैकाडी गल्लीत महिलेची आत्महत्या

**सोलापूर, दि.२८ जुलै-**

उत्तर कसबा परिसरातील कैकाडी गल्ली येथील एका ४४ वर्षीय महिलेने घरातील जिन्याच्या लोखंडी अँगलला साडीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. राजश्री बापू कांबळे असे आत्महत्या केलेल्या महिलेचे नाव आहे. राजश्री कांबळे यांनी घरामध्ये गळफास घेतल्याचे घरच्यांना मंगळवारी पहाटे २.४५ वाजण्याच्या सुमारास आढळून आले. फौजदार चावडी पोलिसांना याची माहिती मिळताच पोलिस हवालदार एन.सी.कामुर्ती यांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह खाली उतरवून शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.

### बसच्या चाकाखाली आलेल्या वृध्दाचा मृत्यू

**सोलापूर, दि.२८ जुलै-**

एसटी बसच्या चाकाखाली आल्याने गंभीर जखमी झालेल्या एका वृध्द प्रवाशाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात मंगळवारी पहाटे ५.१५ वाजता मृत्यू झाला. संतराम पंढरीनाथ झाल्टे (वय-७८, रा.आलापुर, ता. कन्नड, जि.संभाजीनगर) असे मृत वृध्दाचे नाव आहे. दि.२६ जुलै रोजी सायंकाळी ५.३० वाजता ते सोलापूर एसटी स्टँड येथील प्लॅटफफॉर्म नंबर पाच ओलांडून जात असताना एका एसटी बसच्या चाकाखाली आले. बस ड्रायव्हर युवराज महींगडे यांनी उपचारार्थ शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

# चंद्रभागा वाहतेये दुथडी भरुन...



पंढरपूर : उजनी आणि वीर धरणातून सोडण्यात येत असलेल्या पाण्याच्या विसर्गामुळे चंद्रभागा नदी दुथडी भरुन वाहू लागली आहे. नदी पात्रातील पुंडलिक मंदिराला पाण्याचा वेढा पडलेला आहे. नदीपात्रातील इतर लहान मंदिरेही पाण्याखाली गेलेली दिसत आहेत. (छायाचित्र : सतीश चव्हाण, पंढरपूर)

## दुचाकी गतिरोधकावर आदळली; तीन वर्षाच्या बालकाचा मृत्यू

**सोलापूर, दि.२८ जुलै-**

आईसोबत दुचाकीवरून निघालेल्या एका तीन वर्षाच्या बालकाचा गतिरोधकावर पडून मृत्यू झाल्याची घटना बार्शी तालुक्यातील जामगाव येथे घडली. विनायक विठ्ठल चौगुले (वय ३ वर्ष, रा. पाथरी, ता बार्शी) असे त्या मयत बालकाचे नाव आहे. तो सोमवारी २७ जुलै रोजी दुपारी आईबरोबर दुचाकीवरून पाठीमागे बसून बार्शी कडून पाथरी गावा कडे निघाला असताना वाटेत जामगाव येथे चौकात दुचाकी गतिरोधकावर आदळली गेली. त्यामुळे विनायक हा खाली पडून डोक्यास मार लागून गंभीर जखमी झाला. त्याला बेशुद्ध अवस्थेत एका खाजगी दवाखान्यात प्रथम उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात आज मंगळवारी पहाटे दीड वाजता आजी अंजना जाधव यांनी दाखल केले असता तिचा उपचारादरम्यान सकाळी सात वाजता मृत्यू झाला.

## १२ हजार १३ विद्यार्थ्यांना उद्या पदवीदान; ५७ विद्यार्थ्यांना सुवर्णपदक

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा २२ वा दीक्षांत समारंभ

### पद्मभूषण प्रा.ज्येष्ठराज जोशी यांना डी.एस्सी, पद्मश्री गिरीश प्रभुणे यांना डी.लिट पदवी

### राज्यपाल जिष्णूदेव वर्मा, नामदार चंद्रकांत पाटील, खासदार डॉ. विनय सहस्त्रबुध्दे यांची उपस्थिती





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ जुलै-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या वतीने गुरुवार, दि.३० जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता २२ वा दीक्षांत समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. यादिवशी १६२ पीएचडीधारकसह अन्य ११ हजार ८५१ असे एकूण १२ हजार १३ विद्यार्थ्यांना पदवीदान करण्यात येणार आहे. यातील ५७ विद्यार्थ्यांना सुवर्णपदकाने सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच पद्मभूषण प्रा.ज्येष्ठराज भालचंद्र जोशी यांना डी.एस्सी, पद्मश्री गिरीश यशवंत प्रभुणे यांना डी.लिट पदवीने गौरविण्यात येणार आहे, अशी माहिती कुलगुरु प्रा.डॉ.प्रकाश महानवर यांनी पत्रपरिषदेत दिली.

महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णूदेव वर्मा यांच्या अध्यक्षतेखाली, राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, खासदार डॉ.विनय सहस्त्रबुध्दे यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यार्थ्यांना पदवीदान करण्यात येणार आहे. गुरुवारी सकाळी १०.३० वाजता प्रशासकीय इमारतीपासून ते दीक्षांत मंडपापर्यंत दीक्षांत मिरवणूक निघणार आहे. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.श्रीकांत अंधारे हे ज्ञानदंड हाती घेऊन मिरवणुकीच्या अग्रभागी असणार आहेत. दीक्षांत समारंभाचा कार्यक्रम झाल्यानंतर महाविद्यालयांना पदवी प्रमाणपत्र वाटप केले जाणार आहे. यासाठी विद्यापीठ परीक्षा विभागाने खास सोय केलेली आहे, असेही त्यांनी सांगितले.

#### निकालानंतर केवळ १ महिन्यात पदवीदान

महाराष्ट्रात प्रथमच एप्रिल-मे २०२६ चा निकाल मुदतीत जाहीर करुन त्याचे पदवीदान समारंभ निकालानंतर केवळ १ महिन्यात आयोजित करण्यात आला, असेही त्यांनी सांगितले.

#### सुवर्णपदकांमध्ये मुलीच आघाडीवर

सुवर्णपदके पटकावणाऱ्यांमध्ये मुलींची संख्या अधिक आहे. यात ४४ मुली आणि ते १३ मुले तर पीएचडी मध्ये ५६ मुली व १०६ मुले आहेत.

## अधिकार नसताना व्यवहार; बदलीनंतरही ११ लाखांची बिले मंजूर

### ग्रामसेवक गंगाधर कांबळे यांच्यावर निलंबनाची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ जुलै-**

उत्तर सोलापूर तालुक्यातील बीबीदारफळ ग्रामपंचायतीतील विकासकामांच्या बिलांबाबत गंभीर अनियमितता उघडकीस आली असून, बदली झाल्यानंतरही अधिकार नसताना तब्बल ११ लाख रुपयांची बिले अदा केल्याप्रकरणी ग्रामसेवक गंगाधर कांबळे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्या निर्देशानुसार गटविकास अधिकाऱ्यांनी ही कारवाई केली.

गंगाधर कांबळे हे यापूर्वी बीबीदारफळ ग्राम पंचायतीत कार्यरत होते. फेब्रुवारी २०२६ मध्ये त्यांची तेलगाव ग्रामपंचायतीत बदली झाली होती. मात्र, बदलीनंतरही त्यांनी मार्च २०२६ मध्ये बीबीदारफळ ग्रामपंचायतीच्या विकासकामांची ९ लाख व २ लाख रुपयांची अशी एकूण ११ लाख रुपयांची बिले संबंधित ठेकेदाराला अदा केल्याचा आरोप आहे.

विशेष म्हणजे, त्या काळात बीबीदारफळ ग्राम पंचायतीची मुदत संपल्याने तेथे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली होती. अशा परिस्थितीत कोणताही प्रशासकीय अधिकार नसताना बिलांचा व्यवहार केल्याची बाब प्राथमिक चौकशीत समोर आली.

या प्रकरणाची तक्रार जिल्हा परिषद प्रशासनाकडे दाखल झाल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी चौकशीचे आदेश दिले. संबंधित अधिकाऱ्यांच्या अहवालात नियमबाह्यरीत्या बिलांचे भुगतान झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर कांबळे यांच्याविरुद्ध तत्काळ निलंबनाची कारवाई करण्यात आली.

ग्रामसेवक संघटनेचे तालुकाध्यक्ष असलेल्या अधिकाऱ्यावर झालेल्या या कारवाईमुळे ग्रामपंचायत प्रशासनात खळबळ उडाली. विकासकामांच्या आर्थिक व्यवहारांमध्ये नियमांचे काटेकोर पालन करण्याचा प्रशासनाचा स्पष्ट संदेश या कारवाईतून देण्यात आला आहे.

## घंटागाडी कामगारांचे कामबंद आंदोलन मागे; मक्तेदारांशी चर्चेनंतर कचरा संकलन पूर्ववत



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ जुलै-**

पगारातील कथित कपात, ईएसआय-पीएफ संदर्भातील तक्रारी, नादुरुस्त घंटागाड्या, सुरक्षा साहित्याच्या अभावाविरोधात सोलापूर महानगरपालिकेच्या कंत्राटी घंटागाडी कामगारांनी मंगळवारी सकाळी अचानक कामबंद आंदोलन पुकारले. त्यामुळे झोन क्रमांक १, २ आणि ३ मधील कचरा संकलन काही काळ ठप्प झाले. मात्र सुमारे तासाभरात संबंधित मक्तेदारांनी कामगारांशी चर्चा केल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले असून सर्व कामगार पुन्हा कामावर रुजू झाले.

कोणतेही स्पष्ट कारण न देता दरमहा ५०० ते ५ हजार रुपयांपर्यंत पगार कपात केली जाते. पगारातून पीएफ आणि ईएसआयची रक्कम कपात होत असली तरी अनेकांना ईएसआय कार्ड मिळालेले नाही. दरमहा हजेरीपत्रक जाहीर करून १० तारखेपर्यंत संपूर्ण पगार बँक खात्यात जमा करावा. अनेक घंटागाड्या नादुरुस्त असून फाटलेले टप, झिजलेले टायर, निकामी लाईट व वायपर, खराब डंपिंग यंत्रणेमुळे अपघाताचा धोका वाढल्याचा दावा कामगारांनी केला. महाराष्ट्रातील इतर शहरांच्या तुलनेत सोलापुरातील कंत्राटी घंटागाडी कामगारांना कमी वेतन दिले जाते, असेही यावेळी सांगण्यात आले.

## महाराष्ट्र अँन्ड गोवा नोटरीज् असोसिएशनच्या महाराष्ट्र उपाध्यक्षपदी अ‍ॅड.लक्ष्मण मारडकर

### सोलापूरच्या ज्येष्ठ विधीज्ज्ञांवर राज्याची धुरा

### नोटरी क्षेत्र सशक्त करण्यासाठी अनुभवाचा लाभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ जुलै-**

सोलापूरच्या विधी क्षेत्रासाठी अभिमानाची बाब ठरत, ज्येष्ठ विधीज्ज्ञ अ‍ॅड. लक्ष्मण मारडकर यांची महाराष्ट्र अ‍ॅड गोवा नोटरीज असोसिएशनच्या महाराष्ट्र उपाध्यक्षपदी एकमताने नियुक्ती करण्यात आली आहे. सोलापूर बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष, लॉयर्स चेंबर्सचे विद्यमान अध्यक्ष असलेल्या अ‍ॅड.मारडकर यांच्या नियुक्तीमुळे राज्यातील नोटरी क्षेत्राला अनुभवी व अभ्यासू नेतृत्व लाभल्याची भावना विधी क्षेत्रातून व्यक्त होत आहे. अ‍ॅड.मारडकर यांनी न्यायालयीन कामकाजातील प्रदीर्घ अनुभव, कायद्याचा सखोल अभ्यास, संघटनात्मक नेतृत्व आणि कनिष्ठ वकिलांना सातत्याने केलेले मार्गदर्शन यामुळे विधी क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी अनेक वर्षे प्रभावीपणे कार्य केले आहे.



सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून कार्यरत असताना त्यांनी वकिलांच्या विविध प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा केला. बार आणि न्यायालयीन यंत्रणेमधील समन्वय, व्यावसायिक शिस्त आणि संघटनात्मक एकात्मता वाढविण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. सध्या लॉयर्स चेंबर्सचे अध्यक्ष म्हणूनही ते युवा वकिलांना मार्गदर्शन, व्यावसायिक नैतिकतेचा प्रचार आणि न्यायव्यवस्थेबाबतची बांधिलकी दृढ करण्यासाठी सक्रिय आहेत. महाराष्ट्र उपाध्यक्ष म्हणून राज्यभरातील नोटरी सदस्यांच्या समस्या शासनापर्यंत प्रभावीपणे पोहोचविणे, नोटरी क्षेत्र अधिक सक्षम करणे, संघटना बळकट करणे आणि विधी क्षेत्रात सकारात्मक बदल घडवून आणणे यावर त्यांचा विशेष भर राहणार असल्याचे विधी क्षेत्रातील जाणकारांनी सांगितले. अ‍ॅड.जेवा सय्यद, अ‍ॅड.नवनाथ अवताडे आदींनी त्यांचा सत्कार केला.

## डॉ. शंकर नवले यांना शिक्षकरत्न पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ जुलै-**



सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन.बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगावचे प्राचार्य प्रा.डॉ. शंकर दत्तात्रय नवले यांची प्राचार्य के. पी. मंगळवेढेकर गुणवंत शिक्षकरत्न पुरस्कारासाठी निवड झाली आहे. लायन्स क्लब ऑफ सोलापूर सेंट्रल व हरिभाई देवकरण प्रशाला (१९६१ ची ११ वी बॅच) यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२९ जुलै रोजी हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. शिक्षण, संशोधन, नवोपक्रम व संस्थात्मक विकासातील उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांचा गौरव होणार आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयाने विविध राष्ट्रीय मानांकनात उल्लेखनीय यश मिळवले आहे. संशोधन क्षेत्रातील भरीव कार्यासाठी त्यांना यापूर्वीही अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

## महापालिकेच्या आवारातही भटक्या कुत्र्यांचा वावर

### आ.विजयकुमार देशमुख यांनी वेधले लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ जुलै-**

घोंगडे वस्ती येथील समर्थ स्वामी या ९ वर्षीय मुलाचा संशयित रेबीजमुळे झालेल्या मृत्युच्या पार्श्वभूमीवर आ.विजयकुमार देशमुख यांनी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांची भेट घेत निर्बीजीकरणबाबतची माहिती घेतली. विशेष म्हणजे, महापालिकेच्या आवारातही भटक्या कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणात वावर आहे, याकडेही त्यांनी यावेळी लक्ष वेधले.

आतापर्यंत किती भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण करण्यात आले? त्यासाठी आलेला एकूण खर्च किती? आदींविषयीची माहिती घेतली. तसेच भटके, जखमी, रेबीजग्रस्त श्वानांचे कायमस्वरुपी नियंत्रण करण्यासाठी विशेष कृती आराखडा तयार करण्यात यावी, अशा सूचना त्यांनी दिली. दरम्यान, समर्थ स्वामी याच्या कुटुंबियांना आर्थिक मदत मिळवून देण्याकामी आपण मुख्यमंत्री फडवणीस यांच्याकडे पत्र पाठविले, असेही त्यांनी सांगितले.




यावेळी अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, आरोग्याधिकारी डॉ.राखी माने, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.सतीश चौगुले, उपअभियंता अविनाश वाघमारे, शहर सुधारणा समितीच्या सभापती स्वाती बडगु, नगरसेवकद्वय राजकुमार पाटील, संजय कोळी, विनायक विटकर, प्रवीण दर्गोपाटील, भारतीय जनता पार्टीचे मंडल अध्यक्ष दत्ता बडगु उपस्थित होते.

## प्राथमिक शिक्षण विभागाच्या कार्यपध्दतीवर प्रश्नचिन्ह

### पवित्र पोर्टलवरील शिक्षक भरतीच्या जाहिराती अचानक रद्द

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ जुलै**

पवित्र पोर्टलद्वारे खासगी अनुदानित अल्पसंख्याक व बिगर अल्पसंख्याक शाळांतील शिक्षक भरतीसाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिराती अचानक रद्द करण्यात आल्याने राज्यातील हजारो पात्र आणि बेरोजगार उमेदवारांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. भरती प्रक्रिया सुरू असताना कोणतेही स्पष्ट स्पष्टीकरण किंवा पर्यायी वेळापत्रक न देता जाहिराती मागे घेण्यात आल्यामुळे प्राथमिक शिक्षण विभागाच्या नियोजन आणि कार्यपध्दतीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

राज्य शासनाने शिक्षक भरती प्रक्रिया पारदर्शक, गुणवत्ताधारित आणि वेळेत पूर्ण व्हावी या उद्देशाने पवित्र पोर्टलची अंमलबजावणी केली होती. मात्र, अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाचा मुद्दा पुढे करत भरतीला स्थगिती देण्यात आली आणि त्यानंतर जाहिरातीच रद्द करण्यात आल्याने उमेदवारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.




अनेक संस्थांनी अद्याप अतिरिक्त शिक्षकांना रुजू करून घेतलेले नसतानाही सर्व संस्थांवरील भरती प्रक्रिया एकाच निकषावर थांबविणे अन्यायकारक आहे. यामुळे पात्र उमेदवारांचे रोजगाराचे स्वप्न पुन्हा एकदा लांबणीवर पडले असून अर्ज, कागदपत्रांची पडताळणी आणि इतर प्रक्रियेसाठी केलेला आर्थिक खर्चही वाया गेला आहे.

अनेक शाळांमध्ये शिक्षकांची रिक्त पदे कायम राहिल्यास अध्यापनावर परिणाम होऊन गुणवत्तापूर्ण शिक्षणावर त्याचा विपरित परिणाम होऊ शकतो, असे शिक्षक संघटनांचे म्हणणे आहे.

दरम्यान, शिक्षक सेनेने प्राथमिक शिक्षण विभागाच्या कार्यपध्दतीची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली आहे.

#### शासनाच्या नियमानुसार कार्यवाही

अनेक संस्थांनी अतिरिक्त शिक्षकांना रुजू करुन घेतले नसल्याने संबंधित संस्थांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. ज्या शाळांनी अतिरिक्त शिक्षकांना हजर करुन घेतले नाही, त्यांचे प्रस्ताव मंजूर करु नयेत, असे शासनाचे आदेश आहेत. संबंधित पदे शासनाच्या नियमानुसार कमी करण्याची कार्यवाही सुरु आहे, असे 'प्राथमिक'चे शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी स्पष्ट केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# जिल्ह्यात ३८ लाख मतदारांना 'एसआयआर'चे एपिक फॉर्म वाटप

- आजतागायत ७४ टक्के काम पूर्ण
- ८ ऑगस्टपर्यंत काम पूर्ण होणार
- उपजिल्हाधिकारी कसेकर यांची माहिती




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जुलै-**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे सोलापूर जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनर्रिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. सोलापूर जिल्ह्यातील दि. ३० जून ते ८ ऑगस्ट २०२६ या कालावधीत ३९ लाख ४१ हजार ५५ मतदारांसाठी ३ हजार ७२३ बीएलओ मार्फत हा कार्यक्रम सुरू करण्यात आलेला आहे. यातील ३८ लाख ३७ हजार ४८६ मतदारांना एपिक फॉर्म वाटप केले आहेत. आजतागायत जिल्ह्यात ७४ टक्के काम पूर्ण झाले असून, येत्या ८ ऑगस्टपर्यंत एसआयआरचे संपूर्ण काम पूर्ण होईल, असा आशावाद उपजिल्हाधिकारी (महसूल) लक्ष्मण कसेकर यांनी आज (दि. २८) व्यक्त केला.

सोलापूर जिल्हा हा राज्यात सर्वात जास्त मतदारसंख्या असलेल्या जिल्ह्यात पाचवा जिल्हा आहे. एकूण ११ विधानसभा मतदारसंघांमध्ये ३९ लाख ४१ हजार ०९५ मतदार आहेत. त्यामुळे सर्व संबंधित बी एल ओ यांनी या कार्यक्रमांतर्गत त्यांच्यावर सोपवलेली जबाबदारी एक राष्ट्रीय कर्तव्य समजून पार पाडावी. या कामात कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, अशाही कडक सुचना मध्यंतरी जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी बीएलओंना दिल्या आहेत. शिक्षण विभागानेही बीएलओ म्हणून नियुक्त केलेल्या अडीच हजार पेक्षा अधिक शिक्षकांना विशेष सखोल पुरीक्षण कार्यक्रमातिरिक्त कोणत्याही प्रकारची जबाबदारी देऊ नये. पुढील एक महिना याच कामाला अधिक प्राधान्य दिले गेले पाहिजे. तसेच आरोग्य विभाग, महिला व बालविकास विभागाने त्यांच्या अधिनस्त कर्मचाऱ्यांना (आशा वर्कर, अंगणवाडी सेविका) यांनाही इतर अधिकचे जबाबदारी देऊ नयेत, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी दिले आहेत.

दरम्यान, मध्यंतरी या कामात हलगर्जी केलेल्या २ बीएलओंवर एफआयआरही दाखल केले. यामुळे सध्या या कामात कोणीही हयगय करीत नसून, दिवसातून २ वेळा मी एसआयआरचा आढावा घेत असल्याचे कसेकर यांनी सांगितले. यापूर्वी सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींना पाचारण करून या एसआयआर कामासाठी सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले होते; यामुळे जिल्ह्यातील विविध पक्षीय पदाधिकारीही या कामात जिल्हा प्रशासनाला सहकार्य करीत आहेत. दरम्यान, आता ऑनलाईन पध्दतीने एसआयआरचे कामकाज चालू होणार असल्याने आता पुन्हा ऑफलाईन फॉर्म भरावे लागणार नाहीत. ऑनलाईन प्रक्रियेमुळे मतदारांना आता घरी बसून आपला फॉर्म भरता येणार आहे. यामुळे आता या कामाला वेग येत असल्याचेही शेवटी उपजिल्हाधिकारी कसेकर यांनी सांगितले. आजतागायत एसआयआरचा अहवाल पाहता ३९ लाख ४१ हजार ०९५ मतदारांपैकी ३८ लाख ३७ हजार ४८६ जणांना घरपोच फॉर्म बीएलओंनी दिले आहेत. यापैकी ऑनलाईनद्वारे २७ लाख ४४ हजार ८३८ जणांची पोर्टलवर नोंदणी केली आहे. यामुळे आजतागायत ६९.६५ टक्के मतदारांची ऑनलाईन नोंदणी झाली तर स्थलांतरीत, मयत आणि लग्न वगैरे झाल्यानंतर सासरी गेलेल्या अशा ४.२८ नागरिकांची नोंदणी करता आली नाही. म्हणजेच जवळपास ७४ टक्के नोंदणी पार पडली असून, उर्वरित २६ टक्के नोंदणीही येत्या ८ ऑगस्टपर्यंत पूर्ण होईल, अशी माहिती उपजिल्हाधिकारी कसेकर यांनी दिली.

## ज्ञानामृत आनंदलहरी -१५१६

**तंव कृष्ण म्हणती साचचि । बोलत आहासि तें तैसेंचि ।**
**यया मनाचा कीर चपळिच । स्वभावो गा ।**

भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला आतापर्यन्त योगाभ्यासाचा मार्ग सांगीतला आहे. योगाभ्यासाच्या मार्गावरुन चालण्यासाठी मनोनिग्रह अत्यंत महत्वाचा असल्याचे सांगितले. त्यावर अर्जुन म्हणाला, देवा, आपण अत्यंत सुंदर असा मार्ग सांगत आहात. पण त्या मार्गावरुन चालण्यासाठी मनाला ताब्यात घेणे आवश्यक आहे असे आपले म्हणणे आहे. या मनाच्या लांबी, रुंदी, उंची, खोलीचा अंदाजच येत नाही. तेव्हा या मनावर नियंत्रण आणाचये कसे? हे मन केव्हा कोठे, कसे धावेल, याची अनिश्चिती असते. वादळीवारा थांबवणे सोपे आहे, पण या धावणा-या मनाला थोपवणे अवघड आहे. सारासार विचार शक्तीला भुरळ घालणारे, निश्चयाला ढासळून टाकणारे, सात्विक धैर्याला चकविणारे हे मन नियंत्रित करायचे कसे? याला आवरु म्हटले तर हे जास्त उसळते. संयम करण्याचा प्रत्यन याचा आवेश वाढविण्यास सहाय्यक ठरतो. म्हणून माझे मन नियंत्रीत होईल असे मला वाटत नाही.



असा स्पष्ट खुलासा अर्जुनाने श्रीकृष्णाकडे केला आहे.

अर्जुनाने मनाच्या चंचलतेबद्दल आपला अनुभव कथन केल्यानंतर श्रीकृष्ण म्हणाले, तंव कृष्ण म्हणती साचचि । बोलत आहासि तें तैसेंचि । यया मनाचा कीर चपळची । स्वभावो गा । अर्थात, अर्जुना, तू म्हणत आहेस ते खरे आहे. खरोखर या मनाचा चंचलता हा स्वभाव आहे. परंतु वैराग्याच्या साहाय्याने या मनाला योगाभ्यासाच्या मार्गाकडे वळवले तर कांही काळानंतर ते स्थिर होऊ शकेल. या मनाचा एक गुण असा आहे की, याने जर एखादया विषयाची गोडी चाखली तर ते त्या विषयाच्या ठिकाणी घुटमळते. म्हणुन याला आत्मसुखाची गोडी लावावी. जे वैराग्याची, योगाभ्यासाची भावनाच आपल्या मनात जागविणार नाहीत, त्यांचे मन नियंत्रीत होण्याचा प्रश्नच येत नाही. म्हणून अर्जुना, तू योगाभ्यासाच्या वाटेने जाण्याचा प्रथम निश्चय कर. त्यानंतर वैराग्याची कास धर. मग प्रयत्नाने हळू-हळू मन त्या वाटेवर येऊ लागेल. हे तुझ्या ध्यानात येऊ लागेल. त्या वाटेवर पाऊल टाकण्याच्या आगोदरच जर मन माझे ऐकत नाही म्हणून तु हरुन बसलास तर मनाला तुझी ही हार आवडणारच आहे, यात शंकाच नाही. मनाला पुर्णतः संयमित करणे जर अशक्यच असते तर, आजपर्यन्त अनेक योगी निर्माण झालेच नसते. याचाच अर्थ असा आहे की, जर माणसाने ठरवले तर त्याचे मन तो संयमित करु शकतो. अंगात योगसामर्थ्य आले तर, या मनाचा चंचलपणा टिकण्याचे कारणच नाही. म्हणून अर्जुना तु आपले योगसामर्थ्य, आत्मविश्वास, दृढनिश्चय प्रथम वाढव आणि या मनाचा निग्रह करण्याचा सतत प्रयत्न कर. अभ्यासाने व पुन्हा पुन्हा प्रयत्न केल्याने मन आपोआप स्थिर होऊ लागेल. तुझ्या अशा प्रयत्नाअंती तुला तुझे मन स्थिर होत असल्याची प्रचिती येईल. श्रीकृष्णांच्या कृपेने व मार्गदर्शनाने आणि अर्जुनाच्या प्रयासाने त्याचे मन स्थिर होईल, यात शंका वाटत नाही. कारण तो एवढया भयंकर युध्दप्रसंगी युध्दभूमीवर एकचित्त होऊन श्रीकृष्णांचे मार्गदर्शन ऐकण्यात यशस्वी झाला आहे. म्हणजेच त्याचे मन त्याच्या ताब्यात आहेच. पण आपल्या चंचल मनाचे काय ? आपणाला कुरुक्षेत्रावर जाऊन अर्जुनाप्रमाणे युध्द करायचे नसले तरी या संसारभूमीत आपले आपल्याशी अनेकवेळा युध्द होत असते. या युध्दात चिंता, मोह, दुःख, स्वार्थ या सर्व शत्रूंवर विजय मिळिवण्यासाठी आपणालाही मनावर नियंत्रण करण्याची गरज आहे, हे विसरता कामा नये. आपण मनावर नियंत्रण मिळवले तर आनंदलहरी वेगळयाने शोधाव्या लागणार नाहीत. जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# लायन्स क्लब ऑफ सोलापूरचा पदग्रहण सोहळा उत्साहात




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जुलै-**

लायन्स क्लब ऑफ सोलापूरचा सन २०२६-२७ या वर्षाचा पदग्रहण सोहळा पार पडला. या कार्यक्रमात बंगळूर येथील लायन्सचे माजी प्रांतपाल लायन विजयकुमार शेट्टी यांच्या हस्ते नूतन पदाधिकाऱ्यांना पद व गोपनीयतेची शपथ देण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यमान प्रांतपाल लायन राजेंद्र शहा कांसवा होते. व्यासपीठावर माजी प्रांतपाल लायन प्रबुद्धचंद्र झपके, लायन अशोक मेहता, रिजन चेअरमन लायन महेश नळे, झोन चेअरमन लायन अमिता कारंडे, प्रांतीय मुख्यालय प्रमुख लायन दिनेश बिराजदार, प्रांतीय सचिव लायन रमेश जैन, प्रांतीय कोषाध्यक्ष लायन सुरेश जाजू तसेच लिओचे माजी अध्यक्ष लिओ सौरभ मालू यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मावळत्या अध्यक्षा लायन नंदा लाहोटी यांनी स्वागत केले, तर मावळत्या सचिवा लायन राधिका सोनी यांनी वर्षभरातील सेवाकार्याचा आढावा सादर केला. माजी प्रांतपाल लायन प्रबुद्धचंद्र झपके यांनी नव्या सदस्यांना सदस्यत्वाची शपथ दिली व लायन्स चळवळीच्या जागतिक कार्याचा परिचय करून दिला. यावेळी माजी अध्यक्ष कै. संजय कोरे यांच्या स्मरणार्थ दोन विद्यार्थिनींना उच्च शिक्षणासाठी आर्थिक सहाय्याचा धनादेश सुश्मिता कोरे व धनराज कोरे-पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

तसेच यश खेड यांच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, श्रमजीनगर येथे स्मार्ट टी. व्ही. भेट देण्यात आला. यावेळी लिओ क्लबचे अध्यक्ष लिओ उज्वल सावळगी यांनीही मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन अकबर मुल्ला व संज्योती बिराजदार यांनी केले तर विकास पाटील यांनी आभार मानले.




# एमआयटी विश्वशांती गुरुकुलमध्ये कारगिल वीरांना मानवंदना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जुलै-**

एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलमध्ये कारगिल विजय दिन कृतज्ञता आणि देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. कारगिल युद्धात मातृभूमीच्या रक्षणासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या भारतीय सैन्याच्या शूर जवानांना यावेळी मानवंदना देण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात विश्वशांती प्रार्थनेने झाली. यानंतर विद्यार्थी व शिक्षकांनी मेणबत्त्या प्रज्वलित करून कारगिल युद्धातील हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहिली आणि दोन मिनिटे मौन पाळून त्यांच्या बलिदानाला अभिवादन केले.

कार्यक्रमात कारगिल विजय दिनाचे ऐतिहासिक महत्त्व आणि भारतीय सैन्याच्या अतुलनीय शौर्याची माहिती देणारे सादरीकरण करण्यात आले. कारगिलचे वीर योद्धे कॅप्टन विक्रम बत्रा यांच्या शौर्याची माहिती विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आली. प्राचार्या रुपाली हजारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना 'राष्ट्रीय एकात्मता, भारतीय सशस्त्र दलांविषयी आदर आणि सक्षम, सुरक्षित व विकसित भारत घडविण्यात प्रत्येक नागरिकाची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगितले. देशभक्ती ही केवळ भावना नसून ती प्रत्येकाच्या कृतीतून व्यक्त झाली पाहिजे', असे मत त्यांनी व्यक्त केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## समोरील रिक्षाला धडकून दुचाकी स्वार जखमी

**सोलापूर, दि. २८ जुलै-**

समोरील रिक्षाला धडकल्याने सुभाष तुकाराम जाधव (वय २६ रा.शेळगी) हा दुचाकी स्वार जखमी झाला. हा अपघात दयानंद कॉलेज ते शेळगी या मार्गावरील गुजरवस्ती (मारुती मंदिराजवळ ) येथे रविवारी रात्रीच्या सुमारास घडला. त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# गुरू : ज्ञानाचा अखंड नंदादीप, संस्कारांची परंपरा आणि आधुनिक युगातील दीपस्तंभ

**''गुरू हा केवळ व्यक्ती नसतो; तो विचार असतो. गुरू हा केवळ शिक्षक नसतो; तो जीवनाला दिशा देणारा प्रकाशस्तंभ असतो.'' भारतीय संस्कृतीचे वैभव जर एका शब्दात सांगायचे झाले, तर तो शब्द आहे ''गुरू.'' कारण भारताने जगाला केवळ ज्ञान दिले नाही, तर ज्ञान देणाऱ्याला देवतुल्य स्थान दिले. म्हणूनच भारतीय मन आजही नम्रतेने म्हणते.**

---

**''गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः। गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः।।''**

आषाढ पौर्णिमा म्हणजे गुरुपौर्णिमा. हा दिवस महर्षी वेदव्यास यांच्या जन्मदिनानिमित्त साजरा केला जातो. वेदांचे संकलन, महाभारताची निर्मिती, अठरा पुराणांचे लेखन आणि भारतीय तत्त्वज्ञानाची मांडणी करून त्यांनी ज्ञानाची गंगा प्रत्येकापर्यंत पोहोचविली. म्हणूनच त्यांना ''आदिगुरू'' म्हटले जाते. गुरुपौर्णिमा म्हणजे केवळ गुरूंना पुष्पहार अर्पण करण्याचा दिवस नाही; तर आपल्या जीवनाला दिशा देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे.

**गुरु-शिष्य परंपरा : भारतीय संस्कृतीचा आत्मा**

भारतीय शिक्षणव्यवस्थेचा पाया गुरुकुलात रचला गेला. तेथे शिक्षण म्हणजे केवळ अक्षरज्ञान नव्हते. तेथे विद्यार्थी सत्य, संयम, सेवा, स्वावलंबन, राष्ट्रप्रेम, करुणा आणि कर्तव्यनिष्ठा शिकत असे. रामांना वसिष्ठांचे मार्गदर्शन लाभले, श्रीकृष्णांना सांदीपनी ऋषींचे, अर्जुनाला द्रोणाचार्यांचे, चंद्रगुप्ताला चाणक्यांचे.या परंपरेने भारताला महान नेतृत्व दिले.

संत कबीर म्हणतात ''**गुरु गोविंद दोऊ खडे, काके लागूं पाय? बलिहारी गुरु आपल्या, गोविंद दियो बताय.**'' या दोन ओळी गुरुचे स्थान किती श्रेष्ठ आहे, हे स्पष्ट करतात. संतवाङ्मयातील गुरु संत ज्ञानेश्वरांनी गुरु निवृत्तीनाथांविषयी अपार कृतज्ञता व्यक्त केली. संत तुकाराम महाराज म्हणतात ''सद्गुरुवाचून सापडेना सोय.'' याचा अर्थ स्पष्ट आहे जीवनात योग्य मार्गदर्शनाशिवाय खरी प्रगती शक्य नाही.

**आधुनिक युग आणि बदललेले शिक्षण**

आज आपण कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), रोबोटिक्स, इंटरनेट, डिजिटल वर्ग, ऑनलाइन शिक्षण आणि जागतिक स्पर्धेच्या युगात जगत आहोत. माहिती एका क्षणात उपलब्ध होते. मोबाईल हा विद्यार्थ्यांचा अभ्याससाथी झाला आहे. परंतु प्रश्न असा आहे ज्ञान आणि माहिती यांत फरक कोण समजावून सांगणार? इंटरनेट माहिती देऊ शकते; पण विवेक देऊ शकत नाही. उत्तर देऊ शकते; पण योग्य प्रश्न विचारण्याची प्रेरणा देऊ शकत नाही. मोबाईल पुस्तक दाखवू शकतो; पण पुस्तकावर प्रेम करायला शिकवू शकत नाही. हे कार्य फक्त गुरूच करू शकतो.

**आजच्या गुरूंची भूमिका**

आजचा गुरू हा केवळ शिक्षक राहिलेला नाही. तो संशोधक आहे, मार्गदर्शक आहे, समुपदेशक आहे, प्रेरणादाता आहे आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शिल्पकार आहे. विद्यार्थ्यांच्या मनातील भीती, नैराश्य, तणाव आणि संभ्रम दूर करून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करण्याचे कार्य गुरू करतात. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम म्हणत असत ''महान शिक्षक ज्ञान, आवड आणि करुणा या तिन्ही गोष्टी विद्यार्थ्यांमध्ये जागृत करतात.'' आज या विचाराचे महत्त्व अधिक वाढले आहे. विद्यार्थ्यांनी काय शिकावे? विद्यार्थ्यांनी केवळ परीक्षेसाठी अभ्यास करू नये; तर आयुष्यासाठी शिकावे. गुरूंचा आदर म्हणजे केवळ नमस्कार नव्हे, तर त्यांच्या शिकवणीचा स्वीकार होय. मोबाईलचा वापर ज्ञानासाठी करणे, वाचनाची सवय लावणे, प्रश्न विचारणे, संशोधनाची वृत्ती ठेवणे आणि समाजाबद्दल संवेदनशील राहणे हीच आजच्या विद्यार्थ्यांची खरी गुरुदक्षिणा आहे.

**विज्ञान आणि संस्कार यांचा समतोल**

विज्ञान आपल्याला चंद्रावर नेऊ शकते; पण माणसाच्या मनात माणुसकी रुजविण्याचे कार्य संस्कार करतात.तंत्रज्ञान आपल्याला वेग देते; पण दिशा गुरू देतो. ज्ञान कौशल्य देते; पण संस्कार व्यक्तिमत्त्व घडवतात. म्हणूनच आधुनिक शिक्षणात विज्ञान आणि संस्कार यांचा समतोल आवश्यक आहे.

**गुरु-शिष्य नात्याचे बदलते स्वरूप**

पूर्वी गुरू बोलत आणि विद्यार्थी ऐकत. आज गुरू आणि विद्यार्थी दोघेही शिकतात, चर्चा करतात, संशोधन करतात आणि एकत्र ज्ञाननिर्मिती करतात. हा बदल सकारात्मक आहे; परंतु या नात्यातील आदर, विश्वास आणि कृतज्ञता टिकून राहणे अधिक महत्त्वाचे आहे.

**महर्षी व्यासांचा संदेश**

महर्षी व्यासांनी ज्ञानाला समाजाशी जोडले. आज प्रत्येक शिक्षकाने ज्ञानाला मूल्यांशी जोडले पाहिजे आणि प्रत्येक विद्यार्थ्याने शिक्षणाला समाजसेवेचे साधन बनवले पाहिजे. आज जग बदलत आहे, शिक्षण बदलत आहे, तंत्रज्ञान बदलत आहे; पण गुरूचे महत्त्व बदललेले नाही. गुरू हा ज्ञानाचा झरा आहे.




गुरू हा संस्कारांचा सागर आहे. गुरू हा आत्मविश्वासाचा आधार आहे. गुरू हा राष्ट्रनिर्मितीचा शिल्पकार आहे. स्वामी विवेकानंद म्हणतात ''शिक्षण म्हणजे मनुष्यामध्ये दडलेल्या परिपूर्णतेचे प्रकटीकरण.''ही परिपूर्णता जागविण्याचे कार्य गुरू करतो. महर्षी व्यासांच्या पवित्र स्मृतीला वंदन करताना आपण सर्वांनी एक संकल्प करूया ज्ञान मिळवू, संस्कार जपू, गुरूंचा आदर करू आणि समाजहितासाठी कार्य करू. ''पुस्तके दिशा दाखवतात, तंत्रज्ञान वेग वाढवते, परंतु जीवनाचा अर्थ समजावून सांगणारा एकच गुरू.'' हीच गुरुपौर्णिमेची खरी शिकवण आणि महर्षी व्यासांना खरी आदरांजली.



**- प्रा. अजित देवसाळे**
**मो. ९८५००९२९७५**
**हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ, कॉमर्स, सोलापूर.**

# सद्‌गुरु आई-आण्णा हीच जन्माची शिदोरी



**आज गुरुपोर्णिमा आणि या पुण्यदिवशी सद्‌गुरु आण्णा महाराज आणि सद्‌गुरु सुशीलामाता यांच्या चरणी नतमस्तक होतो. सालाबादप्रमाणे बाळे येथील श्रीकृष्णाश्रमात गुरुपोर्णिमा विविध धार्मिक कार्यक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरी होते. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून शेकडो गुरुबंधू भक्तगण मोठ्या संख्येने सद्‌गुरु चरणी नतमस्तक होण्यासाठी येतात. गुरुपोर्णिमेच्या पुण्यदिनी 'वात्सल्यसिंधू' या गौरवांकाचे प्रकाशन होत आहे. यानिमित्ताने विनम्रपणे सद्‌गुरु आई-आण्णांच्या चरणी शब्दसुमनं वाहतो.**

---

माझी जन्मदात्री आई प.पू. आई सुशीलामाता कृष्णात पवार, यांचा ८० वर्ष पूर्ततेचा सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा शिवतीर्थ सोलापूर येथील श्रीदेव खंडोबाच्या बाळे या दुग्यक्षेत्री श्रीकृष्णाश्रम या भक्तीमंदिरात गुरुवार दि. ९ फेब्रुवारी २०२० रोजी संपन्न झाला. माझ्या आईचा षष्ट्यब्दीपूर्ती सोहळा माझे जन्मदाते वडील व आध्यात्मिक श्रीसद्‌गुरु आण्णामहाराज पवार यांच्या अमृतमहोत्सवाप्रसंगी बाळे येथील श्रीकृष्णाश्रम भक्तिमंदिरात प्राणप्रतिष्ठापना सोहळ्याने दि. ६, ७ आणि ८ मार्च २००३ रोजी संपन्न झाला. याप्रसंगी काशी ज्ञानपिठाधीश प.पू. श्रीजगद्‌गुरू श्रीश्रीश्री डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामी, मा. लोकसभा अध्यक्ष श्री. मनोहर जोशी, माजी मुख्यमंत्री मा.श्री. सुशीलकुमार शिंदे आणि त्यांच्या पत्नी सौ. उज्वलाताई शिंदे, माजी महापौर सौ. नलिनी चदेले व शेकडो भक्त उपस्थित होते. तसेच आईचा ७५ वर्ष पूर्ततेचा दैदिप्यमान 'अमृतमहोत्सव सोहळा' याच श्रीकृष्णाश्रमात श्रीक्षेत्र औसा येथील प.पू. गुरुदेव श्री गहिनीनाथ ज्ञानेश्वर औसेकरमहाराज यांच्या शुभहस्ते त्रिबल या गौरवांकाच्या प्रकाशनाने झाला.

आई सुशीलामातेबद्दल बोलताना व लिहिताना खरेतर शब्द थिटे पडतात, डोळे आनंदाश्रूनी डबडबतात. तीच अवस्था माझी भावंडे दीपक, पुरुषोत्तम, बहिण गंगाबाई अरुण थोरात (पप्पू), सौ. वनमाला दिलीप कळसे (आकु), श्रीमती मंगल पवार व सौ. मंजुश्री अविनाश थोरात व त्यांच्या परिवाराची होय. असा सर्वात्मक पूज्यभाव-मातृत्वभाव सर्व भक्तगणांच्या हृदयात आकंठ भरलेला आहे. म्हणूनच हा तिच्या ओजस तेजस कृपेचा सहस्रचंद्रदर्शन सोहळा मोठ्या थाटात पार पडला तो सद्‌गुरु आण्णा महाराज यांच्या कृपाआशिर्वादानेच होय.

प्रत्येकांचे आपल्या आईशी एक आंतरिक रक्ताचं नातं असते. आपल्या या कौटुंबिक चौकटीत 'आई' हे दैवत काठोकाठ व भरभरून वाहत असते. तो एक मायेचा-प्रेमाचा अथांग महासागर आहे. ती एक घराला बांधून ठेवणारी आधार-प्रेरकजननी व जयमाऊली आहे. आपल्या जन्माची शिदोरी आहे. भारतीय समाज पुरुषप्रधान असला तरी आपल्या जीवनाचा अंकुर जिवंत ठेवणारी ती पाणपोई आहे. तिच्या स्निग्ध प्रेमाचे अभियान अव्याहत तिच्या अंतिम श्वासापर्यंत अखंड वाहत असते. साहित्यक्षेत्रातील विचारवंत, संत-महंतांनी तिला 'आई' हा जीवनातील पहिला गुरू, मगच जीवन सुरू म्हणत 'मातृदेवो भव' ही प्रथमवंदना या मातीत रुजवली. आपणास आई-बाबा देणारा ईश्वर हा थोरच असणार. हा बाळबोध विचार जन्मताच रोमारोमातून रक्तात ठासून भिनलेला असतो.

आईची ही महती श्रीसद्‌गुरू आण्णामहाराज पवार सेवा मंडळ परिवारातील प्रत्येक साधकास प.पू. आई सुशीलामातेच्या सहवासातून, प्रेमातून व मातृवत पुनीतस्पर्शाने उमजली आहे. म्हणूनच तिच्याप्रतीची प्रेमभावना म्हणजेच पार पडलेला सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा होय. या सोहळ्यानिमित्ताने आम्हाला अमुल्य सानिध्य लाभले होते, ते म्हणजे डॉ. स्वर्णलता भिशीकर (विश्वस्त ज्ञानप्रबोधिनी, हराळी, उस्मानाबाद) आणि सोहळ्याच्या अध्यक्ष स्थानी विशेष उपस्थिती होती ती प.पू. श्री गहिनीनाथ ज्ञानेश्वर औसेकर महाराज (औसा) यांची होय. हा क्षण मी दैवी समजतो. त्यासाठी मी व्यक्तीशः व समस्त आई-आण्णा परिवारातील गुरुबंधू-भगिनींच्या वतीने त्यांचा अनंत ऋणी होतो आणि राहिन.

आतापर्यंत आई-आण्णांना संबोधित 'स्मृतीसौरभ', 'भेट महायोग्याची', 'सावल सद्‌गुरु', 'त्रिदल', 'बिल्वपत्र' या साहित्याप्रमाणेच वात्सल्यसिंधू हा गौरवांक अन्नपूर्णा-आई सुशीलामातेस समर्पित आहे. त्यात भक्तांचे स्पंदन आणि प्रांजळभाव शब्दांकित झाला आहे. पावित्र्याचा स्पर्श असलेला तो अनमोल ठेवा आहे. आईचा आशीर्वाद व श्रीसद्‌गुरु आण्णामहाराजांच्या प्रेरणेतून साकारलेला हा ठेवा आहे. यात भक्तांच्या भावभावनेचा प्रवाह एकवटलेला आहे. या गौरवांकाचे सुबक मुद्रण किरात मुद्रणालयाच्या सौ. सीमा शशांक मराठे, तसेच मराठी टंकलेखन-आरेखन तथा आयोजन श्री. प्रथमेश गुरव, गौरवकांचे सुबक मुखपृष्ठ व फोटोंची आखणी श्री. लक्ष्मण कांबळी यांनी पूर्ण केली आहे. याचे संपादकत्व श्री. मोहनभाई आजगावकर यांच्या अथक प्रयत्नातून प्रकट झाले आहे. त्यांचा मी ऋणी आहे. त्रिदल गौरवांकाप्रमाणे त्यांचे हे दुसरे संपादकत्व साधक भक्तांना मातृत्वाची अथांगता उमजावी असेच आहे. हा सर्वव्यापक, सर्वात्मक, मातृत्व वंदना व गौरव आहे. विभागवार व सामुदायीक विविध प्रासंगिक आयोजनाचे अधिपत्य सूत्रबद्ध पद्धतीने ज्यांनी ज्यांनी अमलात आणले व अमूल्य योगदान दिले, त्या सर्वांचा, विशेषतः पत्रकार, फोटोग्राफर, सर्वसमावेशक सूत्रसंचालक त्याचप्रमाणे उपस्थित सर्व भक्तांचे मनोमन आभार मानून हे आंतरीक पूर्ण करतो. सदरील 'वात्सल्यसिंधु' पुस्तकातील लिखाणातील मुद्रणदोष दूर करण्यासाठी श्री. अनिल जाधव यांचेही सहकार्य लाभले. श्रीसद्‌गुरु आण्णामहराज सेवा मंडळ (सोलापूर) सर्वांचे उपकृत आहे. वात्सल्यसिंधू या गौरवांकाचे आज प्रकाशन होत आहे. गुरुपोर्णिमेचे औचित्य साधून सद्‌गुरु आण्णा महाराज आणि सद्‌गुरु सुशिलामाता यांच्या कृपाशिवार्दाने हा प्रकाशनाचा सोहळा बाळे येथील श्रीकृष्णाश्रमात बुधवार, २९ जुलैला गुरुपोर्णिमेच्या शुभदिनी संपन्न होत आहे. गुरुपोर्णिमेनिमित्त सद्‌गुरु आण्णा महाराज आणि सद्‌गुरु सुशिलामातेच्या चरणी विनम्रपणे साष्टांग दंडवंत घालत सर्व गरुबंधूंना गुरुपोर्णिमेच्या शुभेच्छा.



**-नागेश कृष्णात पवार**
**श्रीसद्‌गुरु आण्णामहराज सेवा मंडळ, सोलापूर.**
**मो. ८६०५३११७११**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### गुरुपोर्णिमेनिमित्त श्रीकृष्णाश्रमात आज धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**सोलापूर, दि. २८ जुलै-**

गुरुपोर्णिमेनिमित्त बुधवार, दि. २९ जुलै रोजी बाळे येथील श्रीकृष्णाश्रमात दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी सद्गुरु सुशीलामाता यांच्या जीवनावर मोहन आजगावकर यांनी लिहिलेल्या वात्सल्यसिंधू या पुस्तकाचे प्रकाशन दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने यांच्या हस्ते होणार आहे. गुरुपोर्णिमेचे औचित्यसाधून बुधवारी सकाळी ८ वाजता कृष्णाश्रमातील श्री आण्णामारुती मंदिरातील ध्वजस्तंभाची स्थापना व होम हवन कार्यक्रम होणार आहे. सकाळी ९ वाजता सद्गुरु सुशीलामाता यांच्या समाधीचा प्राणप्रतिष्ठापना सोहळा होणार आहे. सद्गुरु आण्णामाऊली यांच्या समाधीस महाभिषेक, होमहवन, सद्गुरु आण्णामाऊली व सुशीलामाता यांच्या पादुकापूजनाचा कार्यक्रम होणार आहे. गुरुपोर्णिमेनिमित्त पालखी सोहळा संपन्न होणार आहे. कार्यक्रमांची सांगता महाप्रसादाने होणार आहे. भाविकांनी सर्व कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीसद्गुरु आण्णामहराज सेवा मंडळ, सोलापूर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

**सद्गुरु सुशीलामाता यांच्यावरील वात्सल्यसिंधू पुस्तकाचे होणार प्रकाशन**





### पिलीव आरोग्य केंद्रामार्फत ७ हजार वारकऱ्यांना आरोग्य सेवा

**पिलीव, दि. २८ जुलै-**

माळशिरस तालुक्यातील पिलिव येथे आषाढी एकादशीनिमित्त जवळपास २५ पालख्यांचा मुक्काम असतो. यानिमित्त राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची या संकल्पनेतून तब्बल ७ हजार ४९१ वारकरी भाविकांना मोफत आरोग्य सेवा पुरविली. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. भाऊसाहेब जानकर यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय अधिकारी डॉ. विलास जाधव यांनी हा उपक्रम राबविला. यंदाच्या वारीत प्रथमच पिलीव येथे जर्मन हॅंगर मुख्यमंत्री वारकरी निवारा केंद्र उभारण्यात आल्यामुळे सातारा,सांगली जिल्ह्यातील शेकडो दिंड्यांना याचा लाभ झाला. सातारा-पंढरपूर मार्गापासून सुळेवाडी ते तांदुळवाडी पर्यंत २ जर्मन हॅंगर मुख्यमंत्री वारकरी निवारा केंद्र (जलावरोधक) व ५ बूथ मार्फत व्यापक आरोग्य यंत्रणा उभारण्यात आली होती. यासाठी १ रुग्णवाहिका, १ वैद्यकीय अधिकारी, ३३ कर्मचारी आणि २ गट प्रवर्तक,४३ आशा स्वयंसेविका तैनात करण्यात आले होते. प्रभावी आरोग्य व्यवस्थेमुळे लाखो वारकऱ्यांना वेळेत उपचार मिळून वारी अधिक सुरक्षित आणि आरोग्यसंपन्न झाली. अशी माहिती आरोग्य सहायिका एस.पी. शेवाळे यांनी दिली.



### शारदेय गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी घेतला आषाढी वारीचा प्रत्यक्ष अनुभव

**टेंभुर्णी, दि. २८ जुलै-**

आषाढी एकादशीचे औचित्य साधत टेंभुर्णी येथील श्री. शारदेय गुरुकुल पब्लिक स्कूलमध्ये पारंपरिक पालखी सोहळा व रिंगण सोहळा जल्लोषात साजरा करण्यात आला. सोहळ्याचे मार्गदर्शन प्राचार्य डॉ. प्रशांत होमकर व उपप्राचार्य शरद दादर यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात हभप सुदाम लोंढे व स्मिता लोंढे यांच्या हस्ते पालखी पूजनाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी विठ्ठलाच्या नामस्मरणात दंग होत टाळ-मृदंगाच्या साथीने पालखीची मिरवणूक काढली. पालखीची आकर्षक सजावट वैष्णवी मोहोळकर यांनी केली. कार्यक्रमाचे छायाचित्रण सॅम्युअल हरी यांनी केले. याप्रसंगी श्री शारदेय गुरुकुल पब्लिक स्कूलचे चेअरमन बाळासाहेब देशमुख, सचिव हर्षवर्धन देशमुख, संचालक सूरज देशमुख, कार्यकारी संचालिका प्रियंका देशमुख यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले.

# वारकऱ्यांना ११,१११ तुळशी रोपांचे वाटप

## पुढील वर्षी १,११,१११ रोपे वाटपाचा संकल्प

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २८ जुलै-**

अखिल विश्व गायत्री परिवार, महाराष्ट्र यांच्या वतीने हर घर तुलसी - हर हृदय संस्कार या उपक्रमांतर्गत आज आषाढी वारीनिमित्त पंढरपूर येथे वारकऱ्यांना ११,१११ तुळशीच्या रोपांचे मोफत वितरण करण्यात आले. हा कार्यक्रम चंद्रभागा एसटी बस स्थानक परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या कार्यक्रमाला पंढरपूर देवस्थान समितीचे अध्यक्ष हभप गहिनीनाथ औसेकर महाराज, संत तुकाराम महाराजांचे वंशज शिवाजी सदाशिव मोरे महाराज, पंढरपूरचे उपविभागीय अधिकारी (प्रांत) सचिन इथापे, पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संगम व ग्रीन मिशन सोलापूरचे अध्यक्ष डॉ. सूर्यप्रकाश राजेश कोठे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी गायत्री परिवाराच्या श्रीमती प्रतिभा मुळे, उद्योगपती पुरुषोत्तम धुत, आर्किटेक्ट ओम दरक, पद्मशाली ज्ञाती संस्थेचे सचिव संतोष सोमा, पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघाचे मुख्य सचिव वासुदेव इप्पलपल्ली, उपाध्यक्ष यल्लादास गड्डम, माजी नगरसेवक राज महेंद्र कमटम तसेच गायत्री परिवाराचे महाराष्ट्रभरातील सदस्य, पदाधिकारी आणि हजारो वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात प्रत्येक वारकऱ्याला तुळशीचे एक रोप भेट देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी हभप गहिनीनाथ औसेकर महाराज यांनी तुळशीचे धार्मिक, सांस्कृतिक आणि आरोग्यदायी महत्त्व विशद केले. शिवाजी सदाशिव मोरे महाराज यांनी तुळशीमुळे पर्यावरण संवर्धनास चालना मिळते, वातावरण शुद्ध राहण्यास मदत होते, असे सांगत हा उपक्रम काळाची गरज असल्याचे नमूद केले. तसेच पुढील वर्षी १,११,१११ तुळशीच्या रोपांचे वाटप करण्याचे नियोजन करण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी डॉ. सूर्यप्रकाश राजेश कोठे यांनी या संकल्पाला पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन देत पुढील वर्षी एक लाख अकरा हजार तुळशीची रोपे वाटप करण्यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यात येईल, असे जाहीर केले. तसेच त्यांनी तुळशीतील विविध औषधी गुणधर्म, रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यातील तिची भूमिका आणि पर्यावरण संरक्षणातील योगदान याविषयी मार्गदर्शन केले.



# भागवत धर्म प्रसारक पुरस्काराने पत्रकार फुरडे-पाटील सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २८ जुलै-**

लोकमतचे बार्शी तालुका प्रतिनिधी तथा पालखी सोहळा पत्रकार संघाचे सोलापूर जिल्हाध्यक्ष पत्रकार शहाजी फुरडे-पाटील यांना श्री संत मुक्ताबाई संस्थान, मुक्ताईनगर यांच्या वतीने दिला जाणारा २०२६ चा प्रतिष्ठेचा भागवत धर्म प्रसारक पुरस्कार प्रदान करण्यात आला. श्रीक्षेत्र पंढरपूर येथील श्री संत मुक्ताबाई मठात आषाढी एकादशीच्या महापर्वानिमित्त आयोजित सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.

संस्थानचे माजी अध्यक्ष सहकार महर्षी कै. भाऊसाहेब ऊर्फ प्रल्हादराव पाटील यांच्या स्मरणार्थ अध्यात्मिक क्षेत्रात, विशेषतः आषाढी वारीच्या काळात वारीचे सातत्यपूर्ण वार्तांकन करुन भागवत धर्माच्या प्रचार-प्रसारात योगदान देणाऱ्या राज्यातील एका पत्रकाराची दरवर्षी या पुरस्कारासाठी निवड केली जाते. श्री विठ्ठलाची मूर्ती, मानाचा वारकरी फेटा, शाल, श्रीफळ व संत मुक्ताबाई चरित्र ग्रंथ असे पुरस्काराचे स्वरुप आहे. पुरस्कार वितरण सोहळ्यास श्री संत मुक्ताबाई संस्थानचे अध्यक्ष ॲड. रवींद्र पाटील, विश्वस्त सम्राट पाटील, पालखी सोहळा प्रमुख हभप रवींद्र महाराज हरणे, पालखी सोहळा पत्रकार संघाचे शंकर टेमघरे, विलास काटे, राजेंद्रकृष्ण कापसे, औदुंबर भिसे, प्रा. किरण गाढवे, विकास भालके, सुधीर गुळमे उपस्थित होते.



# भाजपा महिला मोर्चा प्रदेश सचिवपदी डॉ. प्राजक्ता बेणारे

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२८ जुलै-**



येथील भाजपा महिला आघाडी जिल्हाध्यक्षा डॉ. प्राजक्ता बेणारे यांची महिला मोर्चा महाराष्ट्र प्रदेश सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष तथा आमदार चित्रा वाघ यांनी नुकतेच डॉ.प्राजक्ता बेणारे यांना नियुक्ती पत्र दिले आहे.

डॉ.प्राजक्ता बेणारे यांनी २०१८ पासून सक्रिय राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. सुरुवातीला तत्कालीन भाजप शहराध्यक्ष (कै.) संजय वाईकर यांनी पंढरपूर शहर उपाध्यक्षा या पदावर त्यांची नियुक्ती करुन त्यांना संधी दिली. या बरोबरच शहरातील अनेक निराधार, परीतक्त्या,एकाकी महिला, वृद्ध स्त्रिया यांच्या न्याय हक्कासाठी संघर्ष केला, गरज असेल तेव्हा पोलिसापर्यन्त जाऊन न्यायाची परखड भूमिका घेऊन गुंडगिरी किंवा राजकीय दबावाला बळी न पडता सत्याची कास धरून वंचीत घटकास न्याय मिळवून दिला.



# भावसार व्हिजन इंडिया सेंट्रलतर्फे शिलाई मशीनचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जुलै-**

भावसार व्हिजन इंडिया सोलापूर सेंट्रलतर्फे गरजूंना शिलाई मशीन वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला.

यामध्ये सुरेश तेलकर हे दिव्यांग असून, त्यांना पिको-फॉल मशीन व तसेच उषा क्षीरसागर आणि अश्विनी माळवतकर या दोन्ही महिला गरजू परिस्थितीत असून शिलाई काम करून आपला उदरनिर्वाह करीत आहेत. या तिन्ही लाभार्थ्यांना भावसार व्हिजन इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष मनीष सूत्रावे यांच्या हस्ते शिलाई मशीन प्रदान करण्यात आली. यावेळी देवी देवाची ट्रस्टचे ट्रस्टी श्रीकांत अंबुरे तसेच गव्हर्नर श्रीराज निकते अध्यक्ष सुशील महिंद्रकर सचिव अभियंता सागर पुकाळे खजिनदार प्रभाकर कुसुमकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्याकरता श्री अश्विन डोईजोडे, राजेश झिंगाडे, सुहास क्षिरसागर, सिद्राम हंचाटे, प्रभाकर जवळकर, लक्ष्मीकांत मुसळे, किरण मुसळे, रविकिरण वायचळ, किरण पुकाळे, पुनम पुकाळे किरण रणसुभे, दीपा उपरे, माधुरी लोकरे यांनी परिश्रम घेतले.



# आरक्षण उपवर्गीकरणाविरोधात जीएम संस्थेच्या वतीने महामोर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जुलै-**

अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणाच्या विरोधात सोलापुरात २७ जुलै रोजी भव्य महामोर्चा काढण्यात आला. सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात जीएम मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्थेचे पदाधिकारी व भीमकन्या रुक्मिणी लोंढे यांच्यासह अजित गायकवाड, पप्पू गायकवाड, शरद पोळ, अभी क्षीरसागर, मुकेश सोनवणे, हर्षवर्धन बाबरे, सोहेल शिरसे, अनिकेत तळभंडारे, सिद्धेश्वर सोनवणे, मिलिंद तळभंडारे, सनी दनाने, सुशांत वाघमारे, महेश गजदाने, आदित्य वाघमारे, गोपाळ शिवशरण, गौरव पात्रे, रघुराज बनसोडे, सुशांत वाघमारे, निशांत वाघमारे उपस्थित होते.

### जनार्दन वाघमारे यांची उदयपूर येथे अभ्यासासाठी निवड

**सोलापूर, दि. २८ जुलै-**



जनार्दन वाघमारे यांची राजस्थानमधील उदयपूर येथे आपलीसांस्कृतिक विविधता या विषयाचा अभ्यास करण्यासाठी निवड करण्यात आली आहे. आदर्श बालक मंदिर शिवाजीनगर मोदी सोलापूर या शाळेतील सहशिक्षक श्री जनार्दन प्रभाकर वाघमारे यांची सांस्कृतिक स्तोत्र एवं प्रशिक्षण केंद्र नवी दिल्ली अंतर्गत ही निवड करण्यात आली. यात महाराष्ट्र राज्यातील १० शिक्षकांची निवड करण्यात आली. श्री वाघमारे यांनी शिक्षण क्षेत्रात विविध सृजनशील संकल्पना विकसित केले आहे.

# सरकारने बळीराजाची तहान भागवावी

## दीपक साळुंखे-पाटील यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २८ जुलै-**

कृष्णा, कोयना, पंचगंगा, भीमा आणि नीरा नदीतील पुराचे अतिरिक्त वाहून जाणारे पाणी त्वरित टेंभू उपसा सिंचन योजना तसेच म्हैसाळ योजना व निरा उजवा कालव्यातून सांगोला तालुक्यातील माणगंगा व कोरडा या प्रमुख नद्यांसह स्थानिक ओढे, नाले आणि तलावात सोडून सरकारने बळीराजाची तहान आणि जनावरांची भूक भागवावी अशी मागणी माजी आ.दिपक साळुंखे पाटील यांनी केली.

सांगोला तहसीलदार बाळूताई भागवत यांना लेखी निवेदन देते वेळी ते बोलत होते. सांगोला तालुक्यासाठी वरदान असणाऱ्या टेंभू, म्हैसाळ व निरा उजवा कालवा या सिंचन योजनामधून तालुक्यातील माणगंगा, कोरडा, बेलवन, आफ्रुका या नद्यांसह स्थानिक ओढे, नाले त्याचबरोबर सांगोला शाखा कालवा फाटा ४ आणि ५ तसेच पारे, हंगीरगे, घेरडी, जवळा, चिंचोली, बुद्धेहाळ, तिसंगी आणि राजेवाडी यांसह छोटे-मोठे तलाव भरून दिल्यास सांगोला तालुक्यातील भीषण पाणीटंचाई दूर होणार असल्याचे साळुंखे पाटील यांनी यावेळी स्पष्ट केले.



**जनावरे भुकेली, बळीराजाही तहानलेला**

शेती आणि पशुपालन हे सांगोला तालुक्यातील दोन प्रमुख व्यवसाय आहेत. पावसाने पाठ फिरवल्याने आधीच खरीप हंगाम वाया गेला आहे. परिणामी शेतकरी प्रचंड मेटाकुटीला आला आहे. त्याचबरोबर तालुक्यात प्रचंड चारा आणि पाणीटंचाई निर्माण झाल्याने पशुपालन हा व्यवसायही प्रचंड संकटात सापडला आहे. जनावरांची भूक आणि बळीराजाची तहान भागवण्यासाठी सांगोला तालुक्याला तत्काळ पाणी सोडावे.

**- माजी आ.दिपक साळुंखे-पाटील**

# आशिष निकम यांची भारतीय पुरातत्त्व विभागात निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २८ जुलै-**



सांगोल्यातील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजच्या सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातील माजी विद्यार्थी आशिष बाबूराव निकम यांनी केंद्रीय कर्मचारी निवड आयोगाच्या स्पर्धा परीक्षेत यश मिळवत भारतीय पुरातत्त्व विभाग येथे कार्यकारी अभियंता पदावर निवड मिळवली आहे.

या परीक्षेत त्यांनी देशात १९ वा तर महाराष्ट्रातून प्रथम क्रमांक प्राप्त केला असून त्यांची वडोदरा (गुजरात) येथे नियुक्ती करण्यात आली आहे. आशिष निकम यांचे प्राथमिक शिक्षण जि.प.प्रा.शाळा, संगेवाडी, माध्यमिक शिक्षण मांजरी हायस्कूल तसेच शिवाजी पॉलिटेक्निक येथून सिव्हिल इंजिनिअरिंगचा डिप्लोमा पूर्ण करून जेएसपीएम कॉलेज, पुणे येथून पदवी संपादन केली. त्यांना आजी रंभाबाई खंडागळे, आई सरोजिनी आणि वडील बाबूराव निकम यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थाध्यक्ष बाबुराव गायकवाड, उपाध्यक्ष इंजि.महादेव गायकवाड, सचिव अंकुशराव गायकवाड, प्राचार्य डॉ.रणजीत देशमुख यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# 'शहीदांच्या बलिदानाचे ऋण जबाबदार नागरिकत्वाने फेडावे'

## डॉ. शिंदे; यशकल्याणी सेवाभवनात कारगिल विजय दिवस साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि. २८ जुलै-**

कारगिलच्या रणभूमीवर भारतीय जवानांनी केवळ शत्रूच्या चौक्या जिंकल्या नाहीत, तर त्यांनी भारताच्या स्वाभिमानाची उंची जगाला दाखवून दिली. शहीदांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करणे ही श्रद्धा आहे; मात्र बलिदानाचे ऋण फुलांनी नव्हे, तर जबाबदार नागरिकत्वाने फेडले पाहिजे, असे भावपूर्ण प्रतिपादन जीवनगौरव पुरस्कार विजेते, कविवर्य डॉ. सुरेश शिंदे यांनी केले.

आजी-माजी सैनिक कल्याणकारी मंडळ, करमाळा आणि यशकल्याणी ग्रामीण सेवाभावी संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने यशकल्याणी सेवाभवन, करमाळा येथे २७ वा कारगिल विजय दिवस साजरा करण्यात आला. यावेळी ते बेलत होते. सोहळ्यात शहीद जवानांना अभिवादन करण्यात आला.

स्वागत करताना प्रा.करे-पाटील यांनी केले. यावेळी प्राचार्य डॉ. सुरेश शिंदे यांना प्रदीर्घ साहित्यिक, शैक्षणिक आणि सामाजिक योगदानाबद्दल कारगिल योद्धा जीवनगौरव पुरस्कार२०२६ प्रदान करून मानपत्र स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. अक्रूर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. भारत शिंदे, ॲड. बाबुराव हिरडे, विवेक येवले, रेवणनाथ भिसले, बाळकृष्ण लावंड यांची मनोगते झाली. यावेळेस व्यासपीठावर शहीद मेजर अमोल निलंगे यांचे वीर पिता अरविंद निलंगे, शहीद जवान नवनाथ गात यांच्या वीर माता गुंफाबाई गात, वारे, शहीद मेजर आप्पासाहेब काटे यांच्या मातोश्री काटे, यशकल्याणी नेचर कॉन्झर्वेशनचे प्रा. कल्याण साळुंके, युवा निर्माण अकॅडमीचे गणेश लोकरे, ॲड. दत्तात्रय सोनावणे, प्रा. जयेश पवार, अभियंते अतुल दाभाडे व्यासपीठावर उपस्थित होते. सोहळ्यात विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववानांचा विशेष सन्मान करण्यात आला. करमाळा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सचिन तपसे आणि पत्रकार शितल मोटे, गायक प्रवीण अवचर, पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालय, रावगाव येथील प्रताप बरडे यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले. कारगिल युद्धात प्रत्यक्ष सहभाग नोंदविणारे माजी सैनिक पांडुरंग साळवे आणि बाळासाहेब काकडे यांचा 'कारगिल योद्धा' म्हणून सन्मान करण्यात आला. अमेरिकेत अभियंता म्हणून कार्यरत हर्षद शिंदे तसेच एमईएसबीचे अभियंता अमृत महामुनी यांना विशेष युवा पुरस्कार प्रदान केला. युवा पिढीचे प्रतिनिधी म्हणून गौरव पवार, शुभम वळेकर, संकेत गरड, अभिषेक करकुटे यांना 'बेस्ट एनसीसी कॅडेट' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी कंदर येथील युवा निर्माण अकॅडमीला यशकल्याणी संस्थेकडून एक स्मार्ट टीव्ही प्रदान करण्यात आला. सूत्रसंचालन प्रा.विष्णु शिंदे, सचिन नवले आणि किरण ढेरे यांनी केले. आभार सुभेदार मेजर विलासराव नाईकनवरे यांनी मानले.




# भीमा नदीकाठच्या शेतीपंपांना ८ तास वीज द्या; आ. आवताडे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २८ जुलै-**

पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील भीमा नदीकाठच्या शेतकऱ्यांना शेतीपंपासाठी सलग ८ तास वीजपुरवठा उपलब्ध करून देण्याची मागणी आमदार समाधान आवताडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

पाऊस कमी झाल्याने पिकांना पाण्याची तीव्र गरज निर्माण झाली आहे. भीमा नदीतून मोठ्या प्रमाणात पाणी वाहून जात असतानाही अपुऱ्या वीजपुरवठ्यामुळे शेतकऱ्यांना त्याचा लाभ घेता येत नसल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. सोलापूर जिल्ह्याची जीवनदायिनी असलेले उजनी धरण पूर्ण क्षमतेने भरत असून वीर धरणातूनही भीमा नदीत मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात येत आहे. हे पाणी पुढे कर्नाटक राज्यात वाहून जात असताना भीमा नदीकाठच्या शेतकऱ्यांना सिंचनासाठी आवश्यक वीज मिळत नसल्याने ते या पाण्याचा उपयोग करू शकत नाहीत.

सध्या भीमा नदीकाठच्या अनेक भागात शेतीपंपांना केवळ दोन ते पाच तासच वीजपुरवठा होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे. अपुऱ्या वीजपुरवठ्यामुळे पिकांना वेळेवर पाणी देता येत नसून पावसाअभावी पिके करपण्याच्या स्थितीत आहेत. नदीतून वाहून जाणारे पाणी शेतकऱ्यांच्या पिकांसाठी उपयोगात आणण्यासाठी शेतीपंपांना किमान आठ तास नियमित व अखंडित वीजपुरवठा करणे अत्यावश्यक असल्याचे आमदार समाधान आवताडे यांनी म्हटले आहे.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## श्री भगवंत सहकारी पुरवठा मंडळीकडून आमदार राऊत यांचा सत्कार

**बार्शी, दि. २८ जुलै-**
सोलापूर जिल्हा विधानपरिषद आमदार निवडणुकीत विजय मिळविल्याबद्दल आमदार राजेंद्र राऊत यांचा श्री भगवंत सहकारी पुरवठा मंडळी लि. बार्शी यांच्यावतीने जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना मान्यवरांनी आमदार राजेंद्र राऊत यांच्या सामाजिक व राजकीय कार्याचा गौरव केला आणि सोलापूर जिल्ह्याच्या विकासासाठी त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सत्कार सोहळ्यास डॉ.बी.वाय.यादव, सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, संस्थेचे चेअरमन आनंद कुलकर्णी, माजी नगराध्यक्ष आसिफभाई तांबोळी, प्रशांत कथले, संस्थेचे उपाध्यक्ष उमेश ठोंबरे तसेच श्री भगवंत सहकारी पुरवठा मंडळीचे पदाधिकारी, व्यवस्थापक रवींद्र माचवे उपस्थित होते.





# सोलापूर विद्यापीठाचा जीवनगौरव पुरस्कार पंढरपूरचे गोपाळ देशमुख यांना जाहीर

## विद्यापीठ वर्धापन दिनी १ ऑगस्टला वितरण : वालचंद महाविद्यालयास उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२८ जुलै -**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा यंदाचा प्रतिष्ठेचा व मानाचा जीवनगौरव पुरस्कार पंढरपूर येथील इतिहास तज्ज्ञ गोपाळ देशमुख यांना जाहीर झाल्याची घोषणा कुलगुरु प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी पत्रकार परिषदेत केली.

विद्यापीठाच्या वर्धापनदिनी दरवर्षी विविध पुरस्कार दिले जातात. यात सोलापूर ही जन्मभूमी, कर्मभूमी व ऋणानुबंध असणाऱ्या महनीय व्यक्तीस जीवनगौरव हा प्रतिष्ठेचा पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला जातो. यंदाच्या या जीवनगौरव पुरस्काराचे मानकरी पंढरपूर येथील श्री. देशमुख हे ठरले आहेत. त्यांच्या ऐतिहासिक संशोधनात्मक व साहित्यीक लेखनातील योगदानाबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात येत आहे. रोख रक्कम ५१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह, गौरवपत्र, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

शनिवार, १ ऑगस्ट रोजी विद्यापीठाचा २२ वा वर्धापन दिन समारंभ साजरा होणार आहे. सकाळी आठ वाजता ध्वजारोहणाचा कार्यक्रम त्यानंतर सकाळी दहा वाजता विद्यापीठाच्या मुख्य सभागृहात पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार आहे. या समारंभास मुख्य अतिथी म्हणून रासायनिक तंत्रज्ञान संस्था मुंबईचे पद्मश्री. प्रा.डॉ. गणपती दादासाहेब यादव दुरस्थ प्रणालीद्वारे आणि पुणे येथील आयकर आयुक्त डॉ.नितीन रघुनाथ वाघमोडे हे उपस्थित राहणार आहेत. तसेच यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु प्रा. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. याचबरोबर विद्यापीठाच्या विविध पुरस्कारांसाठी प्रस्ताव मागविण्यात आले होते, त्यानुसार तज्ञ समितीने विविध पुरस्कारांची देखील निवड केली आहे. याही पुरस्कारांचे वितरण शनिवारी होणार आहे. विद्यापीठाच्या वर्धापन दिनाच्या या सोहळ्याला विद्यार्थी, शिक्षक, प्राचार्य, विविध अधिकार मंडळाचे सदस्य, शिक्षणप्रेमी नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

या पत्रकार परिषदेस प्र. कुलगुरु लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा प्रभारी अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार, मानवविज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महेश खरात, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा प्रभारी अधिष्ठाता, डॉ. शिवाजी शिंदे आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा प्रभारी अधिष्ठाता डॉ. राजशेखर हिरेमठ, प्रसिध्दी प्रमुख डॉ. मलिक रोकडे यांच्यासह विद्यापीठातील उपकुलसचिव, सहायक कुलसचिव आणि इतर अधिकारी उपस्थित होते.


प्राचार्य शहा


प्रा. कोळेकर


प्रा. राऊत


श्री. देशमुख


श्री. निंबाळकर


श्री. मिटकरी


श्री. कोरे


श्री. वाघमारे

### विद्यापीठाचे इतर जाहीर ९ पुरस्कार असे

- उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार: वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स सोलापूर.
- उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार: प्राचार्य डॉ. सत्यजीत कांतीलाल शहा, हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स सोलापूर.
- उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार (विद्यापीठ): डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर, सामाजिकशास्त्रे संकुल, सोलापूर विद्यापीठ.
- उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार (महाविद्यालय): प्रा.डॉ. बापू भिमा राऊत, वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर.
- उत्कृष्ट शिक्षकेत्तर अधिकारी पुरस्कार (वर्ग एक व दोन- विद्यापीठ): नशीर बशीरमियाँ देशमुख, कक्षअधिकारी सोलापूर विद्यापीठ.
- उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार (वर्ग तीन- विद्यापीठ): ज्ञानेश्वर अर्जुन निंबाळकर, सहायक कक्षअधिकारी सोलापूर विद्यापीठ.
- उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार (वर्ग चार- विद्यापीठ): शिवराज माणिकराव मिटकरी, शिपाई, सोलापूर विद्यापीठ.
- उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार (लिपिक संवर्ग- महाविद्यालय): अशोक लक्ष्मण कोरे, ग्रंथालय लिपिक, सी.बी.खेडगीज् सायन्स, राजा विजयसिंह कॉमर्स ॲण्ड राजा जयसिंह आर्टस् कॉलेज, अक्कलकोट.
- उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार (चतुर्थश्रेणी कर्मचारी- महाविद्यालय): विष्णु जयवंत वाघमारे, सेवक, वसुंधरा कला महाविद्यालय सोलापूर.

### जीवनगौरव पुरस्कारप्राप्त गोपाळ देशमुख यांच्याविषयी


प्रा. गोपाळ देशमुख

गोपाळ मारुती देशमुख हे राजपत्रित अधिकारी पदावरुन सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांनी गहिवर (ग्रामीण कथासंग्रह), सोलापूर जिल्ह्याची बखर (ऐतिहासिक संदर्भ ग्रंथ), असे झुंजले वीर मराठे (मराठा कालिन लढाया), मराठी दौलतीचे नारीशिल्प (मराठी दौलतीतील मातोश्री जिजाबाईंपासून पंधरा कर्तृत्ववान स्त्रियांचे ऐतिहासिक कार्य सांगणारा ऐतिहासिक ग्रंथ), सोलापूर जिल्ह्याचा इतिहास (सोलापूर जिल्ह्यातील ऐतिहासिक घराणी, त्यांनी इतिहासातील केलेले पराक्रम व स्वराज्यासाठीचे योगदान, गावागांवाचा इतिहास, असा बृहद ऐतिहासिक संदर्भासह ७०० पृष्ठांचा सोलापूर जिल्ह्यातील एकमेव संदर्भग्रंथ), दोन राजधान्या मंगळवेढा ब्रम्हपुरीचा इतिहास (मंगळवेढा येथील प्राचीन राजवटीचा शिवकालापर्यंतचा इतिहास, औरंगजेब बादशहाच्या चार वर्षे मुक्कामातील ब्रम्हपुरीचा इतिहास), सुमेदार मल्हारराव होळकर, एक राष्ट्रपुरुष (गेली शंभर वर्षांनंतर मल्हारराव होळकर यांचे ऐतिहासिक कार्य विशद करणारा ग्रंथ), राजे माधवराव तथा महादजी शिंदे (अलिजाबहादूर) (शिंदे घराण्याचा इतिहास उलगडणारा संदर्भग्रंथ),यासह विविध नियतकालिके, वृत्तपत्रे, दीपावली अंक तसेच वेगवेगळ्या मासिकांतून ऐतिहासिक विषयांवर सातत्याने लिखाण केले आहेत.

## महत्त्वाचे...



### दत्त प्राथमिकची आरोही गायकवाड सातवी स्कॉलरशिपमध्ये पात्र

**बार्शी दि. २८ जुलै-**
सन २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता ७ वी शिष्यवृत्ती परीक्षेत दत्त प्राथमिक विद्यामंदिर बार्शीची आरोही गायकवाड ही विद्यार्थिनी पात्र झाली. तिला वर्गशिक्षिका ललिता चव्हाण तसेच गणित विषयासाठी युवराज जगताप सर व इंग्रजी विषयासाठी मंगेश मोरे यांचे मार्गदर्शन लाभले. तिचे संस्थेचे अध्यक्ष मोहन ठोंगे, खजिनदार मृणय ठोंगे यांनी अभिनंदन केले. संस्थेच्या व शाळेच्यावतीने आरोहीला मुख्याध्यापक श्रीकांत कुंभारे, दिलीपराव सोपल प्रशालेच्या मुख्याध्यापक सचिन काळे यांच्या हस्ते बुके देऊन सन्मानित करण्यात आले. मार्गदर्शक वर्गशिक्षिका चव्हाण यांचाही प्रशालेतील ज्येष्ठ शिक्षिकाअरुणा मठपती यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.




### सुवर्णपदक विजेत्या अस्मिता वायदंडे हिचा सन्मान

**माळशिरस, दि. २८ जुलै-**
श्री हनुमान शिक्षण प्रसारक संस्था संचलित, विष्णुपंत कुलकर्णी विज्ञान, वाणिज्य व समीर गांधी कला महाविद्यालय, माळशिरस येथील अस्मिता महादेव वायदंडे हिने बी.ए. भाग १ ते ३ (स्पेशल हिंदी) या विषयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठस्तरावर ८०० पैकी ७०० गुण (८७.५० टक्के) मिळवत प्रथम क्रमांक पटकावला या यशाबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष ॲड. मिलिंद कुलकर्णी यांच्या हस्ते अस्मिता हिचा गौरव करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य डॉ. देविदास गेजगे तसेच इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या अपर्णा इनामदार यांनी अस्मिताच्या उत्कृष्ट कामगिरीचे कौतुक करत तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. तिला हिंदी विभाग प्रमुख डॉ. किसन वाघमोडे यांचे मार्गदर्शन लाभले.

### यशवंत कुलकर्णी यांची शासनाच्या समितीवर तज्ज्ञ सदस्य म्हणून निवड

**श्रीपूर, दि.२९ जुलै-**



कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांची राज्य शासनाच्या स्टॅटिस्टिकल डेटाबेस (सांख्यिकीय) समितीवर तज्ज्ञ सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. राज्याचे साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत असलेली ही समिती साखर उद्योगाशी संबंधित विविध विभागांचा अभ्यास करून भविष्यातील धोरणे, नियोजन आणि समस्यांवरील उपाययोजना सुचविणार आहे. बंद व कार्यरत साखर कारखाने, गाळप, साखर उत्पादन, ऊस उपलब्धता, लेखापरीक्षण, आर्थिक स्थिती, कर, संशोधन व कामगारांसह विविध बाबींचा समिती अभ्यास करणार आहे.

## सोलापूर-मुंबई विमानसेवा २ ऑगस्टपासून पुन्हा सुरू

### उड्डाणपूल व आयटी पार्क प्रकल्पालाही गती : पालकमंत्री जयकुमार गोरे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जुलै-**
सोलापूर-मुंबई विमानसेवा २ ऑगस्टपासून पुन्हा सुरू होणार आहे. ही सेवा सोमवार, बुधवार, शुक्रवार आणि रविवार या चार दिवशी उपलब्ध राहणार असून, त्यामुळे उद्योग, व्यापार, शिक्षण आणि वैद्यकीय कारणांसाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठी सुविधा मिळणार असल्याची घोषणा पालकमंत्री गोरे यांनी केली.

शहरातील बहुप्रतिक्षित उड्डाणपूल प्रकल्पाबाबत बोलतानाते म्हणाले, या कामातील सर्व प्रमुख अडथळे दूर झाले असून आता कामाला वेग मिळणार आहे. प्रकल्प लवकर पूर्ण करण्यासाठी संबंधित यंत्रणांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. सोलापूरच्या औद्योगिक विकासासाठी महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या आयटी पार्क प्रकल्पाबाबतही सकारात्मक प्रगती झाली आहे. जलसंपदा विभागाकडील आवश्यक जागेचे हस्तांतरण पूर्ण झाल्याने प्रकल्पाच्या अंमलबजावणीतील मोठा अडथळा दूर झाला आहे. त्यामुळे आता प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार असून, सोलापूरमध्ये माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळेल.

उजनी धरण शंभर टक्के भरण्याच्या मार्गावर असून धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या दमदार पावसामुळे यंदा पाणीटंचाईचे संकट दूर होणार आहे. तसेच भीमा नदीकाठच्या शेतीपंपांसाठी मंगळवारपासून पूर्ववत आठ तास वीजपुरवठा सुरू करण्यात येणार असल्याची माहिती पालकमंत्री गोरे यांनी दिली.

उजनी धरणातील वाढता पाणीसाठा, शेतीपंपांसाठी वाढीव वीजपुरवठा, विमानसेवेचे पुनरुज्जीवन तसेच उड्डाणपूल आणि आयटी पार्क या विकासकामांना मिळालेली गती यामुळे सोलापूर जिल्ह्याच्या विकासाला नवसंजीवनी मिळणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## संत ज्ञानेश्वर संस्थेकडून मुक्ताबाईला साडी-चोळी भेट

### आज काल्याचे कीर्तन, त्यानंतर पालखीची परतवारी सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२८ जुलै -**
आदिशक्ती श्री संत मुक्ताईच्या ३१८ व्या आषाढी वारी पालखी सोहळ्यानिमित्त पंढरपूर येथील दत्त घाटावरील मुक्ताई मठात सोमवारी (दि.२७) पारंपरिक धार्मिक विधी भक्तिमय वातावरणात पार पडले. आषाढी एकादशीनंतर दरवर्षीप्रमाणे यंदाही संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानने बहीण संत मुक्ताबाईना साडी-चोळी अर्पण करण्याचा मानाचा कार्यक्रम संपन्न झाला.

वारकरी परंपरेतील हा धार्मिक सोहळा अनेक वर्षांपासून अखंडपणे जपला जात आहे. संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त आणि संत मुक्ताई संस्थानचे विश्वस्त यांच्या उपस्थितीत हा विधी मोठ्या श्रद्धा, भक्ती आणि पारंपरिक पद्धतीने पार पडला. यावेळी दत्त घाटावरील मुक्ताई मठात वारकरी, भाविक आणि सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याच दिवशी मुक्ताई मठात विशाल महाराज खोले यांचे कीर्तन रंगले. हरिनामाच्या गजरात आणि संत वाङ्मयाच्या निरुपणातून उपस्थित वारकरी भाविकांना आध्यात्मिक मार्गदर्शन लाभले. कीर्तनानंतर मठातील भक्तिमय वातावरण अधिकच भारावून गेले.



### २८ दिवस ६०० किमीचा प्रवास करुन होते यात्रेत सहभागी

तब्बल सहा जिल्ह्यातून २८ दिवस ६०० किमी प्रवास करून पंढरपूरमध्ये दाखल होणारा संत मुक्ताईचा पालखी सोहळा आषाढी वारीचे प्रमुख आकर्षण असतो. मानाच्या पालख्यापैकी सर्वांत आधी हा सोहळा पंढरपूरमध्ये दाखल होत असतो.

### पालखीचा २९ जुलै रोजी परतीचा प्रवास

दरम्यान, गुरु पौर्णिमेच्या दिवशी २९ जुलै रोजी गोपाळपुरा येथे पालखी सोहळा प्रमुख रवींद्र महाराज हरणे यांचे पारंपरिक काल्याचे कीर्तन होणार आहे. या धार्मिक कार्यक्रमानंतर संत मुक्ताई पालखीचा परतवारीचा प्रवास मुक्ताईनगरच्या दिशेने सुरू होणार आहे. सध्या त्याची तयारी येथील मठात सुरू आहे.

### परतीचा प्रवास असेल २० दिवसांचा

संत मुक्ताई पालखीची परतवारी सुमारे २० दिवसांची असेल. १७ ऑगस्टला पालखी सायंकाळी मुक्ताईनगर येथील नवीन संत मुक्ताई मंदिरात दाखल होईल. त्यानंतर १८ ऑगस्ट रोजी पालखी आगमन सोहळा साजरा करण्यात येणार आहे.

# मंत्री असूनही बनले विठुरायाचे सेवेकरी

## पोलिसांच्या खांद्याला खांदा लावून गिरीष महाजन यांनी बजावली सलग दुसऱ्या वर्षी सेवा

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर,दि.२८ जुलै -**
दरवर्षीप्रमाणे आषाढी वारीसाठी पंढरपुरात यंदा देखील लाखोंच्या संख्येने वारकरी सहभागी झालेले होते. एवढ्या प्रचंड गर्दीत प्रत्येक भाविकाला सुरक्षित दर्शन मिळावे, यासाठी सलग दुसऱ्या वर्षी मंत्री गिरीश महाजन स्वतः मैदानात उतरले होते. मंत्री असून देखील कोणताही अर्विभाव न बाळगता तब्बल तब्बल दहा ते बारा तास पोलिसां सोबत नव्हे तर त्यांच्या खांद्याला खांदा लावून त्यांनी गर्दी नियोजनाची जबाबदारी सांभाळुन एक प्रकारे विठुरायाचे ते देखील सेवेकरीच बनले.




वारकरी संप्रदायातील महाकुंभ मेळा अर्थात आषाढी वारी. या आषाढी यात्रेसाठी या वर्षी विक्रमी गर्दीची नोंद झाली. पोलिसांकडून तर यावर्षी वारीसाठी पंढरपूरात तब्बल ३२ लाख वारकऱ्यांनी हजेरी लावल्याची माहिती देण्यात आलेली आहे. सुमारे एक ते सव्वा लाख लोकवस्तीच्या तिर्थक्षेत्र पंढरपूरात जर यात्रेसाठी ३२ लाख वारकरी सहभागी होत असतील आणि यात्रा निर्विघ्न पणे पार पाडली जात असेल तर ते केवळ संपुर्ण प्रशासनाचे तसेच येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे आणि पंढरपूर वासियांचेच श्रेय आहे. पण हे जरी खरे असले तरी हे सर्व घडवून आणणारा करता करविता हा केवळ पांडुरंगच आहे हे देखील विसरुन चालणार नाही. कारण त्यांच्यावरील भक्तींमुळेच दरवर्षी लाखोंच्या संख्येने वारकरी भाविक येथे आवर्जून येत असतात आणि त्याच्याच भरोशावर यात्रा पोहच करुन अगदी निर्विघ्नपणे घरी देखील परतत असतात.

मात्र हे सर्व होत असताना अगदी आळंदी, देहू पासून ते पंढरपूर पर्यंत येणाऱ्या दिंडी सोहळ्यांना तसेच पंढरपूर मुक्कामी अनेकांचे सेवाभावनेने या वारीसाठी हात लागलेले असतात. असाच सेवाभाव मागील वर्षी पासून भाजपाचे ज्येष्ठ नेते, राज्याचे मंत्री तसेच संकटमोचक, सरकारच्या मदतीसाठी तत्पर म्हणून ओळखले जाणारे गिरीष महाजन विठुरायाचे सेवेकरी म्हणून सेवा बजावित आहेत. यावर्षी त्यांच्या सेवेचे हे दुसरे वर्षे होते. एखादा मंत्री मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विठुरायाची शासकीय महापूजा पार पडल्या नंतर थेट मुंबई गाठु शकला असता. पण मंत्री महाजन यांनी तसे न करता आषाढीसाठी विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर, चंद्रभागा नदीकडू मंदिराकडे येणारी वारकरी भाविकांची गर्दी नियंत्रणात पोलिसांच्या खांद्याला खांदा लावून मोलाची जबाबदारी पार पाडलेली आहे.

मंत्री महाजनांनी शहरातील यात्रेच्या दृष्टीने महत्वाच्या महाद्वार परिसरातील नियंत्रण मनोरा आणि आपत्कालीन नियंत्रण कक्षातून सातत्याने वारकऱ्यांच्या गर्दीवर,वारीच्या एकुण परिस्थितीवर लक्ष ठेवत प्रशासनाला आवश्यक सूचना दिल्या. केवळ आदेश देणारे नव्हे, तर प्रत्यक्ष घटनास्थळी उपस्थित राहून जबाबदारी पार पाडणारे नेतृत्व म्हणून मंत्री गिरीष महाजन यांनी पुन्हा एकदा याही वर्षी आषाढी यात्रेमध्ये वेगळी छाप पाडली आहे.

राज्यात, परराज्यात, परदेशात कुठेही आपल्या राज्यातील नागरिक संकटात असोत किंवा आपल्या राज्यात कुठेही दरड कोसळु देत, महापूर येवू देत, पावसामुळे नागरिक संकटांत असू देत त्या ठिकाणी सरकारच्या वतीने जी कमी असते ती हमखास भरुन काढण्याची हमी म्हणजेच मंत्री गिरीष महाजन असे म्हटले तर वावगे ठरणारे नाही. कारण मंत्री गिरीष महाजन हे एक असे आगळे वेगळे रसायन आहे की जे सरकारचेच नाही तर सर्वसामान्यांना देखील संकटमोचक वाटावेत अशी त्यांची एकंदर कार्यप्रणाली आहे.

त्यामुळेच यंदा देखील सलग दहा ते बारा तास वारीच्या नियोजनावर नियंत्रण ठेवित प्रशासनाला योग्य सुचना करीत,वारकऱ्यांची सुरक्षितता, पोलिसांचे मनोबल आणि यात्रेचे सुरळीत व्यवस्थापन यांना सर्वोच्च प्राधान्य देत विठुरायाचे सेवेकरी म्हणून सलग दुसऱ्या वर्षी देखील मंत्री महाजनांच्या सेवेचा येथे आषाढी यात्रेसाठी आलेल्या वारकरी भाविकांना निश्चितच प्रत्यय आला.